


म. ग्रं. सं. ठाणे.
विषय
सं. क्र.
REFBK-0025102
REFBK-0025102

संदर्भ मू.प्र. ६८३
२५७०२
मवारह

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचनाः—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५[८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

| | |
|---|---|
| 12 OCT 1986 | 3 OCT 1992 |
| 2 NOV 1986 | 28 OCT 1992 |
| 41/00 | 25 FEB 1995 |
| 23 NOV 1986 | 29 APR 1995 |
| 1 MAR 1987 | 6 MAY 1995 |
| 11 MAR 1987 | |
| 23 SEP 1992 | |

(क्र. मा. पहा)
५०००-३-८४

# एक समुद्रपक्षी

वसुधा गोखले

REFBK-0025102
REFBK-0025102

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे ३०.

प्रकाशक :

अनिल मेहता
मेहता पब्लिशिंग हाऊस,
१२१६ सदाशिव पेठ,
पुणे ४११०३०.

मुद्रक :

सौ. अनुराधा अरुण शेटे
नूतन मुद्रण मंदिर,
४ सोमवार पेठ,
पुणे ४११०११.

© सर्व हक्क लेखिकेकडे

मूल्य : २० रुपये

या पुस्तकाच्या प्रकाशनास महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने अनुदान दिले आहे.

कै. ति. दादा
व ति. वहिनीस
सादर अर्पण

– सुधा (माई)

# माझे मनोगत

किनाऱ्यावरच्या मऊशार रुपेरी वाळूत पावलं गुंतलेल्या पण मनाने सतत सागराकडे झेपावणाऱ्या एकाद्या समुद्रपक्षासारखी माझी अवस्था आहे आणि म्हणूनच माझ्या जीवननौकेवर आलेल्या अनेक सागरपुत्रांचा जीवनपट वाचकांसमोर उलगडण्याचा हा अल्पसा प्रयत्न आहे. हे प्रवासवर्णन नाही. आत्मचरित्र तर नाहीच नाही. तेव्हा वाचकांनी कृपया या अनुभवांना कुठल्याही वाङ्मय प्रकारात साचेबंद करण्याचा प्रयत्न करू नये.

हे पुस्तक वाचकांसमोर आणण्यात ज्या ज्या सागरपुत्रांचे अनुभव मला उपयोगी पडले त्यांची मी अत्यंत ऋणी आहे. पण वस्तुतः ही संकल्पना मूर्त स्वरूपात आणण्यात डॉ. रा. शं. वाळिंबे यांचे अमोल प्रोत्साहन मला लाभलेले आहे. एखाद्या सर्वसामान्य रूपाच्या आपल्या लाडक्या लेकीची जन्मापासून काळजी वाहून नंतर तिच्यासाठी सुयोग्य वर हुडकण्यासाठी पित्याला जे जे करावे लागते ते सर्व कष्ट स्वतः वाळिंबेसरांनी याबाबत घेऊन शेवटी एकदाची तिला बोहल्यावर चढवली आहे. तेव्हा त्यांचे शब्दात आभार मानणे हा त्यांच्यावरील पितृतुल्य श्रद्धेचा मी अपमान समजते.

शेवटी साहित्य संस्कृती मंडळाने या माझ्या पहिल्यावहिल्या कलाकृतीला प्रकाशनाची संधी दिली तेव्हा त्यांचे व मेहता प्रकाशनाचे श्री. अनिल मेहता यांचे आभार मानते.

'नीलाकुंज'
प्रभातरोड गल्ली नं. १३
पुणे ४.

वसुधा गोखले
१४ एप्रिल १९८६

# प्रस्तावना

सौ. वसुधा गोखले यांनी लिहिलेल्या 'एक समुद्रपक्षी' या पुस्तकाचा परिचय करून देताना मला फार आनंद होत आहे. सौ. गोखले पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागात १९७२ ते ७४ या काळात माझ्या विद्यार्थिनी होत्या हे आनंदाचे एक कारण. दुसरे कारण या पुस्तकाची गुणवत्ता.

सौ. गोखले यांचे पती श्री. गोखले १९५८ मधे मिनिस्ट्री ऑफ टेली कम्यु-निकेशनची परीक्षा उत्तीर्ण झाले. नंतर 'ट्रेनी' म्हणून ते बॉम्बे स्टीम नॅव्हिगेशन-मधे राहिले. रेडिओ ऑफिसर हा त्यांचा हुद्दा. नंतर १९५९ मध्ये ते सिंदिया स्टीम नॅव्हिगेशन कंपनीत लागले. चवदा वर्षे ते या कंपनीत होते.

२७ नोव्हेंबर १९५९ या दिवशी त्यांचा वसुधाताईंशी विवाह झाला.

सिंदिया कंपनीतली नोकरी सोडल्यावर १९७१ ते १९७५ ही चार वर्षे ब्रिटिश कंपनीत आणि ग्रीक कंपनीत त्यांनी काम केले. १९७५ पासून ते हाँग-काँगच्या वॉलेम शिप् मॅनेजमेंट कंपनीत काम करत आहेत.

श्री. गोखले यांची बोटीमधून नित्य सर्व जगाची भ्रमंती चालू असते. नियमांना अनुसरून सौ. गोखले यांना त्यांच्याबरोबर बोटीमधून जगाचा प्रवास करण्याची अधून-मधून संधी मिळत असते.

त्यांची पहिली सफर एकोणीस वर्षांपूर्वी १९६७ मधे झाली.

मुंबई–लंडन–अँटवर्प–ब्रुसेल्स–स्पॅनिश–कॅनरी आयलंडस्–न्यूयॉर्क–बॉस्टन–फिलाडेल्फिया–चार्लस्टन–न्यूयॉर्क–दर्बान–मुंबई असा हा प्रवास होता.

त्यांचा दुसरा जगप्रवास १९६९ मधे झाला. मुंबई-पेनांग-सिंगापूर-हाँगकाँग-पनामा कालवा-टाम्पा (फ्लॉरिडा स्टेट)-न्यूयॉर्क-वॉशिंग्टन-सेंट जॉन्स-मॉंट्रियल-केबेक ग्रेटलेक्स-बफेलो-नायगारा-शिकागो पनामा-लॉस एंजल्स-सिॲटल-न्यू ब्रुन्सविक-पनामा-न्यूयॉर्क-मुंबई असा हा प्रवास होता.

त्यांचा तिसरा जगप्रवास आठ वर्षांपूर्वी १९७७ मधे झाला. मुंबईहून विमानाने बगदाद-बसरा-ईस्ट लंडन-केपटाऊन-सॅन अँटोनिओ-सॅन्तियागो (दक्षिण अमेरिका) व्हेनिझुएला-कॅरेबियन समुद्रातून जमेका-न्यू ऑर्लिन्स-व्हाया पनामा लॉसएन्जल्स-जपान विमानाने मॅनिला-मुंबई.

त्यांचा चवथा जगप्रवास १९७९ मधे झाला. विमानाने मुंबई ते कराची-ईस्ट लंडन-केप टाऊन व्हाया पनामा-टाम्पा (फ्लॉरिडा स्टेट)-अटलांटिकमधून रॉटर-डॅम-लिस्बन विमानाने पॅरिस-दुबई–मुंबई.

या सर्व प्रवासांची हकिगत निरनिराळ्या वेळी सौ. गोखले यांनी अतिशय रंगवून सांगितली. वृत्तान्तामुळे मी अगदी संतुष्ट झालो आणि म्हणून हा सारा वृत्तान्त लिहून काढण्याची मी त्यांना सूचना केली. पण त्यांनी ती सूचना फारशी मनावर घेतली नाही. पण मी पुन्हा पुन्हा सुचविल्यावर त्यांनी हे काम मनावर घेतले. 'मला लिहिण्याची सवय नाही,' हे त्यांचे नित्य पालुपद असे. अखेर हे प्रवासवर्णन त्यांनी पुरे केले आणि हे वाचकांना मिळत आहे.

*

नित्याच्या प्रवासवर्णनांप्रमाणे हे प्रवासवर्णन नाही. पण त्याची बैठक मात्र प्रवास वर्णनाची आहे. आपल्या पतीबरोबर त्यांनी चार वेळा केलेल्या जगप्रवासांमध्ये त्यांनी अनेक देशांतील अनेक गावांना आणि शहरांना भेटी दिल्या. ठिकठिकाणी त्यांनी जी अनेक दृश्ये पाहिली, ज्या घटना पाहिल्या, त्या दृश्यांमधील आणि घटनांमधील मर्मस्थाने त्यांनी मोठ्या चातुर्याने हेरली. ती स्मृतीमध्ये साठवून ठेवली आणि त्यांची मनात अनेक वेळा उजळणी केली. उदाहरणार्थ पुढील वाक्य पहा—"थंडगार शँपेनचा फेस बाटलीच्या तोंडातून उसळून येतो आणि माझ्या मनातल्या कुपीतली बावीस वर्षे ओसंडून बाहेर पडतात. (पृ. ६) या उजळणीमुळे त्यांना प्रत्येक वेळी पुनः प्रत्ययाचा आनंद मिळाला. दृश्य आणि घटना प्रथम पाहिल्यावर मध्यंतरी बराच बराच काळ गेल्यामुळे प्रथमावलोकनाच्या क्षणी झालेले संस्कार कालान्तराने रूपान्तर पावले, आणि त्याचे कलेत रूपान्तर झाले. ही कलात्मकता हाच या पुस्तकाचा सर्वांत महत्त्वाचा विशेष आहे.

या कलात्मकतेमुळेच केवळ संस्मरणीय स्थळांच्या नावांची जंत्री, अथवा घटनांचा कालानुक्रमाने तयार केलेला ताळेबंद, किंवा निरनिराळ्या बंदरांची भौगोलिक माहिती असे या पुस्तकाचे वस्तुनिष्ठ व रूक्ष स्वरूप राहिले नाही. लेखिकेने पाहिलेले प्रत्येक दृश्य अथवा तिच्या अवलोकनात आलेल्या व परिचित झालेल्या व्यक्ती या सर्वांमुळे जे संस्कार तिच्या मनावर झाले त्या संस्कारांना कलेची कमनीय झालर लागली आणि कलेचा साजशृंगार करून ते आता वाचकांच्या भेटीस आले आहे.

जे जग लेखिकेने या पुस्तकात वर्णिले आहे ते आपले नित्याचे व्यावहारिक जग नाही. ज्या जीवनाचे चित्र त्यामध्ये लेखिकेने काढले आहे ते बोटीवरील जीवनही आपल्या दैनंदिन जीवनापेक्षा अगदी निराळे आहे. ते निराळे तर आहेच, पण लौकिक जीवनापेक्षा ते किती तरी अधिक रमणीय आहे, आकर्षक आहे. अगदी स्वप्नसृष्टीतील वाटावे इतके आकर्षक आहे. बोटीमधून सर्व जगाला वळसा घालताना दिवसामागून दिवस आणि रात्रीमागून रात्री अथांग दर्याच्या सान्निध्यात मनात तरळून जाणारी गूढरम्य भावनांची स्पंदने, अस्ताला जाताना विशाल सागरात बुडी मारणाऱ्या आरक्त सूर्याची पश्चिम क्षितिजावर रेंगाळणारी प्रभा, प्रभातकाळी पूर्व क्षितिजावरून वर येणाऱ्या सूर्याच्या कान्तीचा आणखी वेगळा नमुना, दुपारी भर उन्हात सूर्यप्रकाशात चमचमणारा सागराचा पृष्ठभाग, पौर्णिमेच्या चांदण्यात दिसणारी सागराची शोभा, अमावस्येच्या घनदाट काळोखात केवळ श्रोत्रेंद्रियाला जाणवणारा लाटांचा खळखळाट-अशासारख्या अगणित अनुभूतींनी लेखिकेच्या मनात आनंदाचे तरंग उसळले असतील. नित्याच्या व्यावहारिक जगापासून दुरावलेल्या बोटीवरील जगात अशासारख्या निसर्ग सौंदर्याचा सहवास मनाला किती चैतन्य प्राप्त करून देत असेल याची कल्पनाच करावयास पाहिजे.

पण निसर्गाबरोबर मानवही आलाच ! बोटीवरील माणसांचे असंख्य नमुने लेखिकेने पाहिले. " अशी ही विविधरंगी विविधढंगी मनुष्य स्वभावाची माणसं या आयुष्यात नेहमी भेटत रहातात. त्यातली अशी काही व्यक्तिमत्त्व त्यांची आपली आपली तऱ्हा, प्रत्येकाचा जीवनविषयक वेगवेगळा दृष्टिकोन, आणि आलेल्या आयुष्याला आपल्या परीने सामोरे जाण्याची पद्धती कळत नकळत आपला ठसा कायमचा मनावर उमटवून जातात. " (पृ. ३९), अनेक व्यक्तींची आणि वल्लींची चित्रे लेखिकेने मोठ्या कुशलतेने रंगवली आहेत. बोटीवरील वरिष्ठ अधिकाऱ्यांची व्यक्तिचित्रे (पृष्ठ ३, ६), मुख्य आचाऱ्याचे व्यक्तिचित्र (पृ. ३७, ३८), मेडिकल ऑफिसरचे (सेकंड ऑफिसर) व्यक्तिचित्र (पृ. ४), चीफ ऑफिसरचे व्यक्तिचित्र (पृ. १८-१९), कॅप्टन नीलूचे व्यक्तिचित्र (पृ. ३-४), तोताचे व्यक्तिचित्र (पृ. ३३-३४) डॅनी या इस्त्रायली कॅप्टनचे व्यक्तिचित्र (३५-३६), अशी कितीतरी आकर्षक व्यक्तिचित्रे या पुस्तकात आढळतील. सुसंस्कृत व प्रतिष्ठित माणसे आणि अर्धसंस्कृत सामान्य माणसे या सर्वांच्या वृत्ती, त्यांच्या लकबी, त्यांची बोलण्याची आणि वागण्याची धाटणी, त्यांच्या आवडी-निवडी, त्यांचे हर्षामर्ष, त्यांच्या कर-

मणुकीच्या अनेक तऱ्हा इत्यादी अनेक गोष्टीमधील मर्मस्थाने लेखिकेने बारकाईने हेरलेली आहेत. आणि त्यांना प्रभावी शब्दांची जोड प्राप्त करून दिली आहे.

बोटीवरील आनंदाचा कोणताही प्रसंग असो, लेखिकेने तो अतिशय परिणामकारक रीतीने चितारला आहे. वाढदिवसाची पार्टी असो, लग्नाच्या वाढदिवसाची पार्टी असो, कुणाला बढती मिळाल्याची पार्टी असो, कुटुंबातील काही महत्त्वाच्या घटनेबद्दल पार्टी असो, अशी पार्टी म्हणजे बोटीवरील सर्व माणसांचा तो उत्सवच. या सोहळ्यामधल्या आनंदाच्या अनेक संस्मरणीय क्षणांची वर्णने लेखिकेने अगदी समरस होऊन केली आहेत. आपण स्वत: या पार्टी-तील एक व्यक्ती आहोत असेच वाचकाला वाटावे इतकी ही वर्णने परिणामकारक झालेली आहेत. निरनिराळ्या व्यक्तींच्या बोलण्याच्या विशिष्ट तऱ्हा, त्यांचे खास शब्द इत्यादी बारकावे लेखिकेच्या नजरेतून सुटलेले नाहीत.

बोट बंदराला लागल्यावर बोटीवरील ठराविक जीवनक्रमात घडून येणाऱ्या तात्कालिक रूपांतराचे वर्णनही लेखिकेने अशाच कौशल्याने जागोजागी केले आहे. बऱ्याच दिवसांनंतर शहर दिसल्यामुळे जो थारेपालट होतो त्याचा अनुभव घेत असताना बोटीवरच्या माणसांच्या मनाचा झालेला गोंधळ, वेगळ्या जगाचे दर्शन घेण्यासाठी उतावीळ झालेल्या माणसांच्या मनाचे वाढते कुतूहल, नवीन दृश्यांच्या आणि नवीन चेहऱ्यांच्या दर्शनाने त्याच त्या जीवनाच्या पुनरावृत्तीने कंटाळलेल्या जीवांना मिळणारा तात्कालिक विरंगुळा, नव्या नव्या वस्तू खरेदी करण्याची धांदल, नवी नवी रमणीय ठिकाणे पहाण्याची उत्सुकता– आणि हा अल्पकालिक रमणीय विष्कंभक संताच पुन्हा बोटीवरील पूर्वीच्या जीवनाशी समरस होण्या-साठी मनाची तयारी करताना होणारी भावनांची खळबळ इत्यादी अनेक मनो-विकारांचे मोठे सुरस वर्णन लेखिकेने ठिकठिकाणी केले आहे.

लेखिकेच्या सूक्ष्म आणि मार्मिक अवलोकनाचा प्रत्यय पानापानावर येतो. व्यक्तिचित्रे रेखाटतानाही लेखिकेने विपुल चातुर्य दाखविले आहे. इंग्रजीत ज्यांना Miniature paintings म्हणतात त्या प्रकारची ही व्यक्तिचित्रे आहेत. बोटी-वरच्या लहानशा जगात रोज वावरणाऱ्या त्याच त्याच व्यक्तींची वैशिष्टये रंगविण्यात लेखिकेने जे कौशल्य व्यक्त केले आहे तेच कौशल्य समुद्रकिनाऱ्या-वरील निरनिराळ्या बंदरात भेटलेल्या आणि इतर शहरांमध्ये भेटलेल्या विविध व्यक्तींची डोळ्यात भरलेली वैशिष्टये रंगविण्यात लेखिकेने व्यक्त केले आहे.

बोटीवरच्या लोकांचे विनोदी संवाद, त्यांच्या नेहमीच्या बोलण्यात अपरिहार्यपणे होणारे अनेक भाषांचे गमतीदार मिश्रण, मराठी माणसाच्या मराठीवर झालेले इंग्रजी भाषेचे जबरदस्त आक्रमण, बोटीवरील रंगलेल्या गप्पा-गोष्टींच्या वेळी दिसून येणारे भाषेचे स्वच्छंद स्वरूप ही शैलीविषयक वैशिष्ट्ये डोळ्यात भरण्यासारखीच आहेत.

पण याशिवाय वर्णनात्मक भागामध्ये लेखिकेने जी शैली वापरली आहे ती संवादातील किंवा गप्पागोष्टीतील शैलीपेक्षा वेगळी आहे. तिने प्रसंगाच्या किंवा घटनेच्या अनुरोधाने वेगवेगळी रूपे धारण केली आहेत आणि ही रूपे आकर्षक आहेत.

लेखिकेच्या वर्णन शैलीचे दोन सुंदर नमुने विलक्षण खवळलेल्या समुद्राच्या तांडवाच्या वर्णनात आढळतील. हे वर्णन दोन ठिकाणी आले आहे. एक वर्णन पृष्ठ ३९–४० वर आले आहे आणि दुसरे वर्णन पृष्ठ ५९–६१ मध्ये आले आहे.

सुभाषितांसारखी मार्मिक वाक्ये ठिकठिकाणी आढळतील. उदाहरणार्थ, "बोटीवरील आयुष्य हे खरंच एकाद्या सोनेरी पिंजऱ्यातल्या पोपटासारखे असते." हे पृ. ४३ वरील वाक्य आणि त्याच्या पुढचे वाक्य पहावे.

अशा प्रकारच्या अनेक गुणांनी समृद्ध असलेले हे पुस्तक लिहिल्याबद्दल सौ. वसुधा गोखले यांचे मी मनापासून अभिनंदन करतो.

१४ एप्रिल १९८६

**रा. शं. वाळिंबे**

ग्रंथालय ठाणे
९८३
२५७०२
मु. ता. ३०।२।८६
ग्रंथ शाखा

'क्यों मेमसाब, आपकी पार्टी कब होगी?... वेडिंग ॲनिव्हर्सरी?'

'अजी, पकोडे-लड्डू बनाअियेगा ना, बहुत दिनसे दिल चाहता है इन चीजोंको खानेके लिए.'

'हम सब लोग आपकी मदद करनेको तैयार है. आप खाली ऑर्डर दे देना.'

असे संवाद बोटीवर प्रत्येक पार्टीला, विशेषत: कुणी बाई असली की, चालतातच. मी आणि बाबा—आम्ही दोघेही आपल्या लग्नाच्या वाढदिवसाची पार्टी कशी साजरी करायची याबद्दल जेव्हा-जेव्हा चर्चा करीत असू, तेव्हा त्याच त्या कार्यक्रमाला कंटाळलेल्या आमच्या मनालाही उत्साहाचं एक नवीनच उधाण यायचं. बोटीवर कुणीही, कशाच्याही निमित्ताने दिलेली पार्टी असो, प्रत्येकजण त्याची उत्सुकतेने अशीच वाट बघायचा. मग ती कुणाची वाढदिवसाची असायची, कुणाची लग्न ठरल्याची, कुणाची लग्नाच्या वाढदिवसाची, कुणाची पगारवाढीची, तर कुणाची रजा मंजूर झाल्याची! आपले दसरा-दिवाळीसारखे सणही साजरे व्हायचे ते या पार्टीनेच! 'नाताळ' आणि 'नववर्ष' या तेवढ्या ऑफिशियल पार्टर्या! या

सगळ्याच्या मागचा उद्देश एकच. त्या निमित्ताने सगळ्यांनी एकत्र यायचं. चीफ स्टुअर्डने खास बनविलेले स्नॅक्स आणि ड्रिंक्स घ्यायची. बोटीवरचा एकटेपणा, रोजच्या आखीव कार्यक्रमाचा कंटाळवाणेपणा विसरायचा, ड्रिंक्सच्या सोबतीने मनाची बंधनं तोडून गप्पा मारायच्या–गायचं, नाचायचं आणि अशी पार्टी रात्री साजरी झाली की, नव्या उत्साहाने, नव्या आनंदाने उगवत्या दिवसाचं स्वागत करायचं. क्वचित प्रसंगी हँगओव्हर असला तर, त्या दिवसाचं स्वागत करायला तो लवकर उजाडलेलाच नसतो. अशावेळी जर बोटीवर बायका असल्या तर, त्याही या पार्टीत सामील होतात–एकदोन कोकाकोला नाहीतर बियर घेऊन! पण काही ना काही पदार्थ स्वतः बनवून सगळ्यांनाच आपल्या घराची आठवण त्या जरूर करून देतात. असे दिवस अगोदरपासूनच जाहीर झालेले असतात आणि यातलाच एक दिवस आमच्या लग्नाच्या पार्टीचा असतो.

आम्ही चिली देशात असताना तिथे शँपेन खूप स्वस्त म्हणून विकत घेतलेली असते. दिवसभर मी–निदान दोन-तीन पदार्थ तरी आपण करायचेच या निश्चयाने गडबडीत असते. त्या उत्साहात केव्हाच संध्याकाळ होते. सात वाजतात. थर्ड ऑफिसर आणि फोर्थ इंजिनिअर, दोघेही रात्री आठ ते बारा वॉचवर जायचे असतात. म्हणजे वेळेचं बंधन त्यांना पाळावं लागतं. त्यातून ते ज्युनियर ऑफिसर्स असतात. तेव्हा ते काही या पार्टीत फारसा रंग भरत नाहीत. तसे काही असतातही बिनधास्त बारापर्यंत बसणारे ! पण आमच्या बोटीवरचा थर्ड ऑफिसर म्हणजे अगदी खास ब्रिटीश रक्ताचा ! वयाच्या मानाने अकालीच प्रौढत्व आल्यासारखा. वास्तविक चोवीस-पंचवीस वर्षांचं त्याचं अल्लड वय–पण मी ब्रिटीश रक्ताचा म्हणते ते यासाठी !

मला आठवतय, आम्ही चौदा-पंधरा वर्षांपूर्वी जेव्हा लंडनला गेलो होतो, तेव्हा आमची बोट खुद्द लंडनपासून तीस-चाळीस मैलांवर ज्याला 'कन्ट्रीसाईड' म्हणतात अशा टिलबरी नावाच्या एका छोट्याशा गावात होती. तिथून रेल्वेने फ्रेंचचर्च स्ट्रीटला जायला आम्हाला चांगला अर्धा ते पाऊण तास लागायचा. सकाळच्या ऑफिसच्या वेळेला आणि संध्याकाळी ऑफिस सुटायच्या वेळी आपल्या मुंबईच्या लोकलसारखी जरी तोबा गर्दी नसली, तरी बऱ्यापैकी गर्दी असायची. त्यातली बरीचशी मंडळी रोज गाडीचा प्रवास करून जाणारी येणारी होती. कारण रोजचे चेहरे मलाही चांगलेच परिचित होते आणि माझ्या आवडीचा छंद म्हणजे त्यातून माझ्या ओळखीच्या अगर बघण्यातल्या चेहेऱ्यांचं साम्य हुडकणे !

एक गोष्ट मात्र मला फार खटकायची. रोजच्या रोज जा–ये करणारा प्रत्येकजण दुसऱ्याला ' हॅलो ' करून मग पेपरमध्ये जे तोंड खुपसून बसायचा, ते आपलं आपलं उतरायचं स्टेशन येईपर्यंत-पुन्हा इस्त्री मारल्यासारखा चेहरा करून

चालायला लागायचा. मला दरवेळी मुंबई-पुण्यांच्या गाडीची आठवण व्हायची. आधी जागेसाठी लठ्ठालठ्ठी; साधारण पुणं सोडलं की लोणावळ्यापर्यंत, आणि मुंबई सोडली की कल्याणपर्यंत. नंतर कुणाला आपल्या जागेबद्दल प्रेम वाटत नाही. भांडून, वादविवाद करून मिळवलेल्या जागेवरून उठून मंडळी या डब्यातून त्या डब्यात चकरा मारायला लागतात. ओळखीचे कुणीतरी भेटतेच. मग गप्पा रंगतात. पान, तंबाखू, सिगारेटचो देवाणघेवाण, कर्जतच्या बटाटेवड्याचा, चहाचा आग्रह होतो. रोजच्या प्रवाशांचे पत्त्याचे अड्डे जमतात. भजनाचे सूर निघतात. त्यातच फेरीवाल्यांची वर्दळ. लंगडे, आंधळे, भिकारी यांची सक्तीने ऐकावी लागणारी गाणी, असे दृश्य नेहमी बघायची माझी सवय-हा मुखदुर्बळपणा मला मुळीच आवडायचा नाही. तर असा हा आमचा थर्ड ऑफिसर! फोर्थ इंजिनियर पारसी–अबोलच. वयाची पंचेचाळीशी उलटलेली. परिस्थितीशी झगडून इतके दिवस फिटर म्हणून काम करून आता कुठे नुकता इंजिनियर झालाय. परिस्थितीला तोंड देण्यापुढे बिचाऱ्याला स्वतःचा विचार करायला सवड झालीच नाही. लग्न वगैरे झालेलं नाही. आयुष्यात रस वाटावा असा आपलेपणा कुठेच शिल्लक राहिला नाही म्हणून मनाने निराश झालेला. तेव्हा हे दोघं. सेकंड ऑफिसर चायनीज. तेव्हा ' आय कम, यू गो ' इतपतच इंग्रजी. आहे बोलका, पण भाषेची अडचण. इलेक्ट्रिशियन, म्हणजे बोटीवर लकी म्हणून ओळखला जाणारा; तोही चायनीजच. पण त्याचा चेहरा सदोदित आयुष्याला विटल्यासारखा. त्याच्या चेहऱ्यावर हास्य दिसलं की, आपण स्वतःला लकी समजायचं. दिसायचा तर इतका नाजूक-साजूक की, मला नेहमी वाटायचं, याने जर स्कर्ट-ब्लाऊज घातला तर हा एकदम पोरगी दिसेल. आमचा चीफ कुक् इंडियन नेव्हीतून निवृत्त झालेला; पण पैशाशाठी वयाची साठी झाली तरी नोकरी करणारा. मराठी अगदी अस्खलित बोलणारा, मुंबईत अनेक वर्षं राहिलेला फिटर. कावळ्यासारखी सगळीकडे बारीक नजर ठेवणारा चीफ स्टुअर्ड. अशी जेव्हा सुरवातीला जमतात, तोपर्यंत पार्टीत गप्पांपेक्षा अबोलाच जास्त असतो. मी उगीचच फालतू प्रश्न विचारून सगळ्यांना बोलायला लावते. पण असं वातावरण माझा जीव नेहमीच गुदमरून टाकते.

माझी ही अवस्था कॅप्टन नीलू आल्यानंतर मात्र लगेचच नाहीशी होते. एकदा का नीलने पार्टीचा ताबा घेतला की मग, ती पार्टी आमची रहातच नाही. कुणाचीही, कशाच्याही निमित्ताने दिलेली पार्टी असो, पण नीलूने एकट्यानेच बोलत रहायचे आणि बाकीच्या सगळ्यांनी कीर्तनाला बसलेल्या श्रोत्यांसारख्या माना हलवायच्या. आपल्या पन्नास वर्षांच्या आयुष्यात पंचवीस-तीस वर्षे बोटीवर काढलेला हा सिनियर कॅप्टन, इतक्या वर्षांच्या अनुभवाने या आयुष्यात पक्का मुरलेला आहे. मनाचा मोठा दिलदार–सगळ्यांशी अगदी बरोबरीच्या नात्याने

वागेल, बोलेल. दिसायला अगदी टिपिकल हेडक्लार्कसारखा. नाकावर येणारा आपला चष्मा सावरून, टक्कल पडत चाललेल्या विरळ केसातून प्रेमाने हात फिरवून, तो जगातल्या चालू राजकारणापासून ते बायकांच्या बाळंतपणापर्यंत अशा हिरीरीने, अधिकाराने बोलेल-आपली मतं इतक्या ठामपणाने मांडत राहील की, मी बाई असूनही बायकांच्या विषयावर त्याच म्हणणंच मीही रास्त धरलं पाहिजे असा त्याचा मताग्रह असेल. बायकांच्या साडया, कुठलं सिल्क जास्त चांगलं-कुठलं टिकाऊ-कुठल्या रंगाच्या बाईने कुठल्या शेडची लिपस्टिक लावावी, कसा मेकअप करावा याबद्दल एका पार्टीत तो अशा आवेशाने बोलत होता की, मला हसू आवरेना. मी मुद्दामच त्याला विचारले, 'कॅन यू वेअर द सारी लाईक आय वेअर ?' यावर 'ओ यस, व्हाय नॉट !' म्हणून तो आपलं सुटलेलं पोट सावरत उठला देखील. (मी मनात म्हटलं, 'आता मात्र नक्कीच जास्त झाली बरं का !') त्याचा तो उत्साह बघून सगळीजणंच, 'नाऊ मिसेस गोखले, प्लीज ब्रिंग युवर सारी' म्हणायला लागली. मी मुद्दामच खरोखर त्याला साडी आणून दिली-गंमत म्हणून. आणि तोही ती व्यवस्थित माझ्यासारखी नेसला. मला मुंबईत घोळक्यांनी हिंडणाऱ्या 'त्या ऽऽ' लोकांची आठवण झाली. सगळयांनी आपले कॅमेरे सरसावले. डोक्यावरून पदर घेतलेलं, मिशा राखलेलं त्याचं ते रूपडं बघून सगळयांची छान करमणूक झाली. पण मनातून मात्र आम्ही सगळयांनी त्याला मानला आणि पुढे अगदी गप्प राहिलो. नीलू जेवणाच्या टेबलावर जेवायला आला की, त्याच्याकडे बघत रहावे. एका हातातला घास तोंडाशी धरून त्याची एकाद्या विषयावर जी लेक्चरबाजी चालायची, की आपण काय जेवतोय, पुढे प्लेट-मधे काय वाढलं जातय याचं त्याला मुळी भानच रहायचं नाही. त्याच्या या बडबडण्याला त्याला कायम एक श्रोता लागायचा. अगदी कुणीच नाही तर घुम्या स्वभावाचा चीफ इंजिनियर हा त्याचा ठरलेला श्रोता ! त्याला आम्ही 'घुम्या' याच नावाने ओळखायचो. कारण तो बोलताना त्याचा आवाज घुमल्यासारखा बाहेर पडायचा. एखाद्या सुस्त अजगरासारखा तो नेहमी खुर्चीत बसलेला असायचा. नीलूबरोबरच घुम्याही आला होता आणि दोघेही रिकामे असायचे. त्यामुळे नवरा-बायकोसारखी ही जोडी सदोदित सगळीभर हिंडायची. त्याच्यासमोर बिअरचा ग्लास हातात धरून घुम्या बसायचा. बियरही नेहमी नीलूच्याच पैशाची हवी हा त्याचा कटाक्ष ! सुरवातीला त्याचं एखादं वाक्य कानावर पडायचं. पण हळू-हळू आधीच सुस्तावलेल्या त्याच्या शरीरावर बिअरचा अंमल चढायला लागला की, त्याचे डोळेही मिटायला लागायचे.

अशी ही पार्टी आठपर्यंत रेंगाळत रहायची. सेकंड ऑफीसर आणि थर्ड इंजिनियर उठायचे. थर्ड ऑफीसर ड्यूटीवर जायचा. सेकंड ऑफीसर हा बोटीवरचा

अत्यंत दुर्दैवी प्राणी ! बोट बंदराच्या बाहेर असो नाहीतर आत, हा नेहमी रात्री बारा ते चार आणि दुपारी बारा ते चार वॉचवर ! म्हणजे आमच्या सगळ्यांच्या झोपेला जेव्हा खरा रंग भरायचा, तेव्हा तो बिचारा ड्यूटीवर असायचा. एखादा सिनेमा अगर नाटक बघून आपण घरी आलो की, आता दुपारी जेवून कशी मस्त ताणायची याचा विचार आम्ही बायका करतो. थर्ड इंजिनियरला बोट बंदरात असली तर, असा वॉच नसतो. शिवाय एरवीही चारला झोपलं की तो सकाळी साडेदहा आकरा पर्यंत झोपू शकतो. पण सेकंड ऑफिसरला बोट बंदरात असली तरी, मालाच्या चढ-उतारावर देखरेख करावी लागते. आणि समुद्रात असली तर, 'नून पोझिशन' (म्हणजे सूर्य बरोबर बाराला डोक्यावर आल्याच्या वेळी बोट कुठल्या अक्षांश, रेखांशावर आहे) घ्यायची असते म्हणून झक्कत त्या-त्या ठिकाणच्या वेळी उठावच लागतं. दुपारी चारला वॉचवरून खाली आला की, त्याची मेडिकल ड्यूटी चालू होते.

बोटीवरचा हा मेडिकल ऑफिसर म्हणजे रजिस्टर्ड पोस्टानं शिक्षण घेतल्या सारखा, पुस्तकात वाचून निदान करणारा आणि आपल्या बुद्धीप्रमाणे औषध देणारा गावठी डॉक्टर ! अर्थात् कुणीही आपला अमूल्य जीव त्याच्या स्वाधीन करत नाही. पण किरकोळ आजारावर तो काही स्टॅंडर्ड औषधे देतो--जी आपल्या-लाही माहीत असतात. आजकालच्या जमान्यात आपणही अर्धवट डॉक्टर असतोच की ! नीलू एकदा गंमत सांगत होता. तो एका बोटीवर कॅप्टन असताना एक खलाशी काम करता करता हार्टफेलने जागीच कोसळला. बोट अटलांटिक महासागरात होती. त्याने त्याची नाडी पाहिली स्टेथास्कोप लावून छातीचे ठोके तर चालू नाहीत ना याची खात्री करून घेतली, कारण त्याला डेथ सर्टिफिकेट करायचं होतं आणि त्यावर स्वत: सही करावी लागणार होती. तो म्हणाला, 'माझी अगदी शंभर टक्के खात्री होती की, तो मेला आहे; पण तरीही इतर ज्युनियर लोकांचे सल्ले घेतले. प्रत्यक्ष सही करताना मात्र माझ्या हाताला जो कंप सुटला होता म्हणून सांगू. सगळं शरीर घामानं डबडबलं. न जाणो हा प्राणी उठून बसला तर, तो मलाच झोपवून जलसमाधी द्यायला कमी करायचा नाही. सेकंड ऑफिसर-च्या डोक्याशी तर ही रोजचीच कटकट असते. 'साब, आज पेटमें बहुत दर्द होता है. साब, सिरमे दर्द है. कल रातको थोडी ज्यादा हो गयी साब !' या खलाशांच्या ठरलेल्या तक्रारी. मग जेवण, की पुन्हा बाराला ड्यूटी सुरू. तेव्हा आपापल्या झोपेसाठी एकेक जण उठणार.

अशा या रेंगाळणाऱ्या पार्टीत पुन्हा नवा रंग भरतो सेकंड इंजिनियर, थर्ड इंजिनियर आणि चीफ ऑफिसर हे त्रिकूट हजर झालं की. दोघंही इंजिनियर एकाच वर्गातले. सधन कुटुंबातले. चीफ ऑफिसर बेताच्या परिस्थितीतला घरची

सर्व जबाबदारी एकट्याने पेलणारा. तेव्हा या वयात आयुष्याकडे स्वप्नाळू दृष्टीने बघायला त्याला वावच नाही. तिथे व्यवहार हा ठायी-ठायी समोर उभा ठाकलेला. जेव्हा एकुलते एक असलेले हे दोघेजण एखादी वस्तु दुसऱ्यासाठी खरेदी करतात आणि ती दाखविताना 'अरे ! देअर ईज प्लेझर इन गिव्हिंग यार !' असं म्हणतात, तेव्हा चीफ ऑफिसरच्या चेहऱ्यावरच्या यातना लपत नाहीत. आमच्याशी बोलताना तो म्हणतो, 'हे एकुलते एक बापके बेटे, प्लेझर इन गिव्हिंग असे ढोंगीपणे म्हणू शकतात. कारण यांना पक्की खात्री आहे की, जे आपण कमावतो ती आपकमाई आणि बापकमाई आपलीच आहे. पण जेव्हा मला प्रत्येक पैशाचा हिशोब लावावा लागतो तेव्हा जीव मेटाकुटीला येतो.' हे तिघेही जमले की, त्यांच्या गप्पा मात्र मोठ्या ऐकण्यासारख्या असतात. पंचवीस सव्वीस वर्षांचं त्याचं वय. त्यामानाने पैसा खूप मिळतो. तेव्हा, 'अरे यार, ऐसा लॅव्हिश घर बनाअेगा, थंडरबर्ड गाडी लेगा ' वगैरे. ही चर्चा म्हणजे चालू पिढीचे युवा प्रतिनिधी. त्या मानाने आम्ही सगळेच मागच्या पिढीतले ! तेव्हा त्यांनी सारखी जुन्या पिढीविरुद्ध ओरड करायची आणि एकट्या नीलूने बाजीप्रभू सारखी खिंड लढवायची. आम्ही बाकीचे सगळे शेलारशिपाई— शेंदाडच म्हणा हवं तर !

हळूहळू रात्र अशी वाढत राहते, तशी गप्पांना भरती येते. वादविवाद रंगायला लागतात. रिकाम्या होत जाणाऱ्या बाटल्यांबरोबर आवाज चढत राहतात

अशी ही सगळी संध्याकाळी जमली आहेत. आमच्या लग्नाच्या वाढदिवसाची पार्टी आहे. मी शँपेनची बाटली उघडते. सगळेजण टाळ्या वाजवून आमचं अभिनंदन करतात. 'हॅपी वेडिंग ॲनिव्हर्सरी !' अशी आरोळी उठते. थंडगार शँपेनचा फेस बाटलीच्या तोंडातून उसळून येतो आणि माझ्या मनातल्या कुपीतली बावीस वर्षे ओसंडून बाहेर पडतात. मनात विचार येतो, खरंच, अरे, आपल्या लग्नाला बावीस वर्षे पूर्ण झाली ! तेव्हा आता मात्र आपण खऱ्याखुऱ्या प्रौढ झालो हं ! किनाऱ्यावरच्या लोकांच्या दृष्टीने तर आपलं वैवाहिक आयुष्य पार जुनं-पुराणं होऊन मोडीला गेलेलं असणार. पण आपल्याला अजूनही नुकतंच वर्ष-दोन वर्षांपूर्वी लग्न झालय असंच वाटतय, नाही ? ती नवी नव्हाळी— तो ताजेपणा— ती गोड हुरहुर, भेटण्याची ती उत्सुकता अजूनही प्रत्येक भेटीनंतर आपल्याला अनुभवाला येते ना ? मग एकावरच्या आकड्यात काळ आपल्या नियमानुसार भर टाकेना का ! त्याने हे एवढे भरमसाट आकडे वाढविण्याइतके आम्ही एकत्र राहिलो किती आहोत ? आम्ही एकत्र रहाण्यापेक्षा आमचा विरहाचा काळच जास्त मोठा नाही का ? मग त्यात शिळेपणा येणारच कुठून ?

बाबा सुरुवातीची चौदा वर्षे भारतीय कंपनीत होता. कंपनीचे हेडऑफिस मुंबईत असल्याने बोट दर फॉरिन ट्रिपसाठी भारताबाहेर जाताना, बहुधा मुंबईत चारपाच दिवस रहायची आणि पुन्हा परत आल्यावरही मुंबईत येऊन नंतर मद्रास, कलकत्ता वगैरे ठिकाणी जायची. निदान आमच्या बाबतीत तरी, मुंबईत बोट अजिबात आलीच नाही असे कधी घडले नाही. त्यामुळे साधारण तीनचार महिन्यांनी आमच्या भेटी व्हायच्या. सुरुवातीला वर्षाची फक्त दोन महिने रजा असायची. कधी-कधी मद्रास अगर कलकत्त्याला जास्त मुक्काम असला तर मी तिथेही जात असे. असा सुरळीत कार्यक्रम असायचा. पण तो कागदावरचाच ! बोटीच्या कार्यक्रमाची कायम जी अनिश्चितता असे, त्यामुळे प्रत्येक गोष्टीची वाट बघून जीव अगदी वैतागून जाई, सहनशक्ती पणाला लावावी लागे.

मला आठवतय, लग्नानंतर लगेचच दीड-दोन महिन्यांनी बाबाला परत जायचे होते. साधारण महिना होऊन गेला होता. आम्ही हॉटेलमध्ये जेवून, सिनेमा वगैरे बघून अगदी छान मूडमध्ये घरी आलो. तो घरी तार येऊन पडलेली– 'यू आर एक्सपेक्टेड टु कम टु बॉम्बे टुमारो मॉर्निंग टु जॉईन सो अ‍ॅण्ड सो शिप इन कलकत्ता.' तार, बघितली, आणि माझा मूडच खलास झाला. पण नोकरी म्हणजे इलाजच नाही. झालं लगेच आम्ही सामान आवरायची धावाधाव सुरू केली. तशी ऑफिसमधून साधारण कुणकुण लागली होती. पण सामान कितीही आवरलेलं असलं तरी आता निघायचं म्हटलं की, काही तरी राहिलय असे उगीचच वाटत राहते.

दुसऱ्या दिवशी भल्या पहाटे उठून गाडी पकडली. मी सामान वगैरे घेऊन माझ्या बहिणीच्या घरी गेले आणि बाबा सरळ ऑफिसमधे. तो काय बातमी आणणार याची वाट बघत मी घरी बसून राहिले. त्याचं दुसऱ्या दिवशीच्या संध्याकाळच्या मेलचं तिकीट होतं. हे ऐकून जरा दिलासा मिळाला. तेवढाच एक दिवस ! पण माझा मुंबईतला इंटरेस्ट नाहीसा झाला होता. दुसऱ्या दिवशी दुपारी त्यानं मला पुण्याच्या गाडीत बसवून दिलं आणि तो कलकत्त्याला रवाना झाला. गंमत म्हणजे, एवढी धावाधाव, पळापळ करून तो तिकडे पोचला तर, पुढे बोट तिथे पंधरा दिवस राहिली ती महिन्याने मुंबईत आणि पुढे चार महिन्यांची ट्रिप करून परत मुंबईत आली. ह्यावेळी बोटीचा मुंबईतला माल थोडा होता. पण कलकत्त्यात बोट चांगली वीस-पंचवीस दिवस राहणार होती; म्हणून आता मी कलकत्त्याला यायचं असं आम्ही ठरवलं. माझ्याबरोबर मुंबईच्या चीफ ऑफिसरची बायकोही येणार होती.

बोट कलकत्त्यात पोचल्याचे मला कळल्यावर, मी तिला आमच्या दोघींचे रिझर्व्हेशन करायला सांगितले आणि ठरल्याप्रमाणे आम्ही दोघी कलकत्त्याला गेलो. तिथे ठरल्याप्रमाणे नाही. पण पंधरा दिवस बोट राहिली आणि पुढे

सेलिंगच्या नवीन-नवीन बातम्या यायला लागल्या. बोट उद्या सेल होणार, परवा पहाटे होणार. निश्चित असा काहीच कार्यक्रम कळेना. शिवाय बोट निघून गेल्यावर त्या अनोळखी कलकत्त्यात आम्ही दोघी कुठे रहाणार ? गणपतीही जवळ आले होते म्हणून त्या दोघांनी आमचं मुंबईचं रिझर्व्हेशन केलं त्या रात्री बोटीवर आम्हाला सेंडऑफ पार्टी झाली. दुसऱ्या दिवशी संध्याकाळी बहुतेक सर्वजण सोडायला स्टेशनवर आले होते. त्यातले वयाने जे मोठे होते ते आमची समजूत घालत होते. मोठ्या उत्साहाने गप्पा मारत आम्ही मुंबईहून निघालो होतो आणि आता रुमालाने नाकडोळे पुसत, भरल्या अंतःकरणाने एकमेकांचे निरोप घेत आम्ही कलकत्ता सोडले. ठरल्याप्रमाणे बोटही दुसऱ्या दिवशी पण रात्री तिथून निघाली पण हुगळी नदीतही गेली नाही तो, बोटीचं इंजिन बंद पडलं म्हणून दुसऱ्या दिवशी सकाळी परत बंदरात आली. ती दुरुस्तीसाठी पुढे पंधरा–वीस दिवस कलकत्त्यात राहिली. ही बातमी वाचून आम्ही आमच्या नशीबाला दोष देत गप्प बसलो. सुरुवातीला असं काही घडलं की, चटकन डोळे ओले व्हायचे. घशाला कोरड पडायची पण आता मन निर्ढावलं आहे. आतल्या आत रडत डोळे न गाळता !

मला तर कित्येकदा असा अनुभव आला आहे की, मला पत्र येतं, 'बोट अमूक तारखेला मुंबईत येत आहे.' मी धावत मुंबईला येते आणि बोट नक्कीच आली की नाही याची खात्री करून घ्यायला ऑफिसमधे गेले तर, तिथे बातमी समजते, 'द शिप ईज् एक्स्पेक्टेट टु कम टुमारो ईव्हिनिंग.' मग एवढेसं तोंड करून ऑफिसच्या बाहेर पडावं तर, बोट बाहेर डॉकमधे उभी आहे अशी बातमी, त्याच बोटीवरचा माणूस दारात देतो ! साक्षात् डॉकमधे हजर असलेल्या बोटीचा ऑफिसमधल्या कारकुनाला पत्ताच नसतो. तो आपला कागदावरच्या जुन्या कार्यक्रमाकडे बघून मला बातमी देतो. नोकरीवर असताना ही अनिश्चितता अपेक्षित असते. पण जेव्हा हक्काची वर्षाची रजा येते, ती तरी वेळेवर मिळावी अशी इच्छा असते. म्हणून आपण असे कार्यक्रम आखावेत, बेत रचावेत...पण छे ! तुम्हाला पाहिजे तेव्हा रजा मुळीच मिळणार नाही हे सगळ्यांना अगदी पाठ होते. गंमत म्हणजे, तुमचा 'रिलीव्हर तुम्हीच शोधा' असे ऑफिसमधे चक्क सांगायचे. मग अगोदरच नेहमी घरातून तार जायची. कुणीतरी हॉस्पिटलमधे असायचं. मी तर साधारण अशी कायम सीरियस हॉस्पिटलमधे जाऊन पडायची. मग मात्र वाटेल ते झालं तरी रजा मिळायचीच. मला नेहमी वाटायचं, 'लांडगा आला रे आला' या गोष्टीतल्या सारखं, जेव्हा खरच कुणाला तरी हॉस्पिटलमधे ठेवावं लागलं तर, तोपर्यंत या येणाऱ्या तारांचा फोलपणा गृहीत धरून, ती तार खोटी समजून रजाच मिळणार नाही. मग मात्र पंचाईत व्हायची. पण ही झाली अगदी नोकरीत मुरलेल्यांची युक्ती ! सुरुवातीच्या नोकरीच्या आयुष्यात असा चान्स घेता येत नाही.

आमच्या लग्नानंतर आमचा पहिला दिवाळसण बाबा जेव्हा रजेवर येईल तेव्हाच साजरा करायचा असं सगळ्यांनी ठरवलं होतं. त्याला दिवाळीच्या अगोदर, निदान ऐन दिवाळीत रजा मिळेल अशी आम्हाला आशा वाटत होती. पण रजेचं काही चिन्ह दिसेना. मला दिवाळीच्या अगोदर तसं पत्र आलं होतं. तेव्हा आपण एकटंच दिवाळीसाठी माहेरी जावं म्हणून मी माझ्या माहेरी लोणावळ्याला चांगली पंधरा-वीस दिवसांच्या मुक्कामाला गेले. जाताना माझी माझ्या धाकट्या दिराशी-अरुणशी पैज लागली होती. तो मला म्हणत होता की, 'बाबा जर रजेवर आला तर तुम्ही नक्की धावत पुण्यात याल.' मला मनातून रजा नक्की मिळणारच नाही अशी शंभर टक्के खात्री होती. कारण पत्राची तशी साक्षच होती. तेव्हा त्याच्याशी पंचवीस रुपयांची (हे पैसे ६० सालातले आहेत) पैज मारून मी पुणं सोडलं होतं. दिवाळीच्या दुसऱ्या दिवशी सकाळी पुण्यात तार आली की, 'उद्या रात्री डेक्कनने मी पुण्यात येत आहे.' मी अर्थातच पुण्यात नव्हते. मला तांबडतोब त्याच दिवशी अरुणने लोणावळ्याला तार केली. मी मनात म्हटलं, 'मला बनवण्याची ही नक्कीच चालाखी आहे.' म्हणून मी चेष्टेवारी नेलं. दुसऱ्या दिवशीची डेक्कन लोणावळ्यावरून पुण्यात गेली. मी स्टेशनवर जाण्याचाही त्रास घेतला नाही. पुणे स्टेशनवर अरुण आणि त्याच्याच वयाचा चुलतदीर विजय एक सजवलेली बग्गी, फुलांचे हारतुरे वगैरे सरंजामानिशी आम्हाला घ्यायला स्टेशनवर आले होते. कारण लग्नात वरात काढायची नाही अशी बाबाची अट होती. मला मात्र त्याचा खूप राग आला होता. आयुष्यातली एकुलती एक हौसेने मिरवायची माझी संधी त्याने हिरावून घेतली होती. गाडी स्टेशनवर पोचली. मला बघायला बाबा दारात उभा होता. 'हे काय! वसुधा आली?' त्यानं आश्चर्यानं अरुणला विचारलं. त्या दोघांना वाटलं की, त्यांचीच ही गंमत चालली आहे. मी गाडीतच आहे. तेव्हा ते विचारायला लागले, 'हे काय! वहिनी आल्या नाहीत तुझ्याबरोबर?' जेव्हा मी तिथे नाहीच अशी सगळ्यांची खात्री पटली, तेव्हा मला न घेताच ती वरात टॅक्सीने घरी आली. बाबाला वाटलं, कदाचित यावर कळस चढवायला मी घरातच थांबले असेन. पण सगळ्या गोष्टींचा लवकरच उलगडा झाला आणि लगेच त्याने स्वतःच्या सहीने जेव्हा मला तार केली ती बघून अगदी तोंडात थप्पड बसावी तशी माझी अवस्था झाली.

तर अशी ही प्रत्येक वेळची नाट्यपूर्ण भेट अगदी सवयीची झाली आहे. जशा गोष्टी घडत रहातील तशा घडू द्यायच्या. त्यात सुख-दुःख मानायचं नाही, अशी, 'ठेविले अनंते तैसेचि रहावे' ही शिकवण या जगावेगळ्या अनोख्या आयुष्याने आम्हांला अगदी सुरुवातीपासून दिलेली आहे. ही अनिश्चितता हा आमच्या आयुष्याचा एक अविभाज्य भागच आम्ही मानला आहे.

असा हा चौदा वर्षांचा काळ गेल्यानंतर बाबा परदेशी कंपनीत गेला आणि मग अधूनमधून तरी घडणाऱ्या आमच्या भेटी कॉन्ट्रॅक्ट पद्धतीमुळे जवळजवळ वर्षावर्षाने घडायला लागल्या. हा फरक मात्र आम्हाला फारच जाणवला. ही कॉन्ट्रॅक्ट पद्धती म्हणजे कायम स्वरूपाची प्रॉव्हिडंड फंड, पेन्शन अशा पद्धतीची नोकरी नाही. अर्थात पगार इथल्या चौपट असतो. सहा महिने, नऊ महिने अगर वर्षं असं कॉन्ट्रॅक्ट केल्यानंतर त्या प्रमाणात पगारी रजा मिळते. तुमचा पगार हा रजेचा पगार धरूनच दिला जातो. रजा संपण्यापूर्वी पंधरा दिवस अगोदर रिपोर्ट करायचा की, पुन्हा नवीन कॉन्ट्रॅक्ट सुरू होतं. तुम्ही पुन्हा पहिल्याच कंपनीत गेलात तर, तुमची सिनिऑरिटी धरली जाते; नाहीतर नाही. अशा रीतीने सहा, नऊ महिने अगर वर्षाचं कॉन्ट्रॅक्ट करून गेलं तरी, पूर्वीच्या इन्कमटॅक्सच्या नियमा-प्रमाणे वर्षभर बाहेर रहावंच लागे. आर्थिक वर्षाच्या आत भारतात परत आलं तर, जबरदस्त टॅक्स द्यावा लागे. आता कायदे खूपच बदलले आहेत. म्हणजे करताना कॉन्ट्रॅक्ट सहा, नाहीतर नऊ महिने करायचं आणि पुढे वर्षभर वाढवून मिळावं म्हणून प्रार्थना करत बसायचं. असं वर्षभर बाहेर काढलं की, पुन्हा स्वतःचं घर असलं तर, दोन महिन्याच्या आत परत जावं लागे. वर्षा-सहा महिन्यांनी एकादा पाहुणा नाही का आपल्या घरी येत ? तस्संच.

पाहुणा म्हटलं आणि एका गंमतीदार प्रसंगाची आठवण झाली. भारतीय कंपनीत असताना सेकंड इंजिनियर अडलाखाला जसा पाहुणचार मिळाला त्याची ! त्यावेळी भारतीय बोटीचा मुक्काम मुंबईपेक्षा कलकत्त्याला नेहमीच जास्त दिवस असायचा. त्यामुळे कित्येक जणांनी कलकत्त्यातच आपली बिऱ्हाडं थाटली होती. अडलाखानीही असंच रजेवर असताना आपलं बिऱ्हाड मुंबईहून कलकत्त्याला हलवलं होतं. एका लहानशा बंगल्यात, मालकाच्या वरच्या मजल्यावर ब्लॉक मिळाला सामान वगैरे येऊन पडतं न पडतं तो नेहमीप्रमाणेच अचानक त्याला बोटीवर जावं लागलं आणि बोट कलकत्त्याहून मुंबईत राहून पुढे परदेशी गेली. मध्यंतरीच्या काळात त्याच्या बायकोनं घर वगैरे लावून, मुलांच्या शाळांच्या खटपटी करून सर्व गोष्टी मार्गाला लावल्या होत्या. साहजिकच घरात जी नवीन बंगाली मोलकरीण होती, तिला या माईजींचे साहेब कोण याचा पत्ता नव्हता. सुमारे चार-पाच महिन्यांनतर बोट परत कलकत्त्यात आली. पण डॉकमधे जागा नसल्याने बाहेर हुगळी नदीत म्हणजे कलकत्त्यापासून दहा-पंधरा मैलांवर नांगरून उभी राहिली. अडलाखाला साहजिकच घरी जायची खूप उत्सुकता होती म्हणून पायलट-बोटीवरून परत जाण्यापूर्वी तो आपल्याकडून नटूनथटून तयार होऊन बसला होता. अशा मोठ्या उत्साहाच्या भरात तो ऐटीत टॅक्सी करून घरी गेला. पण तो त्यावेळेला येणार याची त्याच्या बायकोला मुळीच कल्पना नसल्याने ती

सकाळीच आपल्या आवडत्या छंदासाठी म्हणजेच शॉपिंगसाठी घराबाहेर पडली होती, ती सावकाश दुपारीच परत येण्याच्या बेताने! अडलाखानी ऐटीत दारावरची बेल वाजवली. मोलकरीण दार अर्धवट उघडून डोकावली. तिच्या चेहऱ्यावरचा प्रश्नार्थक भाव त्याच्या लक्षातच आला नाही. त्यानी दार ढकलून मोठ्या दमदार पावलांनी आपला मोर्चा आत वळवल्याबरोबर त्या बाईने आपला आवाज चढवला आणि हातवारे, निरनिराळ्या खाणाखुणा करून माईजी बाहेर गेल्याचं त्याला सांगायचा प्रयत्न केला. तिची बंगाली भाषा अडलाखाला समजत नव्हती आणि त्याचं पंजाबी थाटाचं हिंदी तिच्या डोक्यावरून जात होतं. तो सांगायचा प्रयत्न करत होता की, 'बाई ग! ह्या माईजींचा मी नवरा आहे. या घराचा मालक आहे.' पण त्याला चोर, बदमाष समजणाऱ्या त्या बाईने त्याला घरात घ्यायचा मानेनं स्पष्ट नकार दिला आणि त्याच्या तोंडावर खाडकन दार लावून घेतलं. चेहऱ्यावर सणसणीत चपराक बसल्यासारखा बिचाऱ्या अडलाखाचा रुबाब एका क्षणात गळून पडला. आपल्याला ओळखणाऱ्या खुद्द मालकालाच बोलवावं या इराद्याने तो जिन्यावरून खाली धावत गेला. पण त्याच्या दुर्दैवाने मालकाच्या घरालाही भलंमोठ्ठं कुलूप होतं. शेवटी हताश होऊन तो बाहेर उन्हात भटकून थकल्याभागल्या चेहऱ्यानं परत आला तेव्हा स्वतः माईजींनीच त्याला गोऽऽऽड हसत, नवरा म्हणून घरात घेतलं

तर अशा या पाहुण्यासारख्या नवऱ्याला घरात नेहमी येणाऱ्या अडचणी डोळ्यांनी पहाण्याची संधी मिळणार कशी? आणि त्यांची तीव्रता जाणवणार तरी कशी? मुलं लहानाची मोठी होतात. त्यांची आजारपणं—त्यांचा अभ्यास, शाळेत घालताना करावी लागणारी धावपळ ही सगळी जबाबदारी घरातल्या मालकिणीची (मालकीण यासाठी म्हणते 'की मला म्हणे Mrs. So & So—यांचा नवरा असं म्हणूनच सगळे ओळखतात'—ही नेहमीची रास्त तक्रार असते). म्हणजे बायकोची! आणि याबद्दल मनात सुप्त रागही दबा धरून बसलेला असतो तो अशा एखाद्या प्रसंगानं उफाळून वर येतो.

बरेच दिवस झाले असतील ह्या गोष्टीला. बाबा रजेवर असल्यामुळे आम्ही नेहमीप्रमाणे संध्याकाळी खरेदीला जिमखान्यावर गेलो. खरेदी वगैरे झाल्यावर अलीकडच्या दुकानात बिल देईपर्यंत पलीकडून ब्रेड-अंडी आणण्यासाठी मी त्याला तिकडे पाठवलं त्यावेळी पुण्यात ब्रेडचा फार तुटवडा होता. 'ब्रेड शिल्लक नाही नुसती अंडी पाहिजेत का?' असा प्रश्न दुकानदारानं त्याला विचारला. तेव्हा काहीही न घेता त्याच्या नेहमीच्या सवयीप्रमाणे तो दुकानाबाहेर येऊन उभा राहिला. मी तिथे गेल्यावर, 'ब्रेड वगैरे काही शिल्लक नाही, असं तुझा दुकानवाला म्हणतोय.' असं रागातच त्यानं मला सांगितलं. म्हणून मी दुकानात गेले तो

दूकानदारानं खालच्या कप्प्यातला ब्रेड काढून माझ्या समोर धरला आणि वर, बाई हे तुमचे साहेब आहेत का? मला माहीत नव्हतं. नाहीतर मी ब्रेड दिला असता.' अशा शब्दांनी तिखटमीठ चोळल्यावर बाबाचा पारा आणखी जोरात चढला! सबंध रस्ताभर, 'मला इथे कुणी ओळखतच नाही. मला मुळी स्वतंत्र अस्तित्वच नाही! काय तर म्हणे हे तुमचे साहेब आहेत का?' असे एक ना दोन हजारो शब्द ऐकावे लागले. अर्थात हा पारा जितका भरकन वर चढला, तितकाच माझ्या समजुतीच्या शब्दांनी घरी जाईपर्यंत चटकन खालीही आला होता.

कित्येक वेळा काय होतं, हा पाहुणा घरी येतो, तेव्हा नेमक्या मुलांच्या परीक्षा चालू असतात. पण बोटीवरच्या कंटाळवाण्या कार्यक्रमामुळे आता रजेवर रोज खूप एक्सायटिंग घडावं असं त्यांना वाटतं. आज इकडे जावं, उद्या तिकडे जावं–कुणाकडे पार्टीला जावं, लोकांनी आपल्याकडे यावं अशी स्वच्छंदी फुलपाखरासारखी आपली रजा घालवावी अशी त्यांची रास्त अपेक्षा. यात व्यवहारातल्या अडचणींचा विचारच नसतो. पण घराची जबाबदारी सर्वस्वी पार पाडणाऱ्या बायकोला या उत्साहाला अधूनमधून बांध घालावाच लागतो. कारण ती सतत व्यवहार जगत असते

बाबा दरवर्षी घरी आला की, त्याला कधी-कधी घर चालवायचा झटका येतो. मग जिमखान्यावर जाऊन भाजी आणण्यापेक्षा मंडईतून एकदम आठवड्याची भाजी आणली की कसं समाधान मिळतं, अनेक प्रकार खूप मोठ्या प्रमाणावर दिसतात, त्यातून निवड कशी करता येते आणि स्वस्तही पडते वगैरे-वगैरे लेक्चर देऊन झालं की, दुसऱ्या दिवशी पहाटे उठून घरातून चालत मंडईला जाणे. (आजकाल आपलं आयुष्य अगदी ऐषारामाचं झालय. आपल्याला कुठल्याही शारीरिक श्रमाची सवयच उरलेली नाही इत्यादी इत्यादी) जाताना, 'मी बघ केवढ्या झपाट्यानं भाजी घेऊन येतो ते! तुम्ही बायका म्हणजे उगीचच तासन्तास घालवता पंचवीस पैशाची मेथीची जुडी आणाल पण त्याला तासभर खर्च करून वीस पैशात कशी आणली यातच आनंद मानून घरी याल बाई म्हटली की, भाजीवाला दहा–पंधरा पैसे किंमत जास्तच सांगणार हे कुठे तुम्हाला कळतय?' साड्यांचा सेल म्हटलं की, हीच व्याख्यानबाजी. म्हणे, 'मला तुम्हा बायकांच्या निर्लज्जपणाचा अगदी राग येतो आणि त्या बिचाऱ्या सेल्समनची कीव! एवढे ढिगारे त्याला उपसायला सांगून त्यातली कुठलीही साडी खरेदी न करता चक्क तिथून उठून जाण्याचा निर्लज्जपणा फक्त बायकांची जातच करू शकते. वर म्हणे, 'अहो' त्या साडीचा रंग, ह्या साडीचं डिझाईन आणि पलीकडच्या साडीसारखे काठ असलेली साडी नाही का तुमच्याकडे?' तेव्हा एकत्र खरेदी हा आमच्या दोघांच्या भांडणाचा एक वेगळा विषय आहे.

मी प्रथम परदेशी गेले तीही सिंगापूर, हाँगकाँग, लंडन, न्यूयॉर्क यासारख्या 'शॉपिंग पॅराडाईज' म्हणून प्रसिद्ध अशा ठिकाणी. मी एकदा दुकानात शिरले की,

माझ्या चेहऱ्यावर काहीतरी हरवल्याचा बावळट भाव दिसतो असं बाबा मला नेहमी म्हणायचा आणि प्रत्येक दुकानातून चक्क खेचून बाहेर आणायचा. 'अग, प्रत्येक वस्तूला तू हात काय लावून बघतेस ! आपल्याकडे ठीक आहे. रस्त्यातून चालताना सुद्धा तुम्ही बायका टांगलेल्या प्रत्येक साडीला हात लावून बघता ' वगैरे. पण खर सांगू, बायका मग त्या जगातल्या कुठल्याही देशातल्या असोत त्या इथून तिथून सारख्याच असतात असं मी अगदी स्वानुभवांनी सांगते. कारण कुठल्याही प्रचंड डिपार्टमेंट स्टोअरमध्ये जा, ड्रेस मटेरियल किंवा तयार ड्रेसेस घ्यायला आलेल्या बायका अशाच त्यावर तुटून पडलेल्या असतात. (त्यातून सेल असले तर झुंबड विचारूच नका.) प्रत्येक ड्रेस हातांनी 'फील' करत असतात. आपल्या समोरचा माल सोडून दुसरी जो ढिगारा बघते आहे किंवा ड्रेस सिलेक्ट करते आहे, तोच चांगला म्हणून तिकडे धावत असतात. हे अनेक वेळा मी मुद्दाम बाबाला दाखवलं आहे. त्यामुळे आता खरेदी विदआऊट कॉमेंट्री होते. पण हा गृहस्थ सारखा पैसे माझ्या स्वाधीन करून निर्विकार चेहऱ्यानं हात मागे घेऊन दुकाना-बाहेर उभा रहाणार. मला सांगणार, 'तू अगदी मनाचं समाधान होईपर्यंत हिंडून मनसोक्त खरेदी करून ये. मी अमूक ठिकाणी बसतो.'

एकदा अमेरिकेत असाच तो खरेदीला गेला असताना, त्याच्या बाबतीत गमतीदार किस्सा घडला होता. (सुदैवाने मी बरोबर नव्हते.). बोटीवरचे तिघेचौघे जण खरेदीसाठी बाहेर पडले. त्यापैकी एकाला आपल्या बायकोसाठी ड्रेस घ्यायचा होता. बाबाला त्याच्या बायकी, चिकित्सक (खास शब्द !) सवयीची चांगलीच माहिती होती. म्हणून तो त्याला म्हणाला, 'बाबारे ! तुम्ही आत जाऊन खुशाल ड्रेस निवडा. मी बाहेर उभा रहातो. असं चांगलं चारपाच वेळा घडलं. बाबा त्याला वैतागून म्हणाला 'अरे ए ! तुला कसा ड्रेस पाहिजे ते प्रथम मनाशी ठरव आणि मगच दुकानात जा बघू. ' दरवेळी एक जण बाहेर उभा रहातो आणि दोघंतिघ आत जातात हा प्रकार गुप्त खात्यातला एक साध्या कपड्यातला पोलीस बराच वेळ बघत होता. त्यानं एकदम समोर येऊन आपला एफ्-बी–आय चा बिल्ला दाखवल्यावर परिस्थितीचं गांभीर्य त्याच्या लक्षात आलं. जेव्हा परिस्थितीचा उलगडा केला तेव्हा तो पोलीस निघून गेला.

पुण्याच्या मंडईतल्या खरेदीवरून हा विषय अक्षरशः जगाचा फेरफटका मारून आला की ! तर भाजी आणायला घरातून बाहेर पडताना, सवयीची अशी काही वाक्यं जबरदस्तीनं ऐकावीच लागतात. त्याच्यांवर मी काही बोलत नाही. कारण हे नाट्य चार दिवसच काय, पुरते चार तासही चालणार नाही याची मला मनोमन खात्री असते. एका तासाभरात रिक्षा दाराशी येते आणि नेलेल्या सगळ्या पिशव्या शिगोशीग भरलेल्या पाहून मी ते ओझं वहायला बाईला खाली पाठवते.

आमचे चौकोनी कुटुंब. पण आठ–दहा माणसांच्या कुटुंबाला चांगला आठवडाभर पुरेल एवढा भाजीचा आवाका बघून माझ्या घशाला कोरडच पडते. स्वत:ला आवडतात म्हणून आंबाडीच्या गलेलठ्ठ जुड्या, चाकवत, पालक, तीन-चार फळभाज्या, काकडी, टोमॅटो, गाजर, सॅलड...सगळं सगळं एकाच वेळी (कच्चं सॅलड म्हणून !). आणि त्या त्या सीझनमध्ये बाजारात मिळणारी यच्चयावत् फळं. फळांचं आरोग्यातलं महत्त्व मला माहीत आहे हे मात्र गृहीत धरलेलं असतं. ही दोन दिवसाची म्हणून आणलेली भाजी न कुजवता फ्रीजमध्ये राखून ठेवून आलटून पालटून संपवताना माझ्या नाकात दम येतो. अर्थात् पालेभाज्या माझी या संकटातून लवकर सुटका करतात. मी मुद्दाम चावी मारते, 'केवढ्याची आणली भाजी ? हिशोब लिहून ठेव.' मग प्रत्येक भाजीची किंमत जुळवताना अशी काही अवस्था होते की, घर चालवण्याचा बेत पार बारगळतो. त्यांनी आणलेली भाजी निवडून ठेवताना माझ्या मोलकरणीची नेहमी रास्त तक्रार असते, 'बाई ! साहेबांना तुम्ही भाजी आणायला पाठवू नका. भाजीवाले त्यांना फसवतात,' असं म्हणत ती सोडलेल्या पालेभाजीमधला कुजका भाग मला दाखवते. मला मनातून माझ्या विजयाबद्दल आनंदाच्या उकळ्या फुटत असतात पण वरवर जरा मोठ्याने, 'अग' मी कशाला सांगते आहे ? त्यांना आवडतं म्हणून तेच जातात!' हे असे संवाद आमच्या घरी नेहमी चलतात.

हे जरी सगळं खरं असलं तरी, या पाहुण्याला पाहुणा म्हटलं तर फार राग येतो. त्याचा अहंकार डिवचला जातो. मला वाटतं बोटीवर राहून या खलाशांची सहन शक्ती इतकी खलास झालेली असते की, ती मुलांच्या बाबतीत तर मुळीच शिल्लक रहात नाही. मुलं जरा हट्ट करायला लागली, दंगा करायला लागली की, त्यांना ते मुळीच सहन होत नाही. म्हणून मुलं सहसा वडिलांच्या आसपास फिरकतच नाहीत. मुलांचा अभ्यास एकादेवेळी घ्यायला सांगितला की, आपलं पेपर वाचन सुरू. त्यांचा त्यांना अभ्यास करायला सांगायचा आणि जरा कुठं अडलं, की इतका आरडाओरडा सुरू करायचा की अभ्यासाला बसल्यापासून एकदोन मिनिटातच रडारड सुरू होते. मुलांना वेळीच संरक्षण द्यावे लागते. नाहीतर पुढचे शस्त्र उपसले जाण्याची, रण-कंदन माजण्याची भीती असते. प्रत्येकवेळा मुलांना एकदम सहा–आठ महिन्यांनी बघितले की त्यांचा शारिरीक बदल लक्षात येतो. पण त्यांच्या मानसिक जडण घडणीतही वयानुसार फेरफार होतात हे मुळी ते गृहीतच धरत नाहीत. मग त्याची सारखी जाणीव करून द्यावी लागते.

मला सुरवातीला सारखं वाटायचं इतका उतावळेपणा हे सगळेच जण प्रत्येक गोष्टीत का दाखवतात ? कुठे म्हणून सहन शक्ती नसावी म्हणजे काय ? पण पुढे जेव्हा मी अनेकवेळा ट्रीपला गेले तेव्हा मला माझ्या सगळ्या प्रश्नांची उत्तरे आपोआपच मिळाली. आतापर्यंत मी भारतीय कंपनीतल्या जनरल कार्गो बोटी-

वरून प्रवास केलेला होता. या बोटीत सर्व प्रकारचा माल भरला जातो. त्यामुळे बोट साधारण प्रत्येक बंदरामध्ये कमीत कमी पाच–सहा दिवस तरी रहायचीच. बहुधा गावाच्या आसपासच बंदर असायचे. त्यामुळे चालत नाहीतर टॅक्सीने तरी गावात हिंडता यायचं. पण जेव्हा परदेशी कंपनीतल्या 'बल्क कॅरियर' वर मी प्रवास केला तेव्हा माझ्याही सहनशक्तीची कसोटी लागली आणि या जीवनाची खरीखुरी कल्पना आली. अमेरिकेत टाम्पा येथे लोडिंग करून बोट रॉटरडॅमला जाणार ही बातमी दक्षिण अमेरिकेत चिली येथे असतानाच आम्हांला लागली होती. अर्थात् बोटीवर नेहमी कुठे जाणार ? किती दिवस राहणार ? याचा पत्ता कित्येक वेळा शेवटच्या क्षणापर्यंत लागत नाही. बोटीचा मुक्काम पहिल्या बंदरात अगदी महिना–दोन महिने असतो. पुढचा कार्यक्रम हा नेहमी गुप्त असतो. (मी चार्टर्ड शिपबद्दल म्हणते आहे.) कित्येक वेळा अगदी शेवटच्या क्षणी 'प्रोसीड अटलांटिक' असा एकदा संदेश येतो. आता अटलांटिक महासागर म्हणजे लक्ष्मी रोड, टिळक रोड आहे का ? पण आपल जात रहायचे मग चार पाच दिवसांनी 'नाऊ प्रोसीड टु सो अँड सो पोर्ट' असा नेहमीचाच खाक्या मला परिचित होता. पण टाम्पा म्हटल्यावर ही बातमी खरी ठरू देत अशी मी मनातल्या मनात प्रार्थना करत होते. टाम्पा फ्लॉरीडा स्टेटमध्ये आहे आणि वॉल्ट डिस्नेच्या लॉस एन्जल्स मधल्या 'डिस्नेलॅंड' सुधारित आवृत्ति 'डिस्नेवर्ल्ड'ची या नावाने उभारलेली आहे. ती टाम्पापासून अवघ्या पन्नास-साठ मैलावर आहे. आपल्याकडे पन्नास-साठ मैलाचे अंतर आपल्याला मोठे वाटते कारण वहानांची सोय आपल्याकडे बेताची आहे. पण अमेरिकन माणूस 'ओह ! इट्स् जस्ट थर्टी फॉर्टी माईल्स !' असे जिमखान्या-करून पूल ओलांडून गावात जावे इतक्या सहजतेने म्हणतो. शिवाय अमेरिकेत ग्रेहाऊंड बस सर्व्हिस आहे. अगदीच काही जमले नाही तर टॅक्सी करून जायचं अगदी एक दिवस मिळाला तरी काही करून 'डिस्नेवर्ल्ड' ला गेल्याशिवाय रहायचं नाही असा आम्ही पक्का बेत केला. मी मागे दहा-बारा वर्षापूर्वी टाम्पाला गेले होते तेव्हा डिस्नेवर्ल्डची उभारणी चालू होती. कॅलिफोर्निया मधलं डिस्नेवर्ल्ड बाबांनी बरेच वेळा पाहिले होते. त्याचे फोटो स्लाईडस् आमच्याकडे होत्या. त्याबद्दलचं एक पुस्तकही मी वाचलं होतं, तेव्हा माझी उत्सुकता शब्दात वर्णन करायला नको. आम्ही सॅन अॅन्टोनिओहून आणखी दोन लहान बंदरात गेलो आणि तिथे माल भरूच टाम्पाला आलो. हा सगळा काळ मी स्वप्नरंजनातच घालवला. तिथे आम्ही पोचलो तेव्हा संध्याकाळचे पाच-साडेपाच वाजले होते. माझा हिशोब हा की आता कस्टमस् आणि इमिग्रेशनचे लोक येऊन गेले की तासाभरात बाबाचं काम आटपेल. मग उद्याचा संपूर्ण दिवस रिकामाच आहे. सकाळी ब्रेकफास्ट झाल्याबरोबर निघालं तर संध्याकाळपर्यंत सेलिंगच्या आत आत

सहज परत येता येईल. या डिस्नेवर्ल्डचा आवाका कित्येक एकर आहे तेव्हा एका दिवसात असं कितीसं बघून होणार ? त्याला कमीत कमी आठ-दहा दिवस पाहिजेत. पण म्हणतात ना 'समथिंग ईज बेटर दॅन नथिंग.' तेवढ्यात एजंटनी बातमी दिली 'वुई होपफुली फिनिश द कार्गो इन ट्वेन्टी अवर्स.' म्हणजे दुपारीच एक-दोन ला केव्हातरी सेलिंग होणार. मी हे ऐकलंआणि मनातून पार खट्टू होऊन गेले. गेल्या कित्येक दिवसांचा प्रवास मी या नुसत्या आशेवर केला होता. दुपारी सेलिंग, तेव्हा कदाचित बाहेरही जाता येणार नाही तेव्हा आताच बाहेर जाऊन काही जरूरीच्या वस्तू आणूया कारण पुढे पंधरा-वीस दिवसांचा प्रवास आहे असं बाबानी मला सुचवलं, तेव्हा पुन्हा उसना उत्साह आणला. बल्क कॅरियर्स आणि टँकर्स यांचे डॉक्स गावाच्या नेहमी इतके लांब असतात की त्याच्या आसपास मनुष्यवस्ती फारशी नसते. कारखानेच असतात. आम्ही टॅक्सीसाठी फोन करून चांगले तासभर थांबलो पण टॅक्सीचं काही चिन्ह दिसेना. आमच्या दुर्दैवानी तिथे कसलासा पब्लिक हॉलीडे होता. त्यामुळे सगळी मोठी दुकानं बंद होती. शेवटी एक टॅक्सीवाला जवळच्याच एका दुकानात घेऊन गेला तिथे थोडीफार खरेदी करून पीझा घेऊन आम्ही परत बोटीवर आलो कारण तोपर्यंत बोटीवरचा डिनरटाईम संपला असता. दुसऱ्या दिवशी दुपारी सेलिंग म्हणून सकाळीच हायवेवरच्या शॉपिंग मॉल मधे गेलो. डॉक्सपासून चाळीस-पन्नास मैल असेल पण गेले पंधरा-वीस दिवस बाहेर पडलो नव्हतो आणि पुढे सलग पंधरा-वीस दिवस प्रवास होता त्यासाठी हा अट्टाहास केला. जातायेता टॅक्सीला वीस डॉलर्स (पाच-सहा वर्षापूर्वी) दिले आणि सेलिंग म्हणून धावतपळत बोटीवर आलो तर बातमी समजली की माल भरायच्या यंत्रात सकाळपासून बिघाड झाल्याने माल करणे तेव्हापासून बंदच आहे. त्याची दुरुस्ती केव्हा होईल हे कुणालाच माहीत नाही. कदाचित् रात्री होईल कदाचित उद्याही होईल. त्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी दुपारी चारला आम्ही तिथून निघालो. मनात म्हटलं हे जर अगोदर कळलं असतं तर ? पण ! हा पणच निरूत्तर करणारा होता.

मी मनाशी विचार केला की आपल्याला इथे काहीही काम नाही. कसलीही जबाबदारी नाही. दोन वेळा आरामात जेवायचं. सकाळी ब्रेकफास्ट करायचा. केबिनमधे स्टुअर्डनी आणलेली चहा–कॉफी फक्त उठून घ्यायची आणि झोपा काढायच्या असा आपला इथला कार्यक्रम ! असं एकादा दिवस बाहेर जायला मिळालं नाही तर आपण नाराज होतो. पण बोटीवर कित्येक वेळा अशा तऱ्हेनी लोक रहातात की बोट तीस-बत्तीस दिवसांचा अमेरिका ते जपान प्रवास करते आणि जपानमधे अवघ्या दहा-बारा तासात माल भरून ती पुन्हा तीस-तीस दिवसांच्या प्रवासाला रवाना होते. बल्ककॅरियर किंवा टँकरवर तर साधारणत: केवळ पत्रावर त्या त्या ठिकाणचं नाव लिहीण्यापुरताच गावाचा संबंध असतो. एवढ्या लांबच्या

प्रवासानंतर घरची पत्रं मिळतील खुशाली कळेल अशी आशा वाटत रहाते. त्या आशेवर दिवस मोजत मोजत प्रवास संपतो आणि बंदरात यावं तर पत्रं मुळी आलेलीच नसतात. सुदैवाने आलीच तर कधीची तरी जुनी पुराणी असतात. त्या अगोदरचं पत्र जर आधीच मिळालेलं असलं तर त्या पत्रात काहीच रस वाटत नाही. पत्र कधीही वेळेवर न मिळणे हाही या आयुष्यातला आणखी एक अविभाज्य भाग ! आमच्या बाबतीत पत्राला किती अनन्यसाधारण महत्व असतं हे सांगून कळणार नाही. काय होतं, ऑफिसमध्ये एकदम सगळी पत्रं गोळा करून तो गठ्ठा एखाद्या बंदरात पाठवला जातो. त्याच्यात एका दिवसाची चुकामूक झाली तरी बोट पुढच्या बंदरात आणि पत्र मागच्या बंदरात असा पाठशिवणीचा खेळ होतो. कंपनीचा एजंट मेल अगदी तत्परतेने पाठवावयाचा नेहमी प्रयत्न करतोच. पण कधी-कधी ती मधल्यामधे गहाळ होते आणि मग रजेवर गेल्यावर बायकोची पत्र वाचायचा प्रसंग येतो. या सगळ्या गोंधळामुळे दरवेळो तेच ते प्रश्न आणि त्यांना तीच ती उत्तर वाचावी लागतात.

मला वाटतं या खडतर जीवनाला सामोरं जाण्याइतकी मनाची तयारी हाही या लोकांच्या प्रशिक्षणाचा एक भाग असावा. सुमारे वर्षाच्या ' टी. एस्. राजेंन्द्र ' (पूर्वीची डफरीन) वरील प्रशिक्षणानंतर कुठल्याही कंपनीत पुढे दोन वर्षं कॅडेटला खलाशांच्या बरोबरीने काम करावं लागतं. यामध्ये जे पडेल ते काम असं गृहीत धरलेलं आहे. अगदी संडास बाथरूम साफ करेपर्यंत ! ही वयोमर्यादा अठरा ते वीस आहे. कारण हा कोर्स बारावी नंतर करता येतो. पूर्वी तो अकरावी नंतर होता. जर डायरेक्ट कॅडेट म्हणून गेलं तर तीन वर्षं घालवावी लागतात. या काळात सकाळी आठ ते बारा आणि दुपारी एक ते पाच पर्यंत काम करावं लागतं. ऊन-पाऊस-बर्फ, थोडक्यात कुठल्याही हवामानात डेकवर रहावं लागतं. बोट सतत खाऱ्या हवेत असल्याने तिला कायम गंज चढत रहातो. तेव्हा तो खरडून नवा रंग देण्याचे काम तर सतत चालू असते. माल भरल्यावर आणि उतरवून झाला की बोट धुवून साफ करणे-इतर काही किरकोळ दुरूस्ती. बोट समुद्रात असताना चीफ ऑफिसर बरोबर वर ब्रीजवर डयूटी करावी लागते. त्यामुळे प्रत्यक्ष पुष्कळच गोष्टी शिकायला मिळतात. रोज दुपारी सूर्य डोक्यावर आल्यावर आणि रात्री ताऱ्यांच्या सहाय्याने बोटीची जागा निश्चित करायची. त्यावरून बोटीचा वेग, तिला दिवसाला किती तेल लागलं वगैरेचे चार्टस भरायचे असतात. हल्ली बहुतेक सगळ्या गोष्टी यंत्राच्या सहाय्याने सुलभतेने करता येतात. बोटीचा जो ठराविक मार्ग असतो त्यावर कोर्स सेट करून ठेवला की बोट त्याच मार्गाने जात रहाते. याला ऑटो पायलट म्हणतात. समुद्राच्या लाटांचा जोर आणि वारा यामुळे बोट जरा इकडे-तिकडे गेली तरी ऑटो पायलटमुळे ती पुन्हा कोर्सवर

येते. पूर्वीच्या काळात एक सुकाणी कायम व्हील हातात धरून उभा राहिलेला असे. अशा तऱ्हेचं सर्व प्रत्यक्ष शिक्षण या कॅडेटस्‌ना त्यांच्या वरच्या अधिकाऱ्यांकडून मिळतं. या कॅडेटस्‌ना पूर्वी अतिशय कडक शिस्तीत वागवले जात असे. आता 'शिस्त' हा शब्द समाजाच्या शब्दकोशात सापडत नाही. ज्यांना शिस्त लावायची तेच मुळी लावणाऱ्यावर दंडुकेशाही गाजवायला मागेपुढे पहात नाहीत. पण ब्रिटिश जेव्हा या क्षेत्रात होते, तेव्हा कडक शिस्तीबाबत त्यांचा फार कटाक्ष होता. या शिस्तीबाबतचे अनेक किस्से जुन्या लोकांकडून ऐकायला मिळतात.

आमच्या एका बोटीवर कुलकर्णी नावाचा चीफ ऑफिसर होता. तो कॅडेट असतानाच्या गंमतीजमती मला नेहमी सांगायचा. स्वतः तो अगदी सोवळ्या महाराष्ट्रीय कुटुंबातला होता. सुरवातीला जेव्हा 'डफरीन'वर प्रशिक्षणासाठी गेला तेव्हा उच्च अत्याधुनिक कुटुंबांतून आलेल्या पंजाबी, ख्रिश्चन वगैरे पोरांनी त्याचा पुरताच मामा बनवला. पहिला प्रश्न म्हणजे भाषेचा. महाराष्ट्रीय मध्यमवर्गीय कुटुंबातून मॅनर्स पाळणे हा प्रकारच नसतो. थँक यू, प्लीज, एक्स्क्यूज मी असे शब्द बोलण्यातून वरचेवर फेकावे लागतात. महाप्रयत्नांनी आणि कष्टानी ! बाबा मला सांगत होता की समोर मेनुकार्ड आलं की यातलं काय मागवायचं तेच सुरवातीला मला कळायचं नाही. म्हणून मी चक्क डाळभात खाऊन उपाशी उठायचो. घरी कायम डाळभाताची सवय. टेबलावरचा मेनू बघितला की धडकीच भरायची. प्लेटमधे पडलेले मांसाहारी पदार्थ लवकर घशाखाली उतरायचे नाहीत म्हणून मी नेहमी तुकडे बाजूला सारून ग्रेव्ही प्लेटमधे घ्यायचो तर स्टुअर्ड मोठ्या प्रेमाने अगदी चांगले-चांगले तुकडे निवडून मला ते घेण्याचा आग्रह करायचा. पहिल्यांदा बोटीवर गेल्यावर सकाळी ब्रेकफास्ट टेबलवर गेलो. स्टुअर्डनी मोठ्या आदबीने मेनूकार्ड पुढे धरलं. फ्रूट ज्यूस–पॉरीज–टोस्ट बटर आणि एग्ज टु ऑर्डर अशी यादी होती. याला वाटलं हा अंड्याचा एकादा पदार्थच असावा. (बरं का ! हा काळ पंचवीस वर्षांपूर्वीचा–अहो त्या काळात पुण्यातल्या सनातनी कुटुंबात वाढलेले आम्ही लोक ! घरात अंडं आणणं म्हणजे अब्रह्मण्यम् ! तिथे अंड्याचं ऑम्लेट ऐकलेलं–दुसरे पदार्थ काय असतात कुणाला माहीत होतं !) त्यानी रूबाबात स्टुअर्डला 'हाँ ! पॉरीज् टोस्ट बटर और एग्ज टु ऑर्डर लावं.' म्हटल्यावर त्या ख्रिश्चन स्टुअर्डसकट टेबलावर सगळ्यांनी त्याची टर उडवली. जगातील एक आपली महाराष्ट्रीय ब्राह्मण जात सोडली तर इतर कुणालाही या मांसाहाराचा त्रास होत नाही. (ही सगळी चर्चा चालू परिस्थितीला आणि काळाला अनुसरून नाही याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.) महाराष्ट्रातले ब्राह्मण–दक्षिणेतले मद्रासी ब्राह्मण आणि गुजराथी ब्राह्मण एवढेच बहुधा सबंध भारतातले शाकाहारी लोक ! यापैकी मद्रासी आणि गुजराती या असल्या मार्गाकडे फारसे येतच नाहीत.

न्यूनगंड निर्माण करणारी दुसरी बाब म्हणजे कपडयांची, कुलकर्णी सांगायचा. ‘अहो इतर प्रांतीय लोकांइतका रूबाब आपल्याला जमत नाही. बहुधा सनातनी बंगाली कुटुंबातील मुलांचीही अशीच अवस्था होते. पण आहाराबाबत त्यांची अडचण होत नाही. ‘डफरीन’मधे असताना मी ह्या सगळ्या गोष्टी हळूहळू शिकलो. पण जेव्हा प्रथम बोटीवर जायचा प्रसंग आला, तेव्हा आयुष्यात प्रथमच मी इतके दिवस घरापासुन दूर राहिल्याने फार होमसिक् झालो होतो. माझ्या अगोदर वर्ष दीड वर्षे राहिलेला मुखर्जी नावाचा कॅडेट माझ्या मानाने खुपच निर्ढावलेला होता. बोट पाच सहा महिन्यांची परदेशची ट्रीप करून प्रथम मुंबईत आली. मला वाटलं आता लवकर काम आटोपलं की घरी जायला मिळेल. मुखर्जीलाही मी बरोबर चलण्याचा आग्रह केला. कारण तो कलकत्त्याचा होता. तो नको-नको म्हणत असताना मी त्याला तयार केला. तेवढ्यात चीफ ऑफिसरनी आम्हाला वरती बोलावलं. आमच्याकडून आम्ही केलेल्या रूबाबावरून एक तुच्छ कटाक्ष टाकून तो म्हणाला–‘ए किधर जाता है? (जहाजी हिंदी–फक्त तिथंच ऐकावं !) तुमको क्या समझा अब. पिक्चर का टाईम हो गया ? कम ऑन ! चेंज इन टु युवर बॉयलर सुटस्. ’ माझा चेहरा अगदी रडवेला झालाच हे मलाही समजलं. त्या चीफ ऑफिसरला मनातून शिव्या देत आम्ही कपडे उतरवून कामाला लागलो. दोन दिवस बोट मुंबईत राहूनही त्यानी आम्हाला जमिनीवर पायही ठेवून दिला नाही. मुंबईच्या अनुभवावरून शहाणे होऊन मी आणि मुखर्जी बोट कलकत्त्याला बंदरात आली तरी बसून राहिलो. तर तोच ऑफिसर धावत आमच्या केबिनमध्ये आला. ‘ए बॉईज् ! व्हाय यू आर वेस्टिंग युवर टाईम ! टेक धिस मनी, गो आऊट अँड एन्जॉय युवरसेल्फ. ’ असं म्हणून त्याने आपल्या खिशातून पन्नास साठ रुपये काढून दिले आणि आम्हाला बाहेर पिटाळलं. हा चीफ ऑफिसर जेव्हा त्याचे नातेवाईक आणि विशेषतः गर्ल-फ्रेंडस् बोटीवर यायच्या असल्या म्हणजे आम्हाला गँगवेवर (जिन्यावर) उन्हातान्हात तासन्तास त्यांना रिसीव्ह करायला उभं करून ठेवायचा. त्यांना जाता येता सलाम ठोकायचे. त्याच्या केबिनबाहेर काय हवं नको ते बघायला उभं रहायचं. पुन्हा पाहुणे परत यायच्या वेळी टॅक्सी वगैरे आणून पुन्हा गँगवेवर सॅल्यूट ठोकायला उभं रहायला सांगायचा. मी म्हटलं, ‘अशा तऱ्हेने तुम्हाला निगरगट्ट बनवलं की तुमचं पुढचं आयुष्य सुसह्य होत असेल आणि तुम्हाला आपल्या जबाबदारीची पूर्ण जाणीव सदैव रहात असेल नाही का ?’

इंजिनियर्स लोकही चार वर्षाचा डी. एम्. ई. टी. चा कोर्स करतात. मुंबईत माझगाव डॉक्समध्येही ट्रेनिंग घेता येतं. कोर्स पास झाल्यावर बोटीवर फिफ्थ् किंवा सिक्स्थ इंजिनियर म्हणून येणाऱ्याला कॅडेटप्रमाणेच प्रत्यक्ष ट्रेनिंग मिळतं. रोज

आठतास धगधगत्या इंजिनरुममधे काम करावं लागतं. मी इतके वर्ष बोटीवर जाते आहे. पण अजून प्रत्यक्ष इंजिनरुममध्ये पाऊल ठेवण्याचं धाडस मी काही केलं नाही. या सगळ्या कामाच्या वेळा सांभाळून वरच्या परीक्षा द्यायच्या असतात. अठरा महिन्यांचा सीटाईम (पूर्णवेळ बोटीवर रहाण्याचा काळ) भरला की परीक्षेला उतरता येते. या परीक्षा 'डायरेक्टर जनरल ऑफ शिपिंग' तर्फे घेतल्या जातात.

रेडिओ ऑफिसरचा कोर्स हा 'मिनिस्ट्री ऑफ कम्युनिकेशन, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया' यांच्या तर्फे घेतला जातो. सेकंडक्लासची परीक्षा पास झाल्यावर एकदम ऑफिसर म्हणून जाता येतं. नंतर फर्स्टक्लासची परीक्षा देणे बंधनकारक नाही.

अशा रितीने या आयुष्यात मनाचा कणखरपणा आवश्यक असला तरी पुढे पुढे भावविवशता जाणवते. सुरवातीला तरुण वय, त्या वयात इतरांच्या मानाने मिळणारा भरपूर पैसा, परदेशी जाण्याची वरचेवर येणारी संधी, बोटीवरचा रुबाब–परदेशातल्या मोहमयी वातावरणाबद्दल ऐकलेल्या आणि वाचलेल्या हकीगती आणि परदेशी वस्तूंचं आकर्षण या सगळ्यामुळे सळसळत्या रक्ताचा ओढा या क्षेत्राकडे असल्यास मुळीच नवल नाही. परंतु जसजसं वय वाढत जातं तसं हे आकर्षण ओसरायला लागतं. दरवेळी बायको मुलांपासून दूर रहावं लागतं. नेहमी त्यांना बोटीवर नेणे जमत नाही. कित्येकांना स्वतःच्या संसाराबरोबर आईवडील अगर भावांच्या संसाराला हातभार लावावा लागतो. जगात हिंडल्याने दृष्टिकोणही विशाल झालेला असतो. तेव्हा स्वतःचं घर–गाडी–फर्निचर हे आवश्यक ठरतं. यासाठी इतके वर्ष किनाऱ्यापासून दूर रहाणाऱ्यांना किनाऱ्याची ओढ तर असते पण पशाचा मोह सोडवत नाही. कारण जमिनीवर त्याप्रमाणात पैसा मिळणच शक्य होत नाही. मग सगळ्यात सोपा उपाय म्हणजे बिझिनेस! असं तीनचार पेग पोटात गेल्यानंतर सगळ्यांनाच वाटतं. कोणता? कशाचा? याच्या मोठ्या मनोरंजक चर्चा चालतात. एकमेकांचे प्लॅन्स् पुढे येतात. पुन्हा दुसऱ्या दिवशी रुटीन सुरू होतो. आयुष्यातली पहिली अनेक वर्ष व्यवहारी जगापासून दूर राहिल्याने छक्केपंजे तर राहोतच, या खलाशांना साधे व्यवहारही कळत नाहीत. त्यांच्या पैशावर कुणीतरी केलेला बिझिनेसचा प्रयत्न फसल्यावर पुन्हा गाशा गुंडाळून बोटीवर आलेले बरेचजण दिसतात. या जीवनाशी अगदी समरस होऊन जे लोक बोटीवर रहाण्यातच समाधानी असतात, त्यांना मी 'बॉर्न सेलर्स' म्हणते.

आता परदेशी कंपनीत गेल्यापासून गेले पाच सहा वर्षं प्रत्यक्ष बोटीवर पोचेपर्यंत सहनशक्तीचा कसा कस लागतो ते सांगते.

पहिल्या कॉन्ट्रॅक्टची रजा संपण्यापूर्वी पंधरा दिवस अगोदर ऑफिसला रिपोर्ट केला की नंतर कुठल्या दिवशी हजर व्हावं लागेल याचा नेम नसतो. मग रेशनच्या लाईनमध्ये कार्ड आणि पिशव्या सांभाळत आपल्या नंबराची वाट बघावी तशी आपल्या सामानाची बांधा बांध करुन पुढच्या तारेची वाट बघायची. मुंबईत असेल तर एकदिवासाआड फोन करून नाहीतर समक्ष चौकशी करत रहायचं. बहुधा मुंबईत एजंटकडे काही निश्चित बातमी समजत नाहीच. कारण कंपनीचं हेडऑफिस परदेशात तेव्हा तिकडून बातमी येणार त्यावरच एजंटला अवलंबून रहावं लागतं. त्यामुळे ह्या मधल्या काळात त्रिशंकूसारखी अवस्था होते. मुंबईतल्या मुंबईत ती इतकी जाणवत नाही. पण दुसरीकडे असेल तर गाव सोडून जाता येत नाही. कुठलाही कार्यक्रम निश्चित ठरवता येत नाही. आता जायचं आहे तर आलेला दिवस जास्तीत जास्त मजेत घालवायचा प्रयत्न करावा तो त्या आनंदावर विरजण घालणारी दुसरी तार येऊन थडकते. ' रिपोर्ट ऑन सो अँण्ड सो डेट टु जॉईन सो अँण्ड सी शिप. ' कुठे जाणार हे समक्ष गेल्याशिवाय कळत नाही.

मग ते नेहमीचे तेच ते नाट्यपूर्ण प्रसंग. दिलेल्या तारखेअगोदर एक दोन दिवस मुंबईत जायचं ते मेडिकल वगैरे उरकण्यासाठी. तिथे तर इतका वेळ जातो की विचारु नका. कारण त्या डॉक्टरला माहीत असतं इथे काही नगदी फी मिळणार नाही. कंपनीचा मामला. मग सार्वजनिक दवाखान्यात पेशंटची जितपत दखल घेतात तितपतच आस्था हा डॉक्टर ऑफिसर लोकांना दाखवतो. बिचाऱ्या खलाशांना तर कत्तलखान्यात जनावरांवर शिक्का मारतात ना तसं वागवलं जातं. पूर्वी साधारणतः बोट बहुधा मुंबईत जॉईन करावी लागे. त्यामुळे ही यातायात मेडिकल झाली की संपत असे. पण आता परदेशी कंपनीत बोट नेहमी जगाच्या पाठीवर कुठेतरी जॉईन करावी लागते. त्यामुळे एकदा घर सोडलं की अगदी एकाकी वाटायला लागतं. अवती-भवती नातेवाईक मित्रमंडळी असतात. पण त्यांच्या सहवासात मन रमत नाही. फोनवरुन जेव्हा बोटीचं नाव आणि तिचा रन समजतो तेव्हा, ही बोट चांगली आहे. तेव्हा पुढे मागे मला येता येण्यासारखी आहे. भारताच्या आसपास आली तर मला जास्त त्रास न पडता येईल वगैरे बेत आम्ही रचलेले असतात. दुसऱ्या दिवशी ऑफिसमधे जावं तर पुन्हा दुसरी नवीन बातमी ऑफिसमधला कारकुन देतो. ' मिस्टर गोखले ! आय अॅम व्हेरी सॉरी. बट अॅकॉर्डिंग टु द न्यू मेसेज यु आर जॉईनिंग सम आदर शिप...पोर्ट. ' आयत्या वेळच्या या बदलाने अगोदर रचलेले मनोरे केव्हाच कोसळून पडतात. त्यातून बल्क कॅरियर असेल तर आशेचा किरण कुठेतरी दिसतो.

आम्ही ऑफिसमधून घरी परततो. आता पुढे होणाऱ्या दीर्घ काळाच्या विरहाच्या विचाराने तर एकमेकांशी किती बोलू आणि किती नाही असं झालेलं असतं. पण टॅक्सीत शेजारी बसूनही तोंडातून शब्द बाहेर पडत नाहीत. दुसऱ्या दिवशी ऑफिसमधून तिकिट आणायचं आणि रात्री विमानतळावर जायचं एवढा कार्यक्रम निश्चित असतो. तेव्हा दुसऱ्या दिवशी ऑफिसमधून तिकीट घेतलं की शेवटचा दिवस आरामात बाहेर जेवून वगैरे घरी जाण्याचा केलेला एवढा साधा बेतही बहुतेक वेळा पार पडत नाही. ऑफिसमधला कारकून निर्विकारपणे सांगतो, 'अजून तिकीट आलेलं नाही. हे बघा मी कंपनीचं लेटर देतो. तुम्हीच एअर-लाईन्सच्या ऑफिसमधून समक्ष घेतलत तर काम लवकर होईल.' एवढं होईपर्यंत बारा वाजून गेलेले असतात. साडेबारा ते दीड लंचअवर. तेव्हा साडेबाराच्या आत एअरलाईन्स्च्या ऑफिसमधे पोचायचं. व्हिसा तयार असेल तर नशीबच. नाहीतर त्यासाठी वेगळी पळापळ. मग कसलं आरामात जेवण आणि काय? कुठे तरी एवढसं खाऊन वेळ भागवली की पुन्हा धावपळीला सुरवात. एअरइंडियाचं तिकीट असेल तर वैतागात भरच. मला एअरइंडियाचं ऑफिस आणि एस्. टी स्टँड यांत अलीकडे काहीही फरक जाणवत नाही. (गल्फचं आपल्याकडील महत्त्व वाढल्या-पासून हे असं झालं आहे.) तशीच ती गर्दी. वाट बघत बसण्याचा कंटाळवाणा प्रकार. फरक एवढाच की तिथे जमलेले प्रवासी एस्. टी. पेक्षा अनेकपट भाड्यासाठी पैसे मोजतात तेव्हा एस्. टी स्टँडवरच्या निर्विकार चेहऱ्याच्या कारकूनाऐवजी आपल्या रंगलेल्या चेहऱ्यावर खोटं खोटं हास्य फुलवणाऱ्या रिसेप्शनिस्टकडून आपण तिकीट घ्यायचं आणि तिने यांत्रिकपणे प्रत्येकाला 'बॉन व्हॉएज' म्हणून सदिच्छा प्रकट करायची.

एवढे होईपर्यंत चार वाजून जातात. इतर ऑफिसेस् सुटायचीही वेळ होते. तेव्हा टॅक्सी मिळून मुक्कामाला पोचेपर्यंत तास सहज लागतो. परदेशी जाणारी विमानं बहुधा रात्री बारानंतर असतात. म्हणजे रिपोर्टिंग टाईम अगोदर एक तास घरातून निघावच लागतं. दरवर्षी बाबाला विमानतळावर पोचवण्याचा हा एवढा सोहळा असतो. मग आमचा वैताग संपून त्याच्या एकट्याच्या वैतागाला सुरुवात होते. साधारणतः मुंबईहून डायरेक्ट बाहेरची फ्लाईट कधीच नसते. अगोदर दिल्ली. तिथे चार-पाच तास थांबून नंतर पुढची फ्लाईट! कधीकधी आठ-दहा तासही ताटकळत बसावे लागते. पण हा काळ बारा तासांपेक्षा कमी असल्याने विमान कंपनी हॉटेलचीही सोय करत नाही. असा साधारणतः छत्तीस ते अठ्ठे-चाळीस तासांचा प्रवास असतो. विमानाच्या अशा प्रदीर्घ प्रवासानंतर मुक्कामाला पोचल्यावर चक्क आजारपण येतं.

सुरुवातीला मुलं बिचारी विमानतळावर जायला मिळणार म्हणून खूप उत्साहानी बरोबर यायची. पण पुढे पोचवायला जाण्यातला फोलपणा त्यांनीही

ओळखला. मला तर पहिल्यापासूनच विमानतळावरून निरोप देणे हा प्रकार जीवघेणा वाटतो. आम्ही विमानतळावर पोचलो की बाबा लगेच सामान वजन करायच्या, पैसे बदलायच्या धावपळीला लागतो. आम्ही प्रवेश फी भरून आत जातो. पूर्वी आम्हा सगळ्यांना कस्टम्स्‌पर्यंत बरोबर जाता येत असे. पण हल्ली नव्या नियमांनुसार सगळ्यांनी जाळीच्या बाहेर उभं राहून आत गेलेल्यांच्या हालचाली बघायच्या. म्हणजे टॅक्सीतून उतरलं की आपला संबंध जवळजवळ संपतोच. त्यामुळे टॅक्सीत बसलं की लगेच आपला एकटेपणा जाणवू लागतो हल्ली तर मी त्याच टॅक्सीने लगेच परत येते सुरुवातीला असा निरोप देताना मला माझे अश्रू मुळीच आवरत नसत. बाबा मला नेहमी म्हणायचा ' हे बघ ! तू अशी रडायला लागलीस की मला उगीचंच अपराध्यासारखं वाटतं आणि तुझी तीच प्रतिमा माझ्या नजरेसमोर रहाते. तेव्हा तू मला असा निरोप देऊ नकोस. ' आता असे प्रसंग वारंवार आल्याने अश्रू आवरता येतात. पूर्वी निरोप दिला की मी वर प्रेक्षकांच्या गॅलरीत जात असे. तेव्हा तो एकटेपणाच हवासा वाटे. कुणाशी बोलू नये, दूर कुठंतरी उभं रहावं असं वाटे. कस्टममधून बाहेर पडलेले सर्वजण बसमध्ये चढताना हात हलवत. आपणही मानसिक समाधानासाठी हात वर करायचा. विमानाची दारं बंद होत. इंजिनची घरघर सुरू होई. विमान सुटायचा इशारा लाल दिवा देत राही. विमानाची चाकं हळूहळू धावपट्टीवरून सरकायला लागत. तोपर्यंत मी भावनावेग आवरून धरत असे. पण एकदा का विमानानी टेकऑफ घेतला आणि त्याचा जमिनीवरचा संबंध संपला की, आता आपण मागे एकट्या राहिलो, या तीव्र जाणिवेने पोटात कालवाकालव होई. मोठ्या झालेल्या मुलांपुढे हे बरं नव्हे असा विचार करून मी रुमालाने डोळे कोरडे करायचा प्रयत्न करत राही. पण चेहऱ्यावर उमटलेले भाव मी कसे पुसणार ?

हल्ली मी लगेच घरी परतते आणि पुण्याच्या वाटेला लागते. पूर्वी अशीच मी वाटभर काळजीने ग्रस्त असायची. विमान सुखरूप मुक्कामाला पोचेल की नाही ? तीनचार ठिकाणी विमान बदलायचं आहे. मग विमानांचे ऐकलेले अपघात उगीचच मनात यायचे. एक लहानशी यांत्रिक व तांत्रिक चूक शेकडो जीवांचे प्राण अवघ्या क्षणात कसे घेते हे वाचलेलं असायचं. इतर अपघात आपण वाचतो पण त्यात नशीबाच्या जोरावर जिवंत रहाण्याची बरीचशी शक्यता असते. विमानाचा प्रवास म्हटला की एक तर तुम्ही मुक्कामाला पोचता नाहीतर नाही. असे नाही नाही ते विचार मन पोखरत रहायचे. पण आश्चर्य म्हणजे जगातल्या एकंदर अपघातांची संख्या बघता विमानाच्या अपघाताचं प्रमाण सगळ्यात कमी आहे. पण इतका सूज्ञपणा सुचला तर ते वेडं मन कसलं ? घरी पोचलं की केव्हा एकदा तार किंवा पत्र येतय आणि खुशाली कळते आहे असं व्हायचं. पोस्टमनची

मी आतुरतेनी वाट पहायची. तशा त्या जीवघेण्या अवस्थेत बातमी घेऊन येणारा पोस्टमन मला साक्षात् परमेश्वर वाटायचा आणि मनाचा सगळा भार एकदम हलका व्हायचा. हल्ली मीही अनेकवेळा विमानाचा प्रवास केल्याने किंवा वाढत्या वयामुळे जरा समज आल्यामुळे असेल, पूर्वीची भीती आता राहिलेली नाही. तेव्हा मी उगीचच डोक्याला ताप करून न घेता तो भार परमेश्वरावर टाकते. त्याच्यावर पूर्ण श्रद्धा ठेवून !

वर्षाली लहान असल्यामुळे सुरवातीला दोन तीन वर्ष 'दोन ध्रुवावर दोघे आपण' अशीच काढावी लागली. ती तीन वर्षाची झाल्यानंतर आता तिला बरोबर न्यायला हरकत नाही. तेव्हा आता यावेळी तिच्यासह बोटीवर जायचं ठरवलं. अगदी लहान मुलं–पुढे त्यांच्या शाळा ह्यातर अडचणी असतातच. शिवाय विमानानी इतक्या लांब जायचं यायचं म्हणजे प्रवास खर्चासाठी तीस ते चाळीस हजार सहज लागतात. (खलाशांना तीस टक्के सवलत असते तरी !) मग तिथं निदान सात–आठ महिने तरी रहायला मिळालं तर ठीक; नाहीतर काहीच अर्थ नसतो. एवढं जुळवलं तरी कंपनीची ऑफिशियल परवानगी यावी लागते. त्यांच्याकडून तिकीट यावं लागतं. कंपनीतर्फे तिकीट असलं की त्यांचा त्या त्या ठिकाणचा एजंट विमान तळावरून न्यायची व्यवस्था करतो. बोट जर बाहेर नांगरलेली असली तर बरेच वेळा बाहेर हॉटेलमध्ये थांबावे लागते. थोडक्यात भारतातून निघाल्यानंतर बोटीवर पोचेपर्यंतची सर्वस्वी जबाबदारी एजंटची असते. अर्थात त्याची वेगळी फी द्यावी लागते, पण ती सुरक्षिततेसाठी असते. हे सगळं जमलं तरी बोट कशी आहे ? तिचा रूट कुठला आहे ? बोटीवर ऑफिसर्स कोण आहेत ? कुणाची बायको कंपनी म्हणून आहे की नाही ? याही गोष्टींचा थोडाबहुत विचार करावाच लागतो.

मी गेली अनेक वर्षं परदेशप्रवास करते आहे. पण अजूनही मला मनापासून मांसाहार चालत नाही. त्यामुळे ठिकठिकाणी एजंटनी दिलेल्या मोठमोठ्या पार्टीज् आणि पंचतारांकित हॉटेल्समध्ये राहूनही मी खरोखरीच उपाशी रहाते. तसं पाहिलं तर भारतातील कुठल्याही जहाज कंपनीतलं जेवण हे भारतीय चवीचं पण पाश्चात्य पद्धतीचं असतं. कारण तिथे निरनिराळ्या प्रांतातून निरनिराळ्या आहार पद्धतीचे लोक आलेले असतात. त्यांच्या भाषा वेगळ्या. रीतिरिवाज वेगवेगळे. इतकंच काय, जेवण बनविण्याची पद्धतही भिन्न असते. भारताची

राष्ट्रभाषा जरी जाहीररित्या हिंदी असली तरी ती सगळ्यांना नीट येत नाही. (निदान असं बरेच जण दाखवतात तरी.) मग तिचं जे मोडकंतोडकं स्वरूप तयार होतं तेच जहाजी हिंदी ! (अस्सल हिंदीवाला हिंदीचं ते वस्त्रहरण बघून थंडच पडतो.) असे हे भिन्न प्रांतीय आणि भाषीय लोक मग इंग्रजीचाच सर्रास उपयोग करतात. या सरमिसळ लोकांना खूष करण्यासाठी चीफ स्टुअर्ड भारतीय आणि पाश्चात्य पद्धतींवर अत्याचार करत असतो. भारतीय कंपन्यांतून चपाती–डाळभाजी हे पदार्थ असतातच. पण कुठलीही भाजी ही चवीला सारखीच लागते. कारण ती भाजी म्हणजे कांदा, लसूण, आलं, टोमॅटो अधिक ती भाजी असं मिश्रण असतं. सकाळचा ब्रेकफास्ट मात्र इतका चांगला आणि परिपूर्ण असतो की त्याच्यावर संध्याकाळपर्यंतसुद्धा रहाता येईल. पण कुठेही बाहेर पार्टीला जायची माझी मुळी लायकीच नाही, असं मी बाबाला नेहमी म्हणते तरीही जावं लागतंच.

भारतीय कंपनीत असताना की, लंगला (तैवान, पूर्वीचं फोर्मोसा) आम्हाला एजंटनी जी पार्टी दिली ती माझ्या सगळ्यात लक्षात जास्त राहिली आहे. त्यावेळी मी आणि चीफ ऑफिसरची बायको बरोबर होतो. चायनीज् डिशेसची डेलिकसी तर जगप्रसिद्धच आहे, आणि त्यातून खुद्द चायना मधल्या एका बड्या हॉटेलमधे दिलेली ती पार्टी म्हणजे चक्क ट्वेन्टीफोर कोर्स डिनर ! सुरवातीला शार्कफिन सूप सगळ्यांना दिल्यावर डोळ्यासकट नुसताच स्टीम केलेला भलामोठा पापलेट टेबलवर आला. तो माझ्या जरा परिचयाचा होता. नंतर चोच डोळ्यासकट स्टीम केलेली भली मोठ्ठी कोंबडी मधोमध ठेवल्यावर मी तीही थोडी प्लेटमधे घेण्याचा प्रयत्न करत होते. तोच आमच्या दोघींच्या मधे बसलेला एजंट कटाक्षाने खास तुकडे आमच्या प्लेटमधे टाकू लागला. मी बोलून चालून भटीण ! माझं तर सोडाच, पण चीफ ऑफिसरची बायको पंजाबी असूनही ती कोंबडी बघून 'मेरे पेटमें कैसा तो भी लगता है' असं हिंदीतून मला म्हणत होती. त्यानंतर आलं हनीड्डक म्हणजे 'अरेबियन नाईटस्' मधल्या गोष्टीतलं 'मधात तळलेलं बदक !' या प्रत्येक पदार्थाबरोबर वेगवेगळी वाईनही येत होती आणि एजंटचा त्याचाही आग्रह चालला होता. (हा एजंट माझ्या अजून डोळ्यापुढे आहे. कारण त्याच्या डाव्या गालावर जो मस होता त्यावर चांगला फूट दीड फूट लांब केस खाली लोंबत होता. तो का कापत नाही असं कुणीस विचारल्यावर 'ही भाग्याची खूण आहे.' असं तो म्हणाला ) या मधात तळलेल्या बदका बरोबर पांढऱ्या शुभ्र मैद्याच्या पातळ पोळ्यासारखा पदार्थही आणला होता. आपल्याकडे पानवाले पानाला लाल कात जसा लावतात तसाच एक जेलीसारखा पातळ लाल पदार्थ त्या पोळीला चोपडायचा आणि त्यामधे मधात तळलेल्या त्या बदकाचे तुकडे ठेवून त्याची गोल गुंडाळी करायची. मी ती गुंडाळी तोंडाशी नेली खरी पण

खावीशी वाटेना. मी अलगद आतले तुकडे खाली टाकले आणि नुसती पोळी खाल्ल्याचा आविर्भाव करत राहिले. कारण त्यानंतर आलेला भला मोठ्ठा खेकडा आता प्लेटच्या बाहेर पडतो की काय याचीच मला धास्ती पडली होती. ( तो जिवंत नाही हे समजत असूनही. ) या सगळ्या दृश्यांनी माझी भूक तर पार मरून गेली होती. पोटात ढवळायला लागलं होतं. बाहेर दुकानादुकानातून यीलस् ( गाडुळाच्या रंगाचे सापासारखे दोन्हीकडे तोंड असलेला प्राणी ) टांगलेले मी पाहिले होते. तो टेबलावर आला तर मात्र मी नक्की खुर्चीतून उडणार याची मला खात्री होती. पण माझ्या सुदैवानी त्यांचा त्या कोर्समधे समावेश नव्हता. आम्ही दोवी सोडून बाकीचे सगळे त्या पदार्थांचा चवीने समाचार घेत होते. तर सांगायचा मुद्दा हा की मी बोटीवर परत आल्यावर स्टुअर्डला माझ्यासाठी सँडविचेस् आणि कॉफी आणायला सांगितली. तो माझ्या सारख्या अरसिक मेमसाबला मनातून नक्की हसणार असं मला सारखं वाटत होतं. तर बाबा माझी टर उडवत म्हणाला 'अग ! खरी चायना मधली डेलीकसी म्हणजे संपूर्णपणे काळ्या कातडीचा कुत्रा. ती तर तुझ्यापुढे आलीच नाही. कल्पना कर आपल्याकडे खास पाहुणे जेवायला येणार आहेत आणि पाडव्याच्या चक्क्यासारखी तू चितळ्यांकडे आधीच ऑर्डर बुक केली आहेस काळ्या कुत्र्याची !' पण खाण्यापिण्यातली ही ॲडजस्टमेंट आपल्या हातातली असते.

भारतीय कंपनीत असताना मुंबईत बोटीवर चढायचं आणि परत मुंबईत उतरायचं अशी मुंबई ते मुंबई-ट्रीप करायची मला झालेली सवय. पण गेले चार पाच वर्ष परदेशी कंपनीतल्या बोटीचा मला जो अनुभव आला होता त्यावरून इथे आपण हात पाय हालवल्याशिवाय जाऊन बोटीवर पडणार नाही हे मी शिकले होते. एक दिवस कंपनीची तार आली, 'अरेंजिंग युवर फॅमिली' म्हणजे हे बाबानी कंपनीला लिहीलेल्या पत्राचे उत्तर. तो टेलिग्राम बघून मी अगदी हरखून गेले. वाटलं आता पुढची बातमी लगेचच येणार. कुठे जायचं ! केव्हा जायचं ? तिकीट कधीचं मिळणार ? पण पुढे बरेच दिवस सगळं थंड. मुंबईला उत्सुकतेने एजंटला फोन करावा तर 'यू सी मिसेस गोखले, सो फार देअर ईज् नो न्यूज फ्रॉम द हेड ऑफिस. बट यू कीप इन टच् विथ असं एव्हरी अल्टरनेट डे.' आता वर्षभर घर बंद करून जायचं तेव्हा घरात सामान उरणार नाही अशा हिशोबानी आणायचं. पण केव्हा जाणार ? किती दिवसांनी जाणार. काहीच माहीत नसल्याने माझी मोठी पंचाईत झाली. मला समोर बघून प्रत्येकजण आश्चर्यचकित मुद्रेनी एकच प्रश्न विचारायचा, 'हे काय ? तुम्ही जाणार होता ना ? मग अजून इथेच ?' यात विचारणाऱ्याची काही चूक नाही. कारण आता बरेच दिवसांनी परदेश प्रवासाला जायचं या आनंदात मीच 'कधीतरी जाणार.

जाणार.' अशी नकळत जाहिरात करत होते. मग उगीचंच ओशाळल्या चेहऱ्यानी 'हो ! जाणार आहे ना. पण अजून तारीख निश्चित ठरली नाही' ही टेप मी दरवेळी वाजवायची.

ह्यावेळी अशीच मी मुंबईत भाचीच्या लग्नाला गेले होते. हेतु हा की मुंबईतल्या मुंबईत लगेच बातमी कळेल. ऑफिसमध्येही जाता येईल. शिवाय आता बरेच दिवस आपण बाहेर जाणार तेव्हा अनायासे सगळ्या नातेवाईकांच्या गाठीभेटीही होतील. लग्नाच्या दिवशी दुपारी जेवण वगैरे आटोपल्यावर मी सहज ऑफिसला फोन केला. 'ओह ! यस मिसेस गोखले, यू आर फ्लाईंग डे आफ्टर टुमॉरो.' मला क्लार्कनी प्रचंड हादरा दिला. मी त्याला विचारलं की मला अगोदरच का कळवलं नाही ? सारखी तर मी फोन करत होते. त्यावर 'वुई जस्ट रिसीव्हड् द मेसेज फ्रॉम हेड ऑफिस. नाऊ वुई आर ट्राईंग फॉर युवर टिकेट. यू कम टु द ऑफिस विथ युवर लगेज डे आफ्टर टुमारो मॉर्निंग' झालं माझं लग्नाच्या कार्यक्रमातलं लक्ष पार उडून गेलं.

दुसऱ्या दिवशी धाईघाईने मी पुण्याला आले. पुण्यात पोचल्यापासून माझी भटकंती सुरू होती. दुसऱ्या दिवशी सकाळी भल्या पहाटे टॅक्सी करून मुलांना घेऊन मी मुंबईत थडकले. ह्यावेळी पर्शियन गल्फमध्ये बगदादला मला जायचं होतं. बोट चार–पाच दिवसांपूर्वीच आली होती असं मला कळलं होतं. घरी सामान टाकलं आणि पुन्हा टॅक्सी करून मुलं आणि त्यांचे आजोबा सगळ्यांना मी ऑफिसमध्ये घेऊन गेले. मला पहाताच केबिनच्या आत बसलेला कंपनीचा अधिकारी बाहेर येऊन विनंतीपूर्वक म्हणाला 'मिसेस गोखले ! वुई हॅव टेंटॅटिव्हली बुक्ड् युवर टिकेट फॉर टुमारो नाईट. बट द डिफिकल्टी ईज यु विल नीड अ पी फॉर्म टु कॅरी युवर चाईल्ड. आय विल गीव्ह विथ यु समबडी. बट विल यु प्लीज गो युवर सेल्फ अ‍ॅण्ड ट्राय फॉर द पी फॉर्म ?' मी चेहऱ्यावर उसनं हसू आणलं. पण मला मनातून त्याचा अत्यंत राग आला होता. गेले दोनतीन दिवसात यांना 'पी' फॉर्म मिळू शकला नाही तो मी काय चार तासात आणणार होते ? मी खाली आले. मुलांना टॅक्सीनी घरी पाठवून दिलं आणि मला बरोबर दिलेल्या कुठल्याशा चीफकुक बरोबर 'पी' फॉर्म आणायला गेले. जेवण नाही काही, नाही. सारखं याला भेट, त्याला कंपनीचं पत्र दाखव असं करून मी खरोखरच त्याच्या त्या दिवशी 'पी' फॉर्म मिळवला. माझ्या बरोबर आलेला चीफकुक सुरवातीला रांगेमध्ये उभं राहून मला फॉर्म आणून देऊन निघून गेला होता. मी मोठ्या विजयी मुद्रेनी ऑफिसमध्ये आल्यावर त्या ऑफिसरसकट सगळ्यांनी माझं तोंड भरून कौतुक केलं. पण माझं तिकीट आलं नव्हतं. मी ऑफिस बंद होईपर्यंत वाट पाहिली आणि आतां उद्या सकाळी येऊन तिकीट घेऊ असं मनाशी ठरवून घरी परत आले.

मी घरी परत येते तोच फोनची घंटा खणखणली. मी येणार ही बातमी बाबाला कळल्यामुळे त्याचा फोन होता. 'माझं उद्या रात्रीच्या विमानाचं तिकीट आहे. आज काही मिळालं नाही पण उद्या ऑफिसमध्ये बोलावलं आहे. 'पी' फॉर्मचं काम मात्र आज झालं. शिवाय तिथे व्हिसा वगैरे लागत नाही असं ऑफिसमध्ये मला सांगितलं आहे.' मग मी कसं यायचं, बरोबर काय काय आणायचं, वर कुठल्या वस्तू ठेवायच्या याची चांगली लांबलचक माहिती त्यानी मला दिली. 'तुझा फ्लाईट नंबर तू एजंटला इकडच्या एजंटला कळवायला सांग. म्हणजे मीच एअरपोर्टवर तुला न्यायला येईन त्याच्या बरोबर.' एवढं सगळं पक्कं ठरलं आणि त्यानी फोन खाली ठेवला. या टेलिफोनच्या सोयीमुळे अगदी सातासमुद्रापलीकडे कुठेही असलं तरी आम्हाला बोलता येतं. बोट अगदी समुद्रात असली तरी पाच ते दहा मिनिटांच्या आत हा फोन लागतो आणि पुण्यात एकमेकांशी बोलावं इतका स्पष्ट लागतो.

आता आपली भेट चोवीस तासांवर आली आहे अशी आमची पक्की खात्री असल्याने मी दुसऱ्या दिवशी मोठ्या उत्साहाने अकराचे सुमारास ऑफिसमध्ये गेले. तिकीट अजूनही आलं नव्हतंच. माझ्या समोर क्लार्कची बराच वेळ फोनाफोनी चालू होती. मी ताटकळत आशेनी चारपर्यंत तिथे बसून होते. एवढा वेळ गेल्यावर थंडपणे क्लार्क मला म्हणतो, 'मिसेस गोखले ! आय अॅम व्हेरी सॉरी. नाऊ अ डेज ईटस् व्हेरी डिफिकल्ट टु गेट गल्फस् पॅसेज. यु स्टे इन पूना, ईज ईट ? आय थिंक यु कॅन गो बॅक अॅण्ड कीप कॉन्टॅक्ट विथ अस. आय विल ट्राय फॉर युवर टिकेट नेक्स्ट वीक.' दोन दिवसांच्या धावपळीने आणि मानसिक ओढाताणीने थकलेल्या माझ्या शरीराची अवस्था जटायूसारखी झाली. मला सगळ्यात काळजी पडली होती की बाबाला आता हा बदल कुठे कळवायचा. तो उगीचच मी का आले नाही याची काळजी करत बसणार.

दुसऱ्या दिवशी सकाळी पुन्हा आम्ही पुण्यात परतलो. जाणार जाणार म्हणून ज्यांचे ज्यांचे निरोप घेऊन आले होते त्यांच्यापुढे माझी नवी रेकॉर्ड मला पुन्हा पुन्हा वाजवावी लागणार, या जाणिवेने मला उगीच अपराध्यासारखं वाटायला लागलं. तेव्हा घरात जाईपर्यंत कुणी म्हणून ओळखीचं भेटूच नये अशी मी मनोमन प्रार्थना करत होते. दाराशी रिक्षा येऊन थांबते तो बागेत काम करणारा आमचा माळी समोर एखादं भूत वगैरे दिसावं तसा चेहरा करून मला म्हणतो, 'अहो बाई ! तुम्ही गेला होतात ना ? मग परत कशा आलात ?' 'अहो माळीबुवा तिकीटच मिळालं नाही मला.' त्या बिचाऱ्याला रेल्वेचं तिकीट तेवढं माहीत असणार. तो मला म्हणतो, 'अहो बाई गाडीचं तिकीट मिळालं नाही तर टॅक्सीनी जायचं.' तशा अवस्थेतही त्या विनोदाचं मला हसू आलं.

मी कुलूप उघडून आत आले. सगळी आवराआवर आणि खडखडाट करून बाई गेली होती. घरात मीठाचा कणही नाही. सकाळ कशीबशी ब्रेडवर भागवली. पहिला बाईला निरोप दिला आणि सामान आणवले. मनाशी विचार केला, आता लागतील तशा वस्तू घेऊन यायच्या, म्हणजे पुन्हा आवरावावर नको; तर संध्याकाळी माझे परगावचे मेहुणे मी जाणार म्हणून भेटायला हजर! माझं खरंच कशातही लक्ष लागत नव्हतं पण इलाज नव्हता. मी दिवस मोजत होते. रोज मुंबईत फोन करत होते. बातमी काही लागत नव्हती. पण फोनचं बिल मात्र वाढत होतं. माझं काही सामान मुंबईत, तर काही जरूरीचं इथं. अशी माझ्या घरात मीच पाहुणी झाले होते.

आणि एक दिवस फोनवर कळलेली बातमी तारेनी आली. 'युवर पी टी ए हॅझ् अराइव्हड् इन बॉम्बे...सो डेट.' ह्या वेळी मात्र मुळीच न हुरळता कुणाचाही खास निरोप न घेता गुपचूप निघून जायचं मी ठरवलं. कारण त्या बातमीवर शंभर टक्के विश्वास ठेवायला माझं मन कचरत होतं.

विमान रात्री दीड वाजता सुटलं आणि सकाळी साडेसहा ते सातला आम्ही बगदादला पोचलो. माझ्या कडेवर झोपलेली वर्षाली, तिच्यासाठी घेतलेली हँडबॅग खांद्यावर पर्स आणि दोन कॅमेरे अशा अष्टभुजा देवीच्या अवस्थेत विमानातून मोठ्या कष्टानी मी खाली उतरले. कारण बाहेर अतिशय सोसाट्याचा वारा होता. बगदादहून बसऱ्याला जाणारं विमान दुपारी एक वाजता होतं. तोपर्यंत काय करायचं या विचारात मी पडले. तोच अनाऊन्समेंट झाली की दुपारची एकची फ्लाईट काही कारणाने रद्द झाली आहे. त्या ऐवजी आता अर्ध्या तासात इथून विमान सुटेल. मला पंचाईत पडली की माझी दुपारची फ्लाईट केव्हा पोचेल हा मेसेज बसऱ्याला एजंटला कळवलेला आहे. आताचा हा बदल काही करून ऑफिसला कळवला गेला नाही तर या ओसाड निर्मनुष्य ठिकाणी मी करायचं काय? जिकडे तिकडे मैलोन्‌मैल पसरलेली रणरणती वाळू आणि पेट्रोलचे पाईप्स् यात कुणाची मदत घ्यायची?

मी धावत चौकशीच्या खिडकीशी जाऊन सांगितलं की बसऱ्याच्या माझ्या एजंटचा हा पत्ता आणि हा फोन आहे. तेव्हा कृपया ह्या फोनवर हा बदल कळविण्याची व्यवस्था करा. काऊंटरवरच्या त्या दाढीवाल्या अरबाला मी काय म्हणते आहे हे कितपत समजलं कुणास ठाऊक, पण तो 'ओह! यस् शुअर' असं

मोडक्या-तोडक्या इंग्रजीत म्हणाला. मी तिथून निघाले खरी पण पुढचा सबंध तासाचा प्रवास, एजंटचा कुणीच माणूस आला नसेल तर काय ? ही काळजी मला लागली होती.

आम्ही सुमारे तासानी बसऱ्याला पोचलो. एका विमानतळावरून दुसऱ्या विमानतळावर नेण्यासाठी बाहेर एक एअर बस उभी होती. सकाळचे आठ साडेआठ वाजले असतील. पण आपल्याकडे ऐन मध्यानीला सूर्य तळपावा तसे तापलेल्या वाळूचे चटके वाऱ्याच्या हलक्याशा झोताबरोबर चांगलेच जाणवत होते. सुमारे दोन अडीच तासानी आम्ही दुसऱ्या विमानतळावर पोचलो. तिकडे न्यायला आलेल्या लोकांचा मोठा घोळका उभा होता. बाबा आला असेल अशी मी अपेक्षाच केली नव्हती. कारण त्याच्यापर्यंत बातमी पोचलीच नसणार याची मला खात्री होती. एवढ्या लोकातून एजंटचा माणूस कसा ओळखायचा हा माझ्यापुढे प्रश्न पडला. गर्दी हळूहळू ओसरायला लागली. सामानामुळे हात दुखत होते. रात्रभर एका जागी बसून अंग अवघडले होते. मी चौकशीच्या खिडकीशी गेले. तिथे एक बराचसा भारतीय चेहऱ्याचा गृहस्थ माझा पासपोर्ट नंबर आणि नाव वगैरे संबंधीची माहिती दाखवत होता. मीही माझा पासपोर्ट दाखवल्यावर ओळख पटली. आम्ही तिथून टॅक्सीनी निघालो तेव्हा माझा जीव भांड्यात पडला.

तिकडे माझा फोन गेल्यापासून मी का आले नाही याची काळजी बाबा सतत करत होता. कारण माझं उद्याचं तिकीट काढलंय हे आठ ते दहा दिवसांपूर्वी मीच त्याला समक्ष सांगितलं होतं. त्यानंतर माझं काय झालंय याची काहीही बातमी त्याला समजली नव्हती. मी मुंबईहून निघाले नसते तर काही हरकत नाही. पण मी इथे येऊन व्हिसा बरोबर नसल्याने परत तर घेले नाही ना ? अशा नाना तऱ्हेच्या विचारांनी त्याला भेडसावलं होतं. व्हिसाबाबत इथले नियम अतिशय कडक असतात हे त्याला पूर्ण ठाऊक होतं. माझ्या अगोदर दोनच दिवस बोटीवर गेलेला थर्ड इंजिनियर बसऱ्याला विमानतळावर एजन्ट न्यायला आला नाही म्हणून तीन दिवस आणि रात्र उपाशी बसून राहिला होता. जवळ तिथले पैसे नव्हते. दुसरे पैसे बदलून मिळेनात म्हणून काहीही विकत घेता येईना. बरं इंडियन कॉन्सुलेटमध्ये जावं तर सरकारतर्फे हा गेलेला नसल्याने तिथेही कुणी त्याची दाद घेईना. अशा अवस्थेत माझ्यासारखी एकटी बाई आणि बरोबर वर्षाली ! तेव्हा बाबाला काही सुचेना. मध्यंतरी त्याने तीन चार वेळा इकडे फोन करायचा प्रयत्न केला. पण लागलाच नाही. तेव्हा आता फार विचार न करता सरळ बाहेर जायचं आणि फोन लागेपर्यंत पोस्टातून हलायचं नाही, मग पाच सहा तास लागले तरी चालतील. पण मी कुठेही असले तरी सुरक्षित जागी आहे ना याची शहानिशा करायची म्हणून बोटीवर एजंटच्या ऑफिसमधला एक क्लार्क

आला होता, त्याच्या गाडीतून तो निघाला. वाटेत काही काम असल्याने गेटच्या आत गाडी थांबवून तो क्लार्क कस्टम ऑफिसमध्ये गेला, म्हणून बाबाही खाली उतरून ऑफिसपर्यंत चालत गेला. एवढ्यात गेटच्या आत एक टॅक्सी शिरताना त्याने लांबून पाहिली. थोड्या वेळानी पुढच्या सीटवरून एक बराचसा भारतीय चेहरामोहऱ्याचा गोरापान माणूस खाली उतरला. हातात भारतीय पासपोर्ट घेऊन हा कोण येतोय या उत्सुकतेनी बाबा त्याच्याकडे बघत होता. त्याची समजूत झाली की आताशा बरीचशी भारतीय मंडळी गल्फमध्ये नोकरीच्या निमित्ताने येतात तेव्हा हा तसाच कुणीतरी असेल आणि बरेच दिवस इथे राहिल्याने त्याला ही भाषा येत असेल. अशा कल्पनेनी त्यानी त्याच्याकडे दुर्लक्ष केलं. जरा वेळानी त्यानी तो पासपोर्ट उघडून त्या ऑफिसर समोर ठेवला तर आत चक्क माझा फोटो! बाबाला आश्चर्याचा धक्काच बसला. तो चटकन धावत पुढे येऊन म्हणाला, 'ओह! हाऊ यू गॉट धिस पासपोर्ट? शी इज माय वाईफ!' 'धिस लेडी इज वेटिंग आऊट साईड इन द टॅक्सी विथ अ चाईल्ड.' हे ऐकून बाबा धावत टॅक्सीजवळ आला. त्याला एकदम समोर बघून मीही चाटच पडले. कारण त्याला जर मी केव्हा येणार अशी नक्कीची बातमी समजली असती तर तो विमानतळावर मला न्यायला नक्कीच आला असता. तेव्हा आमची ही भेट अगदी हिंदी फिल्म स्टाईल झाली. अशा तऱ्हेच्या अनपेक्षित (!) भेटी फिल्ममध्ये झाल्या की हिरो हिरॉईन एकमेकांना धडाधड मिठ्या मारतात. मग हिरो तिला उचलून गरगर फिरवतो हे दृश्य अगदी लहानापासून मोठ्यांपर्यंत सगळ्यांचं पाठ आहे. पण आम्ही पडद्यावरचे हिरो हिरॉईन नसून चक्क लग्नाचे नवरा–बायको असल्याने असं रोमँटिक काहीही घडलं नाही.

बाबा टॅक्सीत बसला आणि आम्ही बोटीशी आलो. बोटीच्या सगळ्या डेक-वरून अनेक उत्सुक चेहरे आम्हाला बघायला उभे होते. मेमसाहेब आल्या म्हणून कुणी खलाशी गँगवेवर वर्षालीला घ्यायला, कुणी सामान न्यायला धावत आले. बोट बंदराच्या बाहेर पंधरा–वीस दिवस नांगरून उभी होती ती तीन चार दिवसांपूर्वीच आत आली होती. कॅनडा सोडल्यापासून चाळीस–पन्नास दिवस कुणाचेही पाय जमिनीला लागते नव्हते. बोटीवर कुणी बाईही नव्हती. त्यामुळे तेचं ते चेहरे बघून कंटाळलेली सगळीजण माझ्या येण्याची मोठ्या उत्सुकतेनी वाट बघत होते. त्यांचं ते उत्स्फूर्त स्वागत बघून माझा सगळा त्रास मी पार विसरून गेले. आपल्या स्वतःच्या उबदार घरात बरेच दिवसांनी आपण यावं तसं मला वाटलं.

मी गँगवेवरून केबिनमध्ये जायला निघाले. तो वाटेत रूबाबदार दाढी असलेल्या गोऱ्यापान कॅप्टन डॅनीनी माझं हसून स्वागत केलं. हा डॅनी प्रथम दर्शनी

मला एखाद्या मॉडेलसारखा वाटला. मी केबिनमध्ये गेले. सगळीकडे कसं स्वच्छ आणि नीटनेटकं होतं ! अगदी मला हवं तसं ! बाबाचा स्वभाव मी गेले अनेक वर्षं ओळखत होते. तेव्हा त्याच्या हातून इतका व्यवस्थितपणा ? छे माझा विश्वासच बसेना.. एवढ्यात दारावर टकटक वाजलं आणि एक बिहारी चेहऱ्याचा साठीचा स्टुअर्ड 'गुड मॉर्निंग मेमसाब !' म्हणून आत आला. 'तोता ! (मी बघतच राहिले ) मेमसाब को जरा गरम अच्छासा कॉफी लाना.' बाबाचं शहाजी हिंदी. 'हां अभी लाया सरकार' असं म्हणून तोता नामक तो पंछी बाहेर गेला. मी म्हटलं, 'याचं नाव तोता ? म्हणजे पोपट वगैरे आहे की काय ? याला काही आडनाव वगैरे नाही वाटतं ? 'अगं ! याच्या पासपोर्टवर TOTA याशिवाय काहीही लिहिलेलं नाही आणि तशीच तो सही करतो. यापलीकडे त्याला स्वतःची काहीही माहिती नाही. याची जन्मतारीख १९२० असं पासपोर्ट सांगतो. हा नाही.'

एवढ्यात तोता गरम गरम कॉफी आणि टोस्ट घेऊन आला. 'मेमसाब ! तुम नही आया तो चार–पाच दिन सरकार बहुत परेशान था– अच्छा हुआ अब तुम आ गया. हम साबको बोलता था, मेमसाब आनेवाला है. जरा केबिन को पेंट मारने को बोलो. केबिन अच्छा बनाओ नही तो मेमसाब हमको क्या बोलेगा?' तोताची सुरू झालेली ही पोपटपंची लवकर आवरणार नाही हे बाबांनी सवयीनी ओळखलं होतं. म्हणून 'तोता ! ये देखो अभी तुम नीचे जाओ, लंच का टाईम हुआ. मेमसाब जरा घुसल बनाके नीचे आ जाएगा.' 'अच्छा सरकारी' असं म्हणून तोता खाली गेला. पण तोता नामक हा प्राणी आपल्या नावाप्रमाणे पटर-पटर करणारा आहे याची मला मात्र पूर्ण कल्पना आली.

बसऱ्याला मी एकदा बोटीवर जे पाऊल ठेवलं ते पुन्हा जमिनीला लागलं नाही. 'आपके पाँव देखे बहुतही हसीन हैं उन्हे जमीनपे न उतारियेगा' अशी माझी अवस्था झाली. समोर वैराण वाळवंट आणि तैग्रीसच्या दुतर्फा पसरलेली खजुराची दाट झाडं यापलीकडे तिथे काहीही दिसायचं नाही. क्वचित् खजुराची राखण करणाऱ्या मजुरांच्या झोपडीतली लहान मुलं बाहेर हिंडताना दिसायची तेवढीच माणसांची चाहुल. बोट नांगरलेली असल्याने संध्याकाळी सगळ्यांनाच रिकामा वेळ होता म्हणून रोज रमीचा डाव जमायचा. सकाळी मात्र तितकसं कुणीच रिकामं नसायचं. त्यामुळे तोता एवढी एकच माझी करमणूक असं सुरवातीला मला वाटायचं. केबिन साफ करायला आलेला तोता माझ्याशी

तासन्तास गप्पा मारत बसायचा. सबंध बोटीवर मीच एकटी त्याला रिकामटेकडा श्रोता भेटले होते. ' मेमसाब ! हम तीस बरस सिटीलाईन के जहाज में काम किया. अभी दो–तीन साल बाकी हैं नौकरीका. फिर घर मे बैठना पडेगा. ' कधी कधी तो पत्र घेऊन यायचा आणि मला वाचायला सांगायचा. ' मेमसाब ! अपना भी दो बेटे है और चार बेटियाँ हैं. तीनका शादी हम दे दिया. बडा लडका मुसलमान लडकीसे शादी किया, मजला लडकी लीला.' ' मजला ?' मला प्रश्न पडला. ' तोता ! मजला याने ?' ' बडी लडकी ! उसका मरद पागल हो गया. वो भी हमारे घर रहता हैं. उसका बडा बेटा है आठ–नऊ सालका. आपको हम एक दिन फोटो बतायेगा मेमसाब.'

अशा वेळी बाबा एखादेवेळी ब्रीजवरून खाली आला की त्याला तोता माझ्याशी गप्पा मारताना दिसायचा. तो मला नेहमी बजावून जायचा. ' हे बघ ! या तोताला तू उगीच जास्त प्रोत्साहन देऊ नकोस म्हणून मी तुला सारखं सांगतो तर तू त्याला आपणहून सारखी चाव्या देत रहातेस ! तो तुझं रोज डोकं खाईल ' पण माझा बायकी बोचकपणा थोडाच कमी होणार ? तोताला काय समोर कुणी नसलं तरीसुद्धा त्याची बडबड चालू असायची.

एक दिवस तोता खरंच आपल्या कुटुंबाचे फोटो घेऊन मला दाखवायला आला. ' मेमसाब ! ये अपना जनाना है. वो जब जवान था तो बहुत खुबसूरत था. गावका सब लोग उसे देखने आता. ये अपना दूसरा जनाना है. अपना सब लडकी भी एकसे एक खुबसुरत है.' मी फोटो बघितले पण ' एकसे एक खुबसुरती ' काही मला आढळली नाही. ' बहुतही अच्छे है तोता ' असं म्हणून मी त्याला ते फोटो परत दिले. बाबा ब्रीजवरून खाली आल्यावर मी त्याला म्हटलं, ' तोतानी त्याच्या बायकोचे आणि मुलांचे फोटो आज मला दाखवले आणि तोंडानी सारखा ये खुबसुरत है असं चाललं होतं ' ' अगं ! तोताच्या रूपावरून त्याच्या सौंदर्याच्या कल्पनेच्या दृष्टीने तू फोटो बघायचेस म्हणजे तुला त्यातली खबसुरती कळली असती. तू जर ' मिस् इंडिया ' म्हणून त्याच्या बायकोकडे बघायला लागलीस तर काय होणार ?

तोंडातले निम्मे अधिक दात पडलेला पक्का गॅरंटेड रंगाचा तोता कधी कधी आपल्या पांढऱ्या केसाचे एकदम काळे केस करून यायचा. अशा तरुण झालेल्या तोताला मी कधी कधी गमतीने म्हणायची ' तोता ! तुम अब तुम्हारा नाम बदली कर दो. तोता ये क्या नाम है ? देखो तुम्हारे लडके और लडकियोंके नाम कितने मॉडर्न है– संजय, शेखर, अमिता. तोताला मनातून बरं वाटायचं ' हां मेमसाब ! हम हमारा नाम बदल सकता है– आपही बोलो क्या रखेगा ? ' ये देखो अशोक–कुमार– संजीवकुमार, अमिताभ कोई भी हीरोका नाम रख लेना.' यावर तोता एकदम खूष व्हायचा.

आमचा तोता एक चांगल्यापैकी कव्वाल होता. या वयातही त्याचा आवाज असा बुलंद आणि धारदार लागायचा की तरुणपणी सिटी लाईनमध्ये दक्षिण आफ्रिकेच्या रनवर नेहमी असताना दर्बान, केपटाऊन, पोर्ट एलिझाबेथ इथे त्याचे रात्रीचे जाहीर कार्यक्रम व्हायचे असं त्याच्या बरोबरीचे स्टुअर्ड सांगायचे ते अगदी पटायचं. त्या बंदरातून तोताराम किंवा तोता युसूफ या नावानी (जसा जमाव असेल तशा नावानी) त्याचे कार्यक्रम अगोदरपासून जाहीर व्हायचे. पेटी तर तोता इतकी सुंदर वाजवायचा की अगदी ऐकत रहावं. मोठमोठे श्रीमंत व्यापारी लोक त्याला गाडी घेऊन न्यायला येत. त्याकाळी एकेका रात्रीत तो पाचशे ते सातशे रुपये सहज मिळवायचा.

तोताची आपुलकी त्याचा नीटनेटकेपणा याची मी बाबाकडे सारखी स्तुती करायची. दिवसभर त्याच्या हातात एक फडकं असायचं. केबिनमध्ये आला रे आला की उगीचच फडक्याचे इकडून तिकडे फटकारे मारल्या शिवाय त्याला चैनच पडायचं नाही. आमच्या पहिल्या बोटीवर सगळे खलाशी गिलबर्टी (ही गिलबर्ट बेट दक्षिण पॅसिफिकमध्ये आहेत.) होते. त्यांच्यापुढे गेली अनेक वर्षं ब्रिटीशांच्या शिस्तीत काम केलेले हे भारतीय खलाशी मला अत्यंत वेल मॅनर्ड वाटले. ती मंडळी एकजात ब्रिटीश पासपोर्टवाली पण अत्यंत जंगली वृत्तीची होती. उंच, धिप्पाड शरीर, बहुतेकांचे केस पिंजारलेले-दाढी, मिशा यांचं तोंडावर जाळं आणि आठ-आठ दिवस पाण्याचा स्पर्श न झाल्यासारखे त्यांचे चेहरे बघून मला त्यांची किळस तर यायचीच पण भीतीही वाटायची. मनात नेहमी यायचं मला जर कुणी संधी दिली तर यांना अगोदर न्हाव्याकडे पाठवून नंतर स्वच्छ आंघोळी करायला लावीन. ती सगळीजणं शुद्धीत असतील तर ठीक. पण एखादे दिवशी झोकून पडली की दोन-दोन दिवस त्यांचा कामावर पत्ताच नसायचा. त्यांना बोललं, धाक घातला, त्यांचे पगार कापले तरी त्याचा उपयोग व्हायचा नाही. मग त्यांच्या आपापसात होणाऱ्या मारामाऱ्या, आरडाओरड-भांडणं अगदी वैताग आला होता. अशा स्थितीत टेबलवर जेवायला, वाढायला आलेच तर त्यांची गंमत विचारू नका. प्लेटस्, चमचे वगैरे टेबल मांडायच्या आधीच सगळे पदार्थ एका-मागून एक वाढायला यायचे. त्यांचा तो तमाशा मी वर्षभर बघितला होता. म्हणूनच त्या पार्श्वभूमीवर तोताची ती करमणूक मला बरी वाटली असावी. पण पुढे पुढे तोता आखाड सासऱ्यासारखा मला शहाणपण शिकवायला लागला. टेबलवर बसलं आणि आपल्याला हवा असलेला पदार्थ पाहिजे तेवढाच प्लेटमध्ये घेतला की 'मेमसाब ! ये और खाईयेगा बहुत अच्छा बना है' म्हणून फसकन् जबरदस्ती पानात टाकायचा. आपण नको नको म्हटलं की, 'हे भगवान ! अब ये मेमसाबको क्या बोलेगा' असं म्हणायचा. चहा-कॉफीत जास्त साखर घालायला

सांगितलं की, 'मेमसाब, ज्यादा चीनी खाना अच्छा नही' म्हणून झापायचा. बंदरात गेल्यावर बाहेरून काही खरेदी करून आणली की 'हमारा साब जब अकेला था तो इतना खर्चा नही करता था.' अशी त्याची चमचेगिरी चालायची. मला एकदा ताप आला होता तेव्हा तोतानी माझी एखाद्या नर्सच्या वरताण सुश्रूषा केली. दर अर्ध्या तासानी काय हवं, नको विचारायला यायचा. चहा, कॉफी, टोस्ट करून आणायचा. मी काय खावं हे आपणच ठरवून गॅलीतून (स्वयंपाकघर) मुद्दाम करून आणायचा. सिटी लाईनमध्ये आपण डॉक्टरांच्या हाताखाली काम केलय. इथे कुणी डॉक्टर नाही तेव्हा आपणच डॉक्टर असं त्याला वाटायचं. पण नंतर नंतर तोताची दर अर्ध्या तासाची हजेरी म्हणजे मला संकटच वाटायला लागलं होतं. पण वैतागून बाबालाही सांगण्यात काहीच अर्थ नव्हता. तो तोताशी कामाशिवाय जास्त का बोलत नाही याचा मला तेव्हा शोध लागला. पण तोपर्यंत फार उशीर झाला होता.

मी बोटीवर आले त्या दिवशीच संध्याकाळी डॅनीनी आम्हाला आवर्जून केबिनमध्ये गप्पा मारायला बोलावलं. डॅनी भारतीय ज्यू होता त्यामुळे घरात मराठीच बोलायचा. सुरुवातीपासून इथे राहिल्याने त्याला आपले सगळे रीती-रिवाजही माहीत होते. आपल्याला बोटीवर एक मराठी बोलणारी कंपनी भेटली म्हणून मला खूप बरं वाटलं. त्या तीनचार तासात डॅनीनी मला गप्पात अगदी गुंगवून टाकलं होतं. खरं तर डॅनी एवढा वेळ एकटाच बोलत होता आणि मी आश्चर्यचकित होवून ऐकत होते. "माझे वडील फॉरीन सर्व्हिसेस्मध्ये असल्याने ते आज लंडन तर उद्या पॅरीस तर परवा न्यूयॉर्क असे जगभर हिंडणार, मग त्यांचा निश्चित पत्ता काय सांगणार हो! माझी आई म्हणजे या शिपिंगच्या जगात फार मोठ्या अधिकाराच्या जागेवर आहे. त्यामुळे या ठिकाणी तिचं नाव घेतलं की बस्स सगळी कामं अश्शीऽ होतात. माझी स्वतःची मुंबईत तीन दुकानं आहेत. शिवाय सहासात टॅक्सीज्. तेव्हा आपल्याला घरबसल्या पाचशे ते सातशे रुपये तर रोजचे कुठे गेले नाहीत. पण हे आयुष्य जरा चाकोरीबाहेरचं थ्रिलिंग आहे म्हणून मी नोकरी करतो. तसा मला ऑफिसमध्ये अनेक वेळा चान्स मिळाला होता. पण पण मला तसलं बैठं काम करायचं नाही. मला माझ्या वडिलांनी चांगले वीस लाख रुपये ठेवले आहेत. पण त्यांचा आता काय उपयोग? माझ्या वयाच्या चाळिसाव्या (!) वर्षी ते मला मिळणार. थोड्या वेळानी हा आकडा पंधरा लाखावर येतो. मला वाटलं हा चुकून बोलला की काय? 'तुम्हाला माहीत आहे मी एका हिंदी सिनेमामध्ये संजीवकुमारच्या धाकट्या भावाचं काम केलंय. मला सगळीजण म्हणतातच अगदी संजीवकुमारसारखा दिसतो. त्या सिनेमाचं नाव ना? ते अजून ठरलेलं नाही. शशीसुद्धा माझा पक्का दोस्त

आहे. केव्हाही गाडीतून जाता येता 'हाय डॅनी'! केल्याशिवाय तो पुढे जाणार नाही. जयु (माझी प्रश्नार्थक मुद्रा!) अहो आपली जया भादुरी. माझ्या बायकोची खास मैत्रीण आहे. त्यामुळे हल्ली अमिताभ आमच्या घरी वरचेवर येतो. पण मी घरात नसतो ना! तेव्हा असं कुणी आलेलं मला मुळीच आवडत नाही. माझी बायको अतिशय सुंदर आहे हो. त्यामुळे लोक तिचा गैरफायदा घ्यायला टपलेले असतात. म्हणून तिच्या संरक्षणासाठी मी एक गुंड ठेवलाय." हे ऐकून मी तर सर्दच झाले. आतापर्यंत त्यानी मारलेल्या गप्पात समोरच्या श्रोत्याचं वय चार ते पाच वर्षाचं त्यांनी गृहीत धरलेलं असावं. पण मी त्यात बसणारी नसल्याने सहाजिकच एक तार्किक प्रश्न माझ्या मनात उद्‌भवला. हा एवढा करोडोपतीचा मुलगा, याची प्राप्ती म्हणे दिवसाला पाचशे ते सातशे रुपये असताना हा इथे कशाला झक् मारतोय? याच्या अत्यंत सुंदर बायकोची जबाबदारी एका गुंडावर सोपवण्यापेक्षा हा स्वतःच ती का उचलत नाही? नाहीतरी याला अधून मधून पिक्चरमधे चान्स मिळतोच तेव्हा वेळ जाण्याचाही प्रश्न नाही.

आम्ही केबिनमध्ये परत आल्यावर मी बाबाला म्हटलं 'तुझ्या या डॅनिचा वरचा मजला नक्कीचा रिकामा आहे. तो स्वतः काय बोलतो हे त्याचं त्याला तरी कळत का? हा एवढा पैसेवाला प्राणी इथे कशाला आला मरायला.' बाबा म्हणाला 'अग! आज तू एकमेव नवीन श्रोता होतीस म्हणून त्यानी तुला आर्वर्जून आमंत्रण दिलय्. त्याची सगळी बंडलं तुला पचली की काय? सुरवातीला आल्यागेल्याला याच्या अशाच थापा लगावून झाल्या आहेत. पण हल्ली याच्या जवळपास कुणी फिरकत नाही. भीतीनी, जेवणाच्या टेबलावरसुद्धा याची वेळ टाळून सगळीजण जातात. याच्या नावावर कधी दहा लाख तर कधी त्याचे वीस लाख होतात. पूर्वी बोट बंदरात आल्यानंतर हा जर एकटा बाहेर जाऊन आला तर आपण कशा पोरी फिरवून आलो याची तो रसभरीत वर्णनं सांगायचा. तू बाई आहेस म्हणून निदान त्यानी त्या घटना न सांगण्याची अक्कल वापरली आहे हे नशीब समज! तू ऐकलसच. एकदा त्यानी सांगितलं, माहीमला बंगला. मग थोड्या वेळानी म्हणाला तळेगांवला बंगला. पण खरं याचा बांद्र्याला तीन खोल्यांचा फ्लॅट आहे. कारण तिथला त्यानी पत्ता दिलाय. हा माणूस म्हणजे सायको केस आहे हे तुझ्या लक्षात आलं असेलच.' मी हे सगळं ऐकलं आणि माझ्या डोळ्यासमोरचा तो रूबाबदार झोडियॅकमॅन क्षणात वितळून गेला.

डॅनी सारखाच दुसरा प्लेबॉय चीफ ऑफिसर केरळचा. रंगानी खूप काळा. डोक्यावर पूर्ण टक्कल आणि साधारण पंचेचाळिशीच्या आसपासचा हा प्राणी! डॅनीच्या गप्पा जास्त पण हा नेहमी कृतिशील असायचा त्याच्यामागे अगदी चिकण्या, वयानी कोवळ्या आणि चांगल्या घरातल्या मुली प्रेमात पडू लागायच्या.

हे बघूनच मला आश्चर्याचा धक्का बसला. तो बेधडक सगळ्यांना लग्नाचं आश्वासनही द्यायचा. कारण पुढे तो रजेवर गेल्यावर बोटीवर त्याची अनेक प्रेमपत्रं बरेच दिवस येत होती. अशी ही अजब वल्ली !

आमच्या केबिनशेजारी सेकंड ऑफिसरची केबिन होती. पण तो सदानकदा एकटाच दार बंद करून बसायचा. त्याची ड्यूटी आणि केबिन या पलीकडे तो कुठेही दिसायचा नाही. म्हणजे आपण कुणाकडे ड्रिंक्सला गेलो नाही की आपल्यालाही कुणाला बोलवायला नको अशी त्याची वृत्ती होती. तसा तो अगदी सोवळा होता. सिगारेट, ड्रिंक्स् कशालाही हात लावायचा नाही. पण त्याच्या केबिनमध्ये मात्र भरपूर स्टॉक असे. तो हे सगळं कशासाठी करता हे माहीत असूनही प्रत्येकजण त्याला मुद्दाम विचारायचे ' अरे भाई ! तुम सिगारेट, दारू कुछ नही पिता तो इतना स्टॉक क्यों लेता है. ' ' अरे भाई कोओी केबिनमे आये तो देना पडता है ना.' तो ओशाळल्या चेहऱ्यानी सांगायचा. एका पार्टीत कोकाकोला पिणाऱ्या शांतीभाईच्या ग्लासात सगळ्यांनी आग्रहानी रम ओतली. त्याचे दोन तीन पेग पोटात गेले मात्र, शांतिभाईच्या खिन्न चेहऱ्यावर एकदम हास्य फुललं. तो गाणी म्हणायला, नाचायला लागला.

मला कंटाळा आला की बरेच वेळा काहीतरी पदार्थ करायला मी खाली गॅलीत जायची. आमचा चीफकुक बंगाली ख्रिश्चन होता. तोही अनेक वर्षं सिटीलाईनच्या पॅसेंजर बोटीवर असल्याने सगळ्या प्रकारच्या डिशेस् अत्यंत चविष्ट करायचा. तिथे तो काही वर्षं बेकर असल्याने ब्रेडचे अनेक प्रकार, बन्स्, पॅस्ट्रीज, कुकीज, केक्स सगळं तो स्वतः करायचा. त्यानी मला इतक्या तऱ्हेचे पदार्थ शिकवले की कुठल्याही केटरिंग कॉलेजमध्ये अनेक वर्षं राहूनही मला शिकता आले नसते. त्याचं वय पन्नास ते पंचावन्नच्या आसपास असावं. पण डोक्यावर भरपूर केस आणि एखाद्या हिरोला शोभेसा चेहरा बघून याला नातवंड असतील हे सांगून सुद्धा कुणाला खरं वाटलं नसतं.

सकाळी साडेपाच वाजल्यापासून त्याचं गॅलीत काम सुरू व्हायचं. ब्रेकफास्ट, लंच आणि डिनर यामध्ये तो रात्री सातपर्यंत गुरफटलेला असायचा. बोट बंदरात असो वा समुद्रात असो, खराब हवा असो नाहीतर विषुववृत्ताचा कडक उन्हाळा असो, त्याला कधीही सुट्टी मिळायची नाही. पण त्याचा चेहरा नेहमी हसतमुख असायचा. त्रासिकपणाचा कुठे लवलेशही दिसायचा नाही. दिवसभर खुषीत गाणी गात त्याचं काम चालायचं. त्याच्या तरुणपणाचं बहुधा हेच रहस्य असावं. मी सकाळी ब्रेकफास्टला खाली गेले की ' गुड मॉर्निंग मेमसाब !' म्हणत हातातलं काम सोडून तो बाहेर यायचा. ' मेमसाब ! आप कैसे है ! हम तो बडी खुशीमे है ' अस म्हटल्याशिवाय तो एक दिवस रहाणार नाही. रोज दुपारी चार वाजता

आमचा कुकिंग क्लास चालू व्हायचा. एकदा मी काहीतरी आणायला खाली गॅलीत गेले. तिथे आसपास कुणी दिसेना. म्हणूचे ड्रॉवर उघडला तर आत स्कॉचची बाटली ! हेच ते चीफकुकच्या सळसळत्या उत्साहाच रहस्य बरं ! इतक्यात पलिकडून मजेत गाणी गात येणाऱ्या चीफकुकला मी नको तो ड्रॉवर उघडला आहे हे दिसल्याबरोबर तो धावत आला. ' मेमसाब ये तो अपना टॉनिक है. इसके बिना हम जिंदाही नही रहेगा. हम खुश-हमारा दिलखुश तो हमारी तबियत खूश. इसीसे हम अभीतक जवान है मेमसाब.' क्लासच्या वेळी तो घरच्या गप्पा मारायचा. ' हम गरीब आदमी. कलकत्तामे रुममे रहता है. अपना चार लडकी है. उसमेसे एक जरा अकलमे कम है और अपनी औरत को फीटकी बिमारी है ' ' चीफकुक ! जहाजमे इतनी साल नौकरी करता है कुछ पैसा जमा हुआ की नही ?' ' काहेका मेमसाब! दो लडकीका शादी किया. जो कुछ था वह सब खतम हो गया और जो कुछ मिलेगा बस ये दो लडकी ले जाएगा मेमसाब. हम फकीर आदमी है. सबके पेटका काम करता है. हमको भगवान जरूर अच्छा रखेगा. नौकरी खतम होने के बाद बस, हायस्कूलके सामने फूटपाथपर बटाटेवडा बनाके बेचेगा और एक दिन फूटपाथ परही हमेशा के लिए सो जाएगा. अपने को लडका नही. किसी को कुछ रखनेका नही है ना मेमसाब.'

चीफस्टुअर्ड फर्नांडिस हा चीफकुकचा पिण्यातला पक्का दोस्त. चीफस्टुअर्डला जेव्हा मी पहिल्यांदा बघितला तेव्हा मला ग्लॅक्सोच्या गुटगुटीत बाळाची आठवण झाली. तसाच गुटगुटीत गोटा पण कपाळावर रूळणारं जावळ, गोबऱ्या गालात लपलेल नकटं नाक आणि निष्पाप दिसणारा चेहरा. मी कल्पना करायची याला दुपट्यावर झोपवून तोंडात दुधाची बाटली दिली तर हा कसा दिसेल नाही ? चीफस्टुअर्ड सिटी लाईनमध्ये स्टुअर्ड होता. त्याला स्वयंपाकाची फार आवड. करायचाही छान. कधी कधी एप्रन बांधून सकाळी तो गॅलीत काही खास पदार्थ करायला उभा राहिला की त्या गुटगुटीत बालकाला आता फक्त एक लाळेरंच कमी आहे असं वाटायचं. पण वरकरणी निष्पाप दिसणाऱ्या त्या चेहऱ्यामागे मोठं गूढ होतं. सिटी लाईनमध्ये असताना तो चोरट्या व्यापाराच्या लफड्यात अडकला गेला. पुढे त्याचा साथीदार पकडला गेला तेव्हापासून त्यानी तो धंदा सोडला होता. गोव्यात त्याची कित्येक लाखाची मालमत्ता होती. बहुधा बोटीवरचा तोच एकमेव श्रीमंत माणूस असावा. पुष्कळ साठलेला काळा पैसा पांढरा करायचा त्यासाठी नोकरी करायला पाहिजे असं तो सांगायचा. तसा स्वभावानी अतिशय चांगला आणि दिलदार. पण गडी रात्री एकदा बाटली घेऊन बसला की पूर्ण रिकामी केल्याखेरीज रहाणार नाही. ईस्टर सन्डे जवळ आला होता. काय घडलं कुणास ठाऊक. फर्नांडिस दिवसभर बायबल वाचायला लागला.

एक महिना त्यानी दारूला स्पर्शही केला नाही. मी म्हटलं 'चीफ स्टुअर्ड तुमको अब ये क्या हुआ ?' मेमसाब ! हमको मालूम है हम एक नंबरका बेवडा आदमी है. साला उसके बिना अपना दिमाखही नही चलेगा. हमारा पेट देखोना कितना बढ गया है. हम एकदम बूढा दिखता है क्योंकि जब हम दारू पिता है तो जादा खाता है और जब जादा खाता है तो जादा सोता है. ऐसा हम जल्दीसेभी मरनेवाला है. हमारा वाईफभी हमको कितना बोलता है. लेकिन हम सुनता नही. वो गुस्सेमे हमको बोलेगा कि एकबार सूवर गू खाना छोडेगा फिरभी तुम दारू छोडनेवाला नही. अब हम घरमे किसीको बोलेगा कि हम दारू छोडा था तो वो मानेगा नही. लेकिन अभी एक दफा छोडा है तो पीअेगा नही.' चीफ स्टुअर्डचं हे शुद्धीवर असलेले भाषण ईस्टर संडेनंतर लगेचच बाटलीत बुडून गेलं.

अशी ही विविध रंगी विविध ढंगी मनुष्यस्वभावाची माणसं या आयुष्यात नेहमी भेटत रहातात. त्यातली अशी काही व्यक्तिमत्वं त्यांची आपली आपली तऱ्हा—प्रत्येकाचा जीवन विषयक वेगवेगळा दृष्टीकोण आणि आलेल्या आयुष्याला आपल्यापरीने सामोरे जाण्याची पद्धती कळत नकळत आपला ठसा कायमचा मनावर उमटवून जाते. त्यांच्याच अनेकविध पैलूंची ही थोडीशी झलक !

बसऱ्याला बोट नदीच्या पात्रामधे नांगरुन जी उभी होती तशाच अवस्थेत बारक्या बार्जेसमधून त्यात माल भरला गेला आणि आम्ही ईस्ट लंडन (दक्षिण आफ्रिका) ला निघालो. सुरवातीचे दोन दिवस समुद्र जरा बरा होता. पण तिसऱ्या दिवशीच्या पहाटे एकाएकी त्याने आपले रौद्र स्वरूप दाखवायला सुरवात केली. आम्ही सर्वजण पहाटेच्या गाढ साखरझोपेत होतो. एकदम सोसाट्याचा वारा घोंगावू लागला ताशी साठ-सत्तर मैल इतका त्याचा प्रचंड वेग असावा. बाहेर बर्फ पडत होतं कडाक्याची थंडी होती. वाऱ्याच्या वाढत्या वेगाबरोबर समुद्रात उंचच उंच लाटा उठू लागल्या. साहजिकच बोट तीस ते पस्तीस डिग्री रोल व्हायला लागली. आम्हाला आमच्या बंकवर (बेडवर) झोपणं मुष्कील झालं. बोट उजवीकडे कलली की बेडच्या साईडला धरून ठेवायचं की ती पुन्हा तितक्याच जोराने डावीकडे कलायची. सामान इकडून तिकडे आणि तिकडून इकडे धडाधडा आपटायला लागलं. बाबानी सगळ्या खुर्च्या टेबलाला बांधून ठेवल्या. त्याला या रोलिंगची सवय असल्याने आपला तोल सांभाळत तो सगळ्या सामानाची पॅकिंग करत होता. आमच्या केबिनच्या पलीकडे ओनर्स केबिन होती. तिच्यामधली खुर्ची

बंद दार फोडून जिन्यावरून गडगडत खाली आली. गॅलीमधे प्लेटस् आणि कपबशा खूप मोठ्या प्रमाणावर फुटल्या असाव्यात. कारण त्यांचा खळकन झालेला आवाज अगदी बोटीभर घुमला. माझ्या पोटात तर अगदी ढवळून यायला लागलं. उठलं की चक्कर आल्यासारखं व्हायचं. सगळीकडे भूकंपानी उध्वस्त झाल्यासारखी केबिनची अवस्था झाली होती. आम्हाला झोप येणे शक्यच नव्हतं. तशातच दुसरा दिवस उगवला. वादळाचा वेग थोडाही कमी झाला नव्हता. तोता सकाळचा चहा घेऊन आला. कन्डेन्सड् मिल्कच्या वासाचा तो चहा मला अगदी डोळ्यासमोर नकोसा झाला. बाबा मला ब्रेकफास्टला यायचा आग्रह करत होता. पण मला उठूनही उभे रहावेना. रिकाम्या पोटापेक्षा काही खाल्लं तर खराब हवेचा त्रास होत नाही हे मलाही माहीत होतं. मी खाली गेले नाही तर तोता बिचारा माझा ब्रेकफास्ट आणि कॉफी घेऊन वर आला. मला सारखं वाटत होतं की चीफकुकनी कसा बाई ब्रेकफास्ट केला असेल कुणास ठाऊक ? मला तोताची खरच फार कीव आली. त्यामुळे त्याला नाही म्हणवेना. पण खाल्लं की पुन्हा उलट्या होणार याचीच धास्ती मला पडली होती. आश्चर्य म्हणजे वर्षालीला काहीही त्रास झाला नाही. ती मजेत होती. अशा अवस्थेत दोन-तीन दिवस गेल्यानंतर चवथ्या दिवशी सकाळपासून समुद्र हळूहळू शांत व्हायला लागला. पाचव्या दिवशी तर तो अगदी आरशासारखा संथ झाला इतका की पोटातलं पाणीही हलू नये. त्याच्या या सोज्वळ स्वरूपाकडे पाहून त्याच्या तांडवाची कुणी कल्पनाही करू शकलं नसतं. माझी अवस्था अगदी मोठ्या आजारातून बाहेर पडावं अशी त्या दोन दिवसात समुद्रानी करून टाकली होती. त्या नंतर ईस्ट लंडन येईपर्यंत तो तसाच राहिला. धीर आणि गंभीर !

आम्ही बसरा सोडल्यापासून सोळाव्या दिवशी रात्री ईस्ट लंडनला पोचलो. दक्षिण आफ्रिका अजून ब्रिटिश कॉलनी आहे. त्यामुळे तिथला नीटनेटकेपणा, सुबत्ता अगदी सहज डोळ्यात भरते. सगळीकडे उंचच उंच हिरव्यागार टेकड्यांवर वसलेली अत्याधुनिक टुमदार घरं आणि त्या सभोवतालच्या रंगीबेरंगी फुलांनी नटलेल्या रेखीव बागा बघून कुणालाही कायम तिथेच रहाण्याचा मोह व्हावा. मी पूर्वीही ईस्ट लंडन, दर्बान, केप टाऊन इत्यादी ठिकाणी गेले होते. इथे फार मोठ्या प्रमाणावर भारतीय लोक आहेत. त्यात केरळमधील लोकांची संख्या जास्त आहे. ब्रिटिशांनी हे लोक चहाच्या मळ्यासाठी मजूर म्हणून अठराव्या शतकात आणले. इथले गुजराथी व्यापारी अत्यंत सधन आहेत. त्यांचे बंगले म्हणजे आपल्याकडच्या लोकांनी फक्त सिनेमातच बघावेत ! दर्बानमधे तर आलिशान राजवाड्यासारखे प्रचंड बंगले दिसतात. इथल्या सर्व भारतीयांकडे ब्रिटिश नागरिकत्वाचे पासपोर्ट आहेत. भारतीयांची इथे देवळे आहेत, जैनांची मंदिरे आहेत. आठवड्यातून दोन-तीन वेळा तिथे भजनाचेही कार्यक्रम होतात. भारतीयांनी इथे अनेक मंडळे स्थापन

केलेली आहेत. इतकच काय त्यांची युनिव्हर्सिटीही आहे. आम्ही एका गुजराथी कुटुंबात गेलो होतो. तेव्हा त्यांच्या घरी पापड लाटण्याचा चाललेला कार्यक्रम बघून आपण आपल्या देशापासून फार दूर आहोत याचा विश्वास वाटेना. इथले गुजराथी लोक पिढ्यान्‌पिढ्या इथे राहूनही पूर्णपणे शाकाहारी आणि तितकेच सोवळे आहेत. ब्रिटिशांनी जेव्हा आफ्रिकेत आपल्या वसाहती केल्या तेव्हा ते तिथल्या लोकांमधे मिसळून राहिले. (अर्थात तीव्र वर्णभेद राखूनच. यामुळेच जगातील सर्व राष्ट्रांनी या देशावर पूर्णपणे बहिष्कार टाकला आहे. इथे प्रत्येक ठिकाणी टॅक्सी, बसेस इतकेच काय बागेतील बाकांवरही 'ओन्ली फॉर व्हाईटस्' असं स्पष्ट लिहिलेलं असतं. हॉटेलसच्या बाहेरही पूर्वी पाटी असे 'ब्लॅकस् अॅण्ड डॉग्ज आर नॉट अलाऊड.') ते अशा अर्थाने की त्यांनी आफ्रिकन लोकांना गुलाम म्हणून जरुर वागवलं. पण त्यांनी त्यांच्या स्थानिक भाषा आत्मसात केल्या. शिक्षणाची सोय केली, त्यांच्यासाठी ठिकठिकाणी दवाखाने उघडले. त्यांना सुसंस्कृत करण्यामागे त्यांचा फार मोठा वाटा आहे हे मान्यच करावं लागेल. अशा रीतीने त्यांच्या सुख-दुःखात नेहमी समरस होऊन त्यांनी आपले धनीपण वर्षानुवर्ष टिकवून ठेवलेले आहे. याउलट आपले भारतीय लोक जगाच्या पाठीवर कुठेही गेले तरी सहसा तिथल्या स्थानिक लोकांपासून अलिप्त राहिलेले आहेत. विशेषतः आफ्रिकेतील देशातून हे फार जाणवते. त्यांनी आपापसातच मंडळे स्थापन केलेली आहेत. तिथली स्थानिक भाषा शिकणे तर दूरच राहिले पण ज्यांच्याकडे ब्रिटीश पासपोर्ट आहेत अशा पिढ्यान्‌पिढ्या राहिलेल्या कुटुंबातल्या ज्या बायका भेटल्या त्यांना इंग्रजीचा गंधही नव्हता. भारतीयांनी आपल्या देशात येऊन फक्त व्यापार केला आणि ते स्वतःपुरते गबर झाले. दुसरं काहीही केलं नाही याबद्दलचा सूक्ष्म राग आफ्रिकन लोकांच्या मनात नसला तरच नवल. त्यामुळेच आफ्रिकेतीलच काय इतर कुठलीही राष्ट्र जेव्हा स्वतंत्र झाली तेव्हा पहिली हकालपट्टी भारतीयांची झाली आहे. याची पूर्ण जाणीव इथल्याही भारतीयांना आहे. आम्ही ज्यांच्या घरी गेलो होतो ते मूळचे सुरतेतले आहेत. ते सांगत होते, 'आम्ही दर दोनतीन वर्षानी भारतात येऊन आपले नागरिकत्व सिद्ध करतो. कारण हळूहळू इथले एकेक देश जसजसे स्वतंत्र व्हायला लागले आहेत तसतसे त्याचे पडसाद इथेही फार मोठ्या प्रमाणावर उमटत आहेत. इथसा काळागोरा हा भेद इतक्या अतिरेकी तणावाचा झाला आहे की हा तणाव केव्हा तुटेल सांगवत नाही. मग ब्रिटिशांआधी आमची हकालपट्टी ठरलेली आहे. हे सगळं वैभव इथेच सोडून जेव्हा जावं लागेल तेव्हा कुठेतरी आसरा पाहिजे ना? आमच्याजवळ ब्रिटिश पासपोर्ट असला तरी ब्रिटनमधे भारतीय लोक मनापासून नको आहेत. पूर्वी आम्हाला आमचे नातेवाईक कायम स्वरूपातही इथं आणता येत होते. पण गेले अनेक वर्षे परिस्थिती अधिकाधिक बिकट झाली आहे. इथला पैसा तर बाहेर पाठवता येत नाहीच पण भारतात

जाऊन लग्न केलेली बायकोही इथे आणता येत नाही. त्यामुळे इथल्या इथेच आमच्या जमातीतच अलिकडे लग्न ठरतात. त्यांचे ते भाषण ऐकून तिथेच कायमचं रहावं हा झालेला क्षणिक मोह किती अनाठायी होता याची मला तीव्रतेने जाणीव झाली. एकंदरीत अलीकडे भारतीयांचे परदेशी स्थायिक होणं हे मृगजळासारखे जीवघेणे झाले आहे.

गेले महिना दीड महिना आम्ही जमिनीला पाय लावला नसल्याने दोन दिवस अगदी मनमुराद भटकून घेतले. पण ते फक्त आम्हीच. कारण दोन दिवसात संपूर्ण माल उतरायचा असल्याने बाकीच्या कुणालाच विशेष बाहेर जाता आले नाही. त्यातच बऱ्याच लोकांची कॉन्ट्रॅक्टस संपली होती. नवीन येणारे लोक अगोदरपासूनच हॉटेलमधे येऊन राहिले होते. भारतात परत जाणाऱ्यांची सगळ्यांची शॉपिंगची जबाबदारी मी पत्करली होती. कुणाच्या मुलांसाठी कपडे, खेळणी, बायकांसाठी साड्या, कॉस्मेटिक्स. सामानाची बांधाबांध जोरात चालू होती. सगळ्यांनी आपली पत्रं लवकर पोचावीत म्हणून जाणाऱ्यांकडे दिली. कुणी आपले सामान घरी देण्यासाठी दिले. जड अंत:करणांनी सगळ्यांनी एकमेकांचे निरोप घेतले. कुणी कशाही स्वभावाचं असलं तरी सात आठ महिन्यांचा सततचा सहवास होता. एकमेकांनी आपापले पत्ते दिले हे माहीत असूनही की पुढे कोणीही कुणाला मुळीच भेटणार नाही.

आम्ही तीन दिवसात सगळी बोट खाली करून रिकाम्या पोटीच दक्षिण अमेरिकेच्या मार्गाला लागलो. मला धास्ती पडली होती की बोट एवढी भरलेली होती, तरी आपल्या तालावर सागर राजानी तिला नाचविली होती. आता तर आम्ही अगदीच रिते ! मग तिची तो काय दशा करवून टाकणार ? पण माझ्या सुदैवानी तशी वेळ आली नाही. ईस्ट लंडनहून आम्ही पाणी घेण्यासाठी केपटाऊनला जाणार होतो. केपटाऊन म्हटलं की मला तिथली हिऱ्यांची दाटीवाटीने भरलेली आलिशान दुकानं आठवतात. केपटाऊनला आमचा मुक्काम फक्त आठदहा तासच होता. पण ह्यावेळी सुदैवानी सकाळीच पोचल्याने आम्हाला टेबल माऊंटन बघता आला. केपटाऊन ईस्ट लंडनपेक्षा खूपच मोठं आहे. तसच हिरव्याहिरव्या डोंगरांच्या कुशीत दडलेलं ! टेबल माऊंटनवर जमिनीपासून एक हजार फूट वर जायला संपूर्ण काचेची ट्रॉली आहे. त्या ट्रॉलीतून वरवर चढतांना आपण हवेत तरंगत तरंगत वर चाललो आहोत याची सुखद जाणीव होते. खुद्द डोंगरावर एका रेस्टॉरंट खेरीज काही नाही. पण तिथून सबंध शहराचा जो नयनरम्य देखावा दिसतो त्याला तोड नाही. खरंच, जगातील अशी काही अलौकिक ठिकाणं पाहिली की विरहाचा तो प्रदिर्घ काळ, एकटेपणा, बोटीवरचा तुरूंगवास आणि अधूनमधून लागणारी खराब हवा या सगळ्या सगळ्याचा पार विसर पडतो आणि आपल्या या भाग्याचा आपण हेवा तर करणार नाही ना वशी भीती वाटायला लागते.

ईस्टलंडनला जे नवीन बोटीवर आले त्यांच्या ओळखी वाढायला लागल्या. केपटाऊन ते सॅनअँन्टोनिओ (चिली) हा आमचा प्रवास सत्तावीस ते अठ्ठावीस दिवसांचा होता. पण नीलू पार्टीचा भोक्ता असल्याने पार्टीज्, खेळ, गप्पा, पत्ते यात मजेत वेळ जात होता.

पूर्वी दक्षिण अमेरिकेच्या केपहॉर्नला वळसा घालून दक्षिण अटलांटिकमधून दक्षिण पॅसिफिकमध्ये शिरावे लागे. दक्षिण अमेरिकेच्या या निमुळत्या किनारपट्टीवर हवा अत्यंत खराब असते. हल्ली बोटी मेगॅलना स्ट्रेट (Megallan Strait) मधून पलीकडे जातात. हा मार्ग कालव्यासारखा अरूंद आहे. इतका की दोन्ही बाजूंचे डोंगर आपल्याला सहज दिसू शकतात. इथेही बाराही महिने अतिशय वाईट हवा असते असे बोटीवर आलेले पायलट म्हणत होते. पण आमच्या सुदैवानी आम्हाला फार चांगली हवा लागली. या ठिकाणी निसर्गाचा एक अद्‌भूत चमत्कार पाहावयास मिळाला. समुद्र सपाटीवर असलेल्या त्या ठिकाणचे डोंगर खालून गर्द झाडीने हिरवेगार झालेले पण त्यांची शिखरं बर्फाच्छादित होती सकाळी सूर्याची कोवळी किरणं त्या बर्फराशीवर पडली की रत्नजडीत मुकुटधारी ते जयविजय मोठे लोभसवाणे दिसत. या कॅनॉलमध्ये शिरण्यापूर्वीच दोन पायलटस् बोटीवर चढले. (हे पूर्वीचे कॅप्टन असून ठिकठिकाणच्या नद्या, समुद्र, महासागर यांची माहिती असणारे अधिकारी होते. बोट बंदरात आणणे आणि बंदराबाहेर नेणे हे त्यांचे काम.) ते आलटून पालटून वॉचवर असत.

बोटीवरचं आयुष्य हे खरच एखाद्या सोनेरी पिंजऱ्यातल्या पोपटासारखं असतं. आपण त्या पक्षाचे हरप्रकार लाड करतो. पण त्याला त्यात स्वारस्य वाटत नाही. दार उघडलं रे उघडलं की ते बंदिस्त पाखरू जसं खुल्या आकाशात झेपावतं तीच अवस्था या खलाशी लोकांची होते. कॅनडा ते बसरा आणि बसरा ते सॅन अँन्टोनिओ एकंदर तीन साडेतीन महिने बाहेरच्या जगाचं दर्शनच काय साधे जमिनीला पायही न लागलेले सर्वजण सॅन अँन्टोनिओचा एजंट जेव्हा आल्या आल्या म्हणाला, 'ऑल ऑफ यू आर गोईंग टु स्टे इन द हॉटेल फॉर फ्युमिगेशन. आय विल सेंड द लाँच अॅट इलेवन अे. अेम. तेव्हा बोटीवर उत्साहाची एकच लाट उसळली. सगळ्यांनी हॉटेलमध्ये रहायचं म्हणजे एक दिवसाची जाहीर सुट्टी आणि ती ही मजेत घालवायची कंपनीच्या खर्चाने ! झालं. प्रत्येकजण अगदी आपल्यापरीने नटून थटून तयार व्हायला लागला. सामानाची बांधाबांध झाली. आमचा तोता सुद्धा त्याच्या जुन्या स्टाईलच्या सुटात होता. चीफ स्टुअर्डनी आपल्या तुळतुळीत गोटयावर एकदम हिरो स्टाईल विग चढविला. आपला ठेवणीतला सफारी सूट, डोळ्याला गॉगल आणि डोक्यावर भरघोस केसाचा विग लावून जेव्हा तो माझ्यासमोर आला तेव्हा मी त्याच्याकडे बघतच राहिले.

भारतीय कंपनीत असताना मॉंट्रियलला फ्युमिगेशनसाठी असच आम्ही हॉटेलमध्ये राहिलो होतो. तिथे नेहमी ऑफिसर एका हॉटेलमध्ये आणि खलाशी दुसऱ्या हॉटेलमध्ये ठेवण्याची कंपनीची पद्धत आहे. भारतीय बोटीवरचे खलाशी हे खरोखरच परदेशी बोटींवरील खलाशांपेक्षा अत्यंत आदबीनी वागणारे असतात. पण कधी कधी त्या बिचाऱ्यांच्या अज्ञानामुळे आणि भाषेच्या अडचणीमुळे असे गंमतीदार प्रसंग घडतात की बरोबर असणाऱ्याला त्यांची अगदी लाज वाटावी.

बाबा भारतीय कंपनीत असताना ग्रीसमध्ये अथेन्सला कंपनीची बोट विकली. त्यामुळे सहाजिकच सगळ्यांनाच भारतात परत पाठविले. विमानाची तिकीटं एकदमच काढली असल्याने कुणाच्या शेजारी कुणालाही बसावे लागणार होते. भारतीय कंपनीत दुसरा मोठा करमणुकीचा प्रकार म्हणजे खलाशांचे शॉपिंग ! ते सर्वजण मिळून बाहेर पडत आणि जुन्या बाजारातून अक्षरशः मोठमोठी बोचकी खरेदी करून पाठीवर घेऊन येत. यात त्या बिचाऱ्याचा काहीच दोष नसे. कारण तेव्हा ऑफिसर्स लोकांचे पगार जिथे शंभर ते एकशे पन्नास डॉलर्स होते तिथे त्यांच्या पैशातून ते काय खरेदी करणार ? पण तिकडच्या सहा साडेसहा फुटी टॉमजॉनचे कोट आणि पँट ते जेव्हा अंगावर चढवत तेव्हा एखाद्या बुजगावण्यासारखे दिसत. शिवाय पायात कॅन्व्हॉसचे बूट असायचे. त्यांचं सामान तर इतकं भयानक असायचं. बोचकी बांधलेली, वळकट्या गुंडाळलेल्या. पत्र्याच्या मोडक्या पेट्या. (असं सामान गल्फ करून परत येणाऱ्या विमानातुन दिसतं.) हे सगळं व्ही. आय्. पी. सॅम्सनाईटस् बॅगांपुढे अत्यंत केविलवाणं दिसायचं. त्यावेळी बाबाच्या शेजारी बोटीवरचा जमादार (टॉयलेट साफ करणारा)बसला होता. बोटीवरचा तो अत्यंत महत्वाचा प्राणी असल्याने अडीअडचणीला कंपनी त्याला नेहमी विमानाने इकडून तिकडे पाठवायची. बाबाला त्या मानानी फारच कमी वेळा संधी मिळाली होती. तेव्हा तो सराईतासारखा सांगत होता, 'साब ! आप ७४७ में पहले दफा आये है क्या ? हम जब पिछली दफा लंडन गया था तो ७४७ में से ही गया था. ७०७ कइतला (toilet) आगे होता है. यहाँ पीछे भी है.' थोड्या वेळानी अेअर होस्टेस् सगळ्यांना ड्रिंक्स् बद्दल विचारायला आली. ती लांब असतानाच हा 'ए ! शुक् शुक्' करून तिला बोलवायला लागला. बाबा रागात त्याला म्हणाला 'ए, तुम ऐसा क्या करता है ? वो क्या बिल्ली है ? तुम्हे क्या चाहिए ?' साब हमको व्हिस्की मांगता है' बाबानी तिला त्याप्रमाणे सांगितल्यावर ती व्हिस्कीचा पेग घेऊन आली. ग्लास हातात देऊनही ती तिथेच थांबलेली बघून हा विचारतो. 'साब ये क्या मांगता है ?' 'अरे बाबा ! उसको दो डॉलर दे दो' 'ये क्या साब ? हमने सुना हवाई जहाज में सब ड्रिंक मुफ्त मिलता है. (इतके दिवस याने बहुधा सॉफ्ट ड्रिंकच घेतलं

असावं.) और फिर इतनीसी व्हिस्की का दो डॉलर? अपने जहाज में तो दो डॉलर में आपुन पूरा स्कॉच का बॉटल लेता है' 'ए! तुम अब चुपचाप बैठो. जहाज का बात अलग और इधर का बात अलग है. पहले उसको दो डॉलर दे दो.' असं जेव्हा बाबानी त्याला चांगलं दटावलं तेव्हा मोठ्या अनिच्छेने खिशातून दोन डॉलर त्यानी काढून दिले. थोड्या वेळानी म्युझिक ऐकण्यासाठी हेडफोन्स आल्यानंतर बाबा त्याला अगोदरच म्हणाला 'ए! देखो ये भी मुफ्त नही है. दो डॉलर देना पडेगा' 'नहीं साब! फिर अपने को नहीं मंगता. हम तुम्हाराही ले लेगा.' तर ही त्यांची बाहेरच्या जगातील वर्तणूक!

सॅन अॅन्टोनिओ हे चिलीमधलं अत्यंत छोटसं गाव असल्याने तिथे बंदराला लागूनच एकुलतं एक हॉटेल होतं. त्यामुळे तिथेच एजंट आम्हाला सगळ्यांना घेऊन गेला. आम्ही आत शिरतो न शिरतो तो तिथे वीसपंचवीस तरुण मुली घोळक्यानी उभ्या दिसल्या. थोड्या वेळाने आणखीही मुली आल्या. स्पॅनिश लोक, बायका आणि पुरुषही दिसायला अत्यंत देखणे आणि सतेज असतात. तेव्हा तिथे जमलेल्या मुलीही एकाहून एक वरचढ होत्या. मला अगोदर वाटलं या इथल्या वेट्रेसेस असाव्यात. पण दोनचार मध्यमवयीन बायका तेवढ्याच आमची व्यवस्था लावायच्या मागे होत्या. मग कदाचित या हॉटेलमधे उतरलेल्या असाव्यात! आम्ही वर आमच्या खोलीत गेलो. जरा कपडे वगैरे बदलून खाली उतरतो तो समोर तोता, चीफस्टुअर्ड चीफकुक असे बरेचसे त्या घोळक्यात बसून गप्पा मारत होते. ऑफिसर्स लोकांपैकी तरुण मंडळीही तिथे पिंगा घालत होती. त्यांच्यावर आपलं इंप्रेशन पाडण्याच्या प्रयत्नात होती. जेवणाच्या टेबलावर हास्याची कारंजी उडत होती. आपापल्या गर्लफ्रेन्डस्‌ना स्वतःच्या खर्चानी ड्रिंक्स् द्यायची, आग्रहानी जेवायला घालण्याची नुसती अहमहमिका लागली होती. सदा मख्ख चेहऱ्याचा आमचा इलेक्ट्रिशियन त्यादिवशी काय दिलखुलास हसत होता म्हणून सांगू! आम्ही जेवून वर गेलो. खाली आरडाओरड चालूच होती. दुपारी काही झोप येईना म्हणून गावात चक्कर मारायला वर्षालीला घेऊन निघालो तो वाटेत नीलू आणि घुम्याची जोडी भेटली. 'मिसेस गोखले, आय् होप यू विल् नॉट बी डिस्टर्बड् बाय धिस अॅटमॉस्फिअर! आय ऑल्सो डिडन्ट लाईक इट्. द्याटस् वाइ वुई केम आऊट.' असं मला म्हणून नीलू पुढे गेला. आम्ही सव्वाचार साडेचार पर्यंत परत येतो तो खालचा बार पोरींनी गच्च भरलेला. पुष्कळशी मंडळी फारच रंगात आली होती. तेव्हा तिथे थांबण्यात अर्थच नव्हता. म्हणून आम्ही वर्षालीला घेऊन समोर बागेत जाऊन बसलो. ते रात्री परत आलो. सबंध रात्रभर खाली धांगडधिंगा चालला होता.

दुसऱ्या दिवशी सकाळी साडेनऊ दहाला परत बोटीवर जायचं असल्याने आम्ही सगळं आटोपूनच खाली ब्रेकफास्टसाठी टेबलवर जाऊन बसतो तर वरून

नीलू आणि घुम्या पोरींच्या हातात हात घालून खाली उतरले. दोघही नेमके आम्ही बसलो त्याच्या समोरच्याच टेबलावर येऊन बसले. मला एकदम समोर बघून नीलू चाटच पडला असेल. कारण खाली डोकं घालून दोन्ही हातानी गच्च दाबत तो जो बसला ते शेवटपर्यंत त्यानी वरही पाहिलं नाही. ' मला हे असले प्रकार आवडत सुद्धा नाहीत. ' असं मला आवर्जुन सांगणारा हाच का तो निल्या ! मी मनात म्हटलं.

आतापर्यंत मी भारतीय कंपनीतून अनेकवेळा ट्रीपला गेलेले होते. तिथे पगार कमी होता हे खरं असलं तरी खलाशी नेहमी अंतर राखून वागत असत. इतकेच काय सगळे अधिकारी आपल्या प्रतिष्ठेला बाध येईलं अस निदान उघडपणे तरी वागत नसत. त्यामुळे असल्या प्रकारचा तमाशा बघण्याचा माझा हा पहिलाच प्रसंग. शिवाय मी एकटीच बाई असल्याने मला अतिशय संकोचल्यासारखे झाले होते. बोटीवर परत निघताना खलाशांचे अवतार बघण्यासारखे होते. सगळ्यांचे कपडे अस्ताव्यस्त, केस पिंजारलेले, डोळे तारवटलेले. रात्री त्यांच्यात मारामाऱ्या झाल्या होत्या. त्यासाठी पोलीसही आले होते म्हणे ! काहींना धरून नेले होते. आम्ही लाँचलाठी वाट बघत सगळ्यांपासून लांब उभे होतो. अजून एकमेकांचे निरोप घेणे, टाटा बायबाय चालूच होतं. नीलू माझ्याजवळ आला. त्याचा चेहरा उगीचच अपराध्यासारखा झाला होता. 'मिसेस गोखले ! आय् होप यू हॅड अ नाईस स्लीप. ' ' ओह् डोन्ट वरी. ' असं म्हणून त्याचं समाधान केलं. पण पुढे नीलू आणि घुम्या ट्रीपभर मला लोणी लावत होते. त्यानंतर आम्ही पुढे पंधरा दिवस होतो त्या ठिकाणी त्यामुळे आपापली मैत्री पक्की करायला सगळ्यांना भरपूर वेळ मिळाला. गंमत म्हणजे बऱ्याच जणांनी आपली नावं आणि आपली बोटीवरची पोझिशन पार बदलून टाकली होती. नीलू आणि घुम्या सॅम आणि पीटर बनून पुढे कॅरीड अवे होत राहिले. थर्ड ऑफिसर आणि सेकंड इंजिनियर बनून ! याचा पत्ता बोटीवर सगळ्यांना लागला कारण ज्या पोरींना त्यांनी अपॉईंटमेंट देऊन बोलावलं होतं त्यांना त्या दोघांनी बनवलं म्हणून त्या शोधात बोटीवर आल्या होत्या.

आम्ही रोज संध्याकाळी बाहेर फिरायला जात असू. गाव अगदीच लहान असल्याने हॉटेलमधल्या बऱ्याच मुली आपले नवरे आणि मुलांबरोबर नेहमी दिसत. म्हणजे त्या सगळ्या मुली चांगल्या घरातल्या तर होत्याच पण विवाहितही होत्या. इतके दिवस माझा समज असा होता की हा धंदा केवळ वेश्या व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांपुरताच मर्यादित आहे. पण ईझीमनीसाठी घरच्या संमतीने स्वेच्छेने जेव्हा या तरुण, कोवळ्या आणि सुंदर मुली ह्या मार्गाकडे वळतात तेव्हा समाजाच्या नीतिविषयक कल्पनाच काळाच्या ओघात किती बदलत चालल्या आहेत याची जाणीव होते. इथे म्हणे दारिद्र्यापोटी हा व्यवसाय चालतो. मग प्रश्न असा उभा रहातो की अमेरिकेसारख्या प्रगतशील जगात सर्वात सधन मानल्या गेलेल्या

राष्ट्रातही या ईझीमनीसाठी तरुणींनी याच मार्गाकडे का वळावे ? कदाचित ही काळाची गरज मानावी का ? आपल्याकडेही पाश्चात्यांच्या अंधानुकरणापायी हा ईझीमनी आपल्याकडील तरुणींना हळूहळू आकर्षित करत आहे. आपली तर अवस्था त्रिशंकूसारखी आहे. 'वुई डोन्ट वॉन्ट टु बी ईस्टर्न. बट वुई कान्ट बी वेस्टर्न !'

असं असलं तरी आपली संस्कृति आणि पाश्चात्य संस्कृति यात संस्कारामुळे जमीन अस्मानाचं अंतर आहे. म्हणूनच माणूस वयाने कितीही मोठा झाला, कितीही मोठ्या पदाला पोचला तरी हे संस्काराचं बळ त्याला कुठेतरी योग्य मार्गावर आणायचा प्रयत्न करतं. बाबा एका ब्रिटिश कंपनीत असताना तिथल्या सेकंड ऑफीसरने आपल्या लग्नाची पार्टी दिली तेव्हा एव्हरी थिंग ऑन् हाऊस इन्क्ल्यूडिंग पोरी हे बघून बाबाचं जुनं संस्कारित मन दचकणारच ! तो त्याला म्हणाला, 'अरे तुझ्या लग्नाच्या वाढदिवसाची पार्टी आणि तू अशा तऱ्हेने वागतोस ? त्यावरचं त्याचं उत्तर तार्किक दृष्ट्या मुळीच चूक नाही पण पाश्चात्य संस्कृतीचं निदर्शक आहे. तो म्हणाला, 'हे बघ ! आपल्याला घरचं जेवण आवडत ना ? कबूल. पण जरा चेंज म्हणून आपण हॉटेलमधे जातो ना ? तसच हे आहे. मी असा वागलो म्हणून माझं बायकोवरचं प्रेम थोडच कमी होणार आहे ? आज मी इथे मजा करतोय. ती तिकडे करेल पण आम्ही एकत्र आलो की आमच्या प्रेमात व नात्यात कुठेच बाध येणार नाही.' मला यात कुणालाही दोष द्यायचा नाही. कारण सुखा-समाधानाने टेबलवर बसून काटेचमच्यांनी समोर ठेवलेल्या स्वादिष्ट पदार्थांचा आस्वाद घेणाऱ्याला उपाशीपोटी उष्ट्या पत्रावळी चाटणाऱ्यांचं दुःख कळणार नाही हे तितकच खरं आहे. आणि रोज रोज स्वादिष्ट पदार्थ चाखणारे चौपाटी-वरची सार्वजनिक भेळ खाणारे इथे तरी काय कमी आहेत ? आजकाल बहुतेक सगळ्याच प्रगत राष्ट्रातून शृंगाराला दिवसेंदिवस जे एक भडक बाजारी स्वरुप यायला लागले आहे त्यामुळे तो बीभत्स आणि हिडीस वाटू लागला आहे. कालिदासाच्या नाटकातला नर्म, हळुवार, अवगुंठीत शृंगार वाचताना गालावर मोरपीस फिरवल्यासारख्या कशा नाजूक सुखद संवेदना जाणवतात. त्याच शृंगाराचं गरजेपोटी निर्माण झालेलं अगर केलं गेलेलं हे विकृत स्वरूप त्याबद्दल घृणा उत्पन्न करते एवढं मात्र खरं !

संग्रहालय
९८३
२५५७२
मुक्त जायदे

सॅन अॅन्टोनियोला आम्ही बरेच दिवस असल्याने सान्तिआगोला (चिलीची राजधानी) जायचं ठरवलं. ते तिथून ५०–६० मैल असेल. म्हणून एक दिवस सकाळीच ब्रेकफास्ट आटोपून आम्ही बाहेर पडलो. सॅन अॅन्टोनियो ते सान्तियागो लक्झरी बस होती. दक्षिण अमेरिका उत्तर अमेरिकेपेक्षा खूपच गरीब देश आहे. इथे मुख्यत्वे स्पॅनिश भाषा बोलली जाते. आम्ही तिथे होतो तेव्हा पावसाळा सुरू होता. त्यामुळे रस्ताभर सर्वत्र हिरवेगार कशिदाकारी केलेले गालीचे अंथरल्यासारखे दुतर्फा दिसत होते. सॅन अॅन्टोनियोच्या मानानी सान्तियागो खूपच मोठं शहर आहे. शहरात सर्वत्र डोळ्यात भरतात ती मालाने खच्चून भरलेली दुकानच दुकानं ! आपल्याकडच्यासारखाच 'मान्सून सेल' तिथेही सर्वत्र चालू होता. त्या दिवशी तिथे पाऊस अगदी कोसळत असल्याने चिखलातून पायी चालणे नकोसे झाले की दरवेळी एखाद्या हॉटेलमधे बसायचे असं करूनच आम्हाला संध्याकाळपर्यंतचा वेळ काढावा लागला. कारण परत जायला त्याअगोदर बसच नव्हती. वाटेतही सगळीकडं पाऊस होताच. पुन्हा परत सॅन अॅन्टोनियोला पोचलो तेव्हा संध्याकाळचे ७ वाजायला आले होते. ज्या ठिकाणाहून बस सकाळी सुटली होती तोच शेवटचा स्टॉप असं समजून आम्ही तिथे उतरण्याच्या तयारीत होतो. वर्षाली दिवसभर हिंडत होती. त्यामुळे ती बसमधेच झोपली. तिला हातावर आडवी घेऊन आधी बाबा खाली उतरला. मी मागचं सामान घेऊन दाराशी येते तो कंडक्टरनी बेल दिली आणि बस सुरू झाली. बाहेर अंधार आणि मुसळधार पाऊस अशा अवस्थेत आमची चुकामूक झाली होती. मी कंडक्टरला जोरजोरात सांगत होते. 'माय हसबंड गॉट डाऊन विथ माय डॉक्टर ऑन द लास्ट स्टॉप. प्लीज स्टॉप द बस आय् वॉन्ट टु गेट डाऊन.' पण तो स्पॅनिश बोलणारा. त्याला इंग्रजीचा गधही नव्हता. 'माय सिनिऑर' ( स्पेलिंग वगैरे माहीत नाही. नुसता शब्द माहिती होता.) माझी त्याला सांगण्याची धडपड चालू होती. बसमधले सगळे लोक एखाद्या हातवारे करून बडबडणाऱ्या वेड्या माणसाकडे आजूबाजूचे बघतात तशा कुतुहलानी माझ्याकडे बघत होते. बस सुसाट धावत होती. मला अगदी रडू कोसळायच्याच बेतात होतं. एव्हाना बस चांगली ४–५ फर्लांग सहज पुढे गेली होती. तिथं वर्षालीला हातात धरून बाबा शेडमधे जाऊन आतल्या खिडकीशी बसलेल्या क्लार्कला सांगण्याचा प्रयत्न करत होता. 'माय सोनोरीता, गॉन विथ द बस.' पण त्यालाही काही उमजेना. पावसामुळे शेडखाली बरेच लोक जमलेले होते. वर्षालीच्या अंगात टॉप कोट पँट सगळे कपडे आणि पायात बूट नाहीत. (ते माझ्याकडे होते.) तेव्हा ह्या इसमानी ही पोरगी पळवून तर आणली नाही ना या संशयानी आजूबाजूचे सगळे लोक त्याच्याकडे पहात होते. शेवटी बाबानी ठरवलं की आणखी थोडा वेळ वाट बघायची नाहीतर आम्ही समोरच ज्या हॉटेलमधे राहिलो होतो त्या मॅनेजरकडे जायचं. त्याला साधारण इंग्रजी येत होतं.

तेव्हा त्याच्या मदतीने माझा शोध करायचा. तिकडे मी बस रोखण्याचा आटोकाट प्रयत्नात होते. इतक्यात माझं वरती दोरीकडे लक्ष गेलं. अरेच्या ! मगाशी बेल मारून कंडक्टरनी स्टॉपवर बस थांबवली होती की ! माझ्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला आणि मी मोठ्या आवेगानी दोरी खेचल्याबरोबर ड्रायव्हरच्या केबिनमधली बेल खणखणली आणि त्यानी एकदम रस्त्यात बस थांबवली. मी इकडे तिकडेही न बघता सर्व सामानानिशी चक्क बाहेर उडी मारली आणि पळत उलटचा दिशेनी निघाले. रस्त्यावर अक्षरशः चिटपाखरू नव्हते. आपल्या पुण्यासारखेच मिणमिणते दिवे आणि दुतर्फा गर्द झाडी ! तशीच पावसात निथळत मी रस्त्यानी धावत होते. त्या पावसातही भीतीनी मला अक्षरशः घाम फुटला होता. एवढा तो रस्ता चिखलातून तुडवायला मला अर्धा पाऊणतास तरी सहज लागला असेल. समोर जेव्हा बाबा दिसला तेव्हा अक्षरशः जग जिंकल्याइतका आनंद झाला.

हल्ली आपल्याकडे स्वतःची मातृभाषा विसरल्याचा आव आणून इंग्रजीतच बोलणे ही मोठ्या प्रतिष्ठेची बाब अनेकांना वाटते. आपण मॉडर्न आहोत हे दुसऱ्याला यामुळेच पटतं असं अनेक तथाकथित हायरमिडल क्लासला वाटतं. (जिमखान्यावर पाहिजे तर प्रचीती घ्या.) गंमत म्हणजे जेव्हा ब्रिटीशांचे आपल्या देशावर अधिराज्य होते तेव्हा स्वदेश, स्वभाषा आणि स्वधर्म या स्वत्वानी तत्कालीन संपूर्ण तरुणपिढी भारली गेली होती. त्यावेळी लोकांनी आपले पोषाख, भाषा, रीतीरिवाज काही काही बदलले नाहीत. त्यावेळचे सगळे पुढारीही राष्ट्रीय पोषाखातच वावरले. मातृभाषेत शाळेत शिकूनच आय्. सी. एस्. झाले, बॅरिस्टर झाले. तेव्हा कॉन्व्हेंट एज्युकेशनची आवश्यकता कुणालाही भासली नाही. पण ब्रिटीश इथून गेले मात्र, आम्ही आमच्या स्वत्वाचे कवच फोडून काही नवीन गवसल्याच्या आनंदात बाहेर पडलो. ' इंडियन्स् आर मोअर ब्रिटीशर्स दॅन ब्रिटीश. ' असे उद्‌गार खुद्द एका ब्रिटीश माणसानी भारताबद्दल काढलेले माझ्या कधीतरी वाचनात आले होते त्याची प्रचीति आता अनुभवायला येतेच आहे. त्यातल्या त्यात आम्हा महाराष्ट्रीय लोकांचा यामध्ये सिंहाचा वाटा आहे. आपण इंग्रजीत बोललो नाही तर गावंढळ असं आम्हा महाराष्ट्रीय लोकांना उगीचच वाटतं. अशा लोकांची मला खरच फाऽऽर कीव येते. कारण या पृथ्वीच्या पाठीवर इतके देश असे आहेत की तिथे इंग्रजी बोलणारा प्राणी अगदी शोधावा लागतो याची त्या बिचाऱ्यांना जाणीव नसावी. इंग्लंडपासून अवघ्या तीस पस्तीस मैलावर फ्रान्स आहे. पण पॅरीसमध्ये जरा हिंडून बघा, समजत असलं तरी लोक इंग्रजी न समजल्यासारखे करून पुढे निघून जातील. जपान तर किती प्रगत देश आहे ना ? अमेरिकेची संपूर्ण बाजारपेठ आपल्या मुठीत ठेवणारा हा इवलासा देश. पण तिथेही या भाषेपायी माझी फजितीं व्हावी ? आश्चर्य नाही का ?

ए स...४

आम्ही जपानमध्ये एकंदर वीस ते पंचवीस दिवस होतो. तेव्हा थंडीचे दिवस होते. सुरवातीला पहिले पाचसहा दिवस आमचा हाकाटा मधे मुक्काम होता. या हाकाटापासूनच ताशी दोनशे साठ मैल वेगानी धावणारी बुलेट ट्रेन टोकियोपर्यंत जायला सुटते. मी पहिल्यांदाच जपानमध्ये आले होते. तेव्हा माझी उत्सुकता मला स्वस्थ बसू देत नव्हती. बोट आता इथेच विकायची असल्याने बोटीवर प्रत्येकजण कामात होता. रिपेअर्स-सर्व्हे वगैरे उपचार पार पाडण्याच्या मागे सर्वजण होते. तेव्हा आता आपण वर्षालीला घेऊन एकटच निदान मोटोमाची (शॉपिंग सेंटर) मधे हिंडून यावं असं फार वाटत होतं. पण मुख्य अडचण भाषेची होती. जर्मन, फ्रेंच, स्पॅनिश या भाषा वेगवेगळ्या असल्या तरी त्यांची लिपी रोमनच असल्याने आपल्याला संदर्भांनी अगर तर्कांनी अर्थ काढता येण्याची शक्यता असते. पण चीन आणि जपान यांची लिपी म्हणजे अगदी चैत्रांगणात तऱ्हेतऱ्हेच्या रांगोळ्या काढाव्यात तशी दिसते. म्हणून आम्ही आमच्या एजंटकडन बोटीचं नाव डॉक्सच नाव आणि पत्ता ही सर्व माहिती जपानी भाषेत लिहून घेतली. शिवाय माझ्याकडे इंग्लीश–जपानीज् डिक्शनरी होतीच. तेव्हा मी रोज बिनधास्त टॅक्सीनी हिंडत होते. बहुधा टॅक्सीवाल्याला इंग्रजी बोलता नाही आलं तरी थोडसं समजायचं. मी रोज ठराविक ठिकाणी उतरून दुकानं हिंडण्यात तासन्तास मजेत वेळ घालवत असे. रोज सकाळी ब्रेकफास्ट झाला की वर्षालीला घेऊन बाहेर पडायचं. दुपारी एखाद्या हॉटेलमधे थोडसं खाऊन पुन्हा भटकून साडेचार पाच पर्यंत परत जायचं असा माझा तिथला रोजचा कार्यक्रम होता. शिवाय हाकाटा गाईडही मी बरोबर घेत असे. त्यामुळे बोलण्याचा प्रसंगच येत नसे. बरं, हॉटेलमध्ये शिरण्याअगोदर बाहेरच हॉटेलमधल्या संपूर्ण मेनूची हुबेहुब प्लॅस्टिक मॉडेल्स् ठेवलेली असल्याने कशाला काय म्हणतात याचाही प्रश्न यायचा नाही. फ्राईड राईस -आईस्क्रीम-चहा कॉफी अगैरे जुजबी शब्द माहित होते. त्या व्यतिरिक्त पदार्थ घ्यायचा असेल तर आतल्या वेट्रेसला बाहेर बोलावून तो पदार्थ दाखवला की बरोबर तोच पदार्थ टेबलावर यायचा.

एक दिवस आम्ही बाहेर पडलो. पण त्यादिवशी माझी डिक्शनरी बोटीवरच राहिली होती. तसं काही अडणार नाही. आपण आपल्याला माहीत असलेल्या शब्दांवर भागवून घेऊ म्हणून आम्ही दोघी बऱ्यापैकी मोठ्या हॉटेलमध्ये शिरलो. आता नेहमीचीचं फ्राईड राईस आणि आईस्क्रीम मागवायचं म्हणून आम्ही टेबलवर बसलो. माझ्या समोर दोन म्हाताऱ्या बसल्या होत्या. त्यांच्या बशीतला पदार्थ चांगला आकर्षक दिसत होता. तेव्हा त्याच्याकडे बोट दाखवून वेट्रेसला तोच पदार्थ आणायला सांगायचा असं मी ठरवलं. आम्ही साधारणतः नेहमी असं करतो. जिथे आपल्याला भाषा येत नाही आणि त्यांचे पदार्थ माहीत नाहीत अशा ठिकाणी हॉटेलमधे गेलं की आजूबाजूला बसलेल्यांच्या डिशेस्‌वरून धावती नजर

टाकायची आणि दृष्टिसुख देईल असा पदार्थ वेट्रेसला दाखवायचा. बराच वेळ झाला. टेबलाशी कुणी येईना म्हणून मी त्या म्हाताऱ्या बायकांना खुणांनी विचारल्यावर त्यांनी आपल्या हातातली कुपन्स मला दाखविली. आणि समोरच्या रांगेकडे बोट दाखवले. मी उठून रांगेत नंबर लावला. माझा नंबर खिडकीशी येतो न येतो तोपर्यंत म्हाताऱ्यांनी तो आकर्षक पदार्थ संपवून टाकला होता. म्हणून मी त्या काऊंटरवरच्या बाईला बाहेर बोलावून एक पदार्थ तिला दाखवला. (तोच तो म्हाताऱ्यांच्या प्लेटमधला असं समजून !) माझ्या या कृतीमुळे अवतीभवती चांगलाच हशा पिकला होता. आमचं खाऊन वगैरे झालं. आधीच बाहेर कडाक्याची थंडी आणि वर्षालीनी आईस्क्रीम खाल्लं होतं. तेव्हा तिला शूची घाई झाली. बरोबर लहान मुलं असली की त्यांना एकदम सगळ्याची घाईच लागते. इतकी की त्या बाबतीत ती आपल्या आईवडीलांना अगदी अगतिक करून सोडतात.

विकास (माझा मुलगा-तोही भारतीय कंपनीत कॅडेट आहे.) लहान असताना त्यानेही असाच मोठा बाका प्रसंग आमच्यावर आणला होता. लंडनमधे टिल्बरी येथे असताना ग्रेज या गावात मोठा सीझनल सेल लागला होता. म्हणून त्याला घेऊन बसनी आम्ही तिथे गेलो. बसनी तिथे पोचायला चांगला अर्धा पाऊण तास लागला असेल. तिथे दुकानातून जरा इकडे तिकडे करतो तो त्याची टॉयलेटला जाण्याची भुणभुण चालू झाली. आसपास पुष्कळ शोधाशोध केली पण इलाज चालेना. (आणि तो काही आपला देश नव्हे कुठेही आश्रय घ्यायला ! रस्तोरस्ती पोलीस असतात. आणि असला गैरप्रकार करणाऱ्याला कडक शिक्षा असते म्हणूनच तिथे इतकी स्वच्छता आढळते.) शेवटी खिशाला परवडत नसतानाही टॅक्सी करून घाईघाईनी बोटीवर आलो. मी तडक त्याला फरफटत टॉयलेटमध्ये घेऊन गेले तर महाराज शांतपणे मला सांगतात 'आई आता नाही होत-गेली !'

या अनुभवावरून वर्षालीच्या भुणभुणीकडे दुर्लक्ष करणे मला शक्यच नव्हते. पण माझ्यापुढे प्रश्न असा होता की ही गोष्ट आता या लोकांच्या डोक्यात घुसवायची कशी ? मी हळू आवाजात मला सर्व्ह करणाऱ्या वेट्रेसला खुणावून सांगण्याचा प्रयत्न करत होते तर ती धावत जाऊन दोघी–तिघींना बरोबर घेऊन आली. त्यांनाही काही कळेना म्हणून उत्सुकतेनी आणखी तिघीचौघी माझ्या टेबलाभोवती काय घडतय या जिज्ञासेपायी आल्या. त्यांना बघून आसपासची गिऱ्हाईक मंडळीही जागची उठली. बघता बघता ही ऽऽऽ गर्दी जमली. वर्षालीची घाई सुरूच होती. तशा त्या कडाक्याच्या थंडीत घाम फुटण्याचा आणखी हा एक प्रसंग होता ! मी आपलं कमोडचं चित्र माझ्यापरीने काढून दाखवत होते. पण छे ! जपानमधे स्टार्सवाली हॉटेल्स सोडली तर कमोडप्रकार सर्वसाधारणपणे दिसलाच नाही.

आपल्या सारखेच इंडियनस्टाईल अगदी कमी उंचीवर असलेले संडास आणि त्याला बाबागाडीसारखं एका बाजूनी छपरासारकं हूड असतं हे कुणाला माहित होतं ? गर्दीतला प्रत्येकजण माझ्याकडे बघून आपापसात काहीतरी बोलत होता, मधेच खुदूखुदू हसत होता. ह्या सगळ्या प्रकारानी मला अगदी मेल्याहून मेल्या-सारखं झालं होतं. त्यातच ' आई ! अग लवकर चलना ?' अशी भुणभुण भर घालत होती. (खरचं ! तिला चांगल्या दोऽऽन लगावून गप्प करावं असं सारखं वाटत होतं, इतकी मी वैतागले होते.) इतक्यात माझ्या सुदैवानी कुणी एक साधारण इंग्रजी जाणकार गर्दीतून वाट काढत माझ्यापर्यंत येऊन पोचला. त्याच्या डोक्यात बहुधा अर्धवट प्रकाश पडलेला असावा. काही एक न बोलता त्यानी माझा हात धरला आणि गर्दीतून वाट काढत तरातरा निघाला. माझ्यामागे पुन्हा हाऽऽ घोळका ! त्यानी तडक मला टॉयलेट समोर नेऊन उभं केलं आणि दार उघडून आत बोट दाखवलं. मी खालच्या मानेनी होकार दिल्यावर सगळी गर्दी समाधानाचा एक मोठ्ठा सुस्कारा टाकून पांगली. तिथून वर्षालीला घेऊन मी जी निघाले ती तडक खाली आले आणि बाहेरचा रस्ता धरला. पुन्हा तिथे तोंड वर करून वावरण्याची काही माझी हिंमत झाली नाही.

आम्ही सॅनअॅन्टोनियोहून निघाल्यावर वाटेत चिलीतलीच दोन तीन लहान बंदर घेऊन पनामा कॅनॉलमधून फ्लॉरीडा स्टेट मधे टाम्पाला गेलो. पनामा कॅनॉलमधून बाहेर पडायला बोटीला दोन तरी दिवस लागतात. मी आतापर्यंत पाच सहा वेळा पनामा ओलांडला आहे: पण सुरवातीला जेव्हा गेले होते तेव्हा मानवनिर्मित त्या अजब करामतीचं मला मोठं अप्रुप वाटलं होतं. मी सारखी कुतूहलानी डेकवरच असायची. हा कॅनॉल काही ठिकाणी फक्त दोन बोटी एका-वेळी जाऊ येऊ शकतील इतकाच रुंद आहे. यामधे पाच सहा लॉकगेटस् आहेत. बोट गेटमधे शिरली की ही गेटस आपोआप बंद होतात मग पाणी भरून बोट वर उचलली जाते. पुन्हा गेटस उघडतात आणि लोकोमोटिव्हजच्या सहाय्यांनी बोट गेटमधून बाहेर पडते. पॅसिफिकमधून अटलांटिकमधे शिरताना अशा तऱ्हेनी पाणी भरून पुढे जावे लागते. याउलट अटलांटिकमधून पॅसिफिकमधे येताना अशा लॉकगेटमधे बोट आली की गेटस बंद होतात. आणि आतील पाण्याची पातळी कमी करून बोट खालच्या पातळीवर आणली जाते. या लॉकगेटसवरून गाड्या वगैरे इकडून तिकडे जाऊ शकतात. म्हणजे टॉवर ऑफ लंडन जवळच्या थेम्सब्रिज

सारखा रस्ताच वरून गेलेला आहे. हा संपूर्ण कॅनॉल घनदाट झाडींनी वेढलेला आहे. तो बांधत असताना तिथे असणाऱ्या विषारी डासांमुळे तिथे कामगार रहाण्यास मुळीच तयार होत नसत. अशा अवस्थेत शंभर वर्षापूर्वी तो कसा बांधला गेला असेल याची कल्पनाच करवत नाही. हा कॅनॉल (उत्तर) अमेरिकेने बांधलेला असल्याने करारानुसार इतकी वर्ष पनामा कॅनॉल झोन पूर्णपणे त्यांच्या मालकीचा होता. आता शंभर वर्षाचा करार संपल्यामुळे त्याला स्वातंत्र्य मिळाले आहे आणि आता हा एक स्वतंत्र देश मानला गेला आहे. या लॉकगेटसच्या आसपास मात्र तुरळक लोकवस्ती आहे. प्रत्येक लॉकगेटच्या दोन्ही बाजूला गॅलरीज् आहेत. अनेक हौशी अमेरिकन, बोटी पाळण्यातल्या सारख्या चढतात आणि उतरतात कशा, हे कुतूहलाने बघायला आलेले असतात. कित्येक वेळा बोटींची गर्दी असते. मग मात्र नंबर लावून बाहेर थांबावे लागते.

कॅनडामधेही सेंट लॉरेन्स नदी ही पुढे अशीच पाच सरोवरांच्या सहाय्यानी जोडलेली आहे. (लेक–ऑन्टेरिओ, ईरी, ह्युरॉन, मिचिगन, सुपीरियर.) त्यामुळे मिचिगन सरोवराच्या टोकाला वसलेल्या शिकागोपर्यंत बोट समुद्रसपाटीपासून एक हजार फूट उंच चढवली जाते ती अशा तऱ्हेच्या लॉकगेटसमधूनच. वाटेत थाऊजंड आयलंडस लागतात. ही प्रत्येक बेटं हिरव्यागर्द झाडींनी वेढलेली आहेत आणि त्या प्रत्येकावर एक–एक घर आहे. अर्थातच कोटचाधीश अमेरिकनांच्याच ती मालकीची असावीत.

टाम्पाला आमचा मुक्काम थोडा असल्याने डिस्नेवर्ल्ड बघण्याची आमची संधी कशी हुकली याचा मागे उल्लेख आलेलाच आहे. तोंडाशी नेलेल्या सुग्रास घासात अवचित माशी दिसावी तसाच तो प्रकार झाला. टाम्पाहून आम्ही सतरा दिवसांचा प्रवास करून रॉटरडॅमला गेलो. नेदरलँड म्हणजेच आपल्याला लहानपणापासून माहीत असलेला हॉलंड देश. पहिल्यापासूनच चित्रात दिसणाऱ्या तिथल्या पवनचक्कीचं मला फार आकर्षण वाटायचं. हॉलंड हा देश सखल भागात वसलेला आहे. पूर्वी त्याचा बराचसा भाग पाण्याखाखी होता म्हणे. आता मात्र पाणी वाहून गेल्यावर पुष्कळ भागात वसाहती झालेल्या आहेत. पुन्हा समुद्राचे पाणी त्यात येऊन घुसू नये म्हणून काठाकाठाने भक्कम बंधारे बांधले आहेत. या पाण्यावरच पवनचक्क्या चालतात. आम्ही तिथे गेलो होतो तेव्हा नुकताच हिवाळा सुरू झाला होता. त्यामुळे रस्तोरस्ती आणि घरादारातून विविध तऱ्हेच्या रंगीबेरंगी फुलांचे अक्षरश: ताटवेच्या ताटवे बहरलेले होते. ट्यूलिप्सच्या बागा म्हणजे तर साक्षात इंद्रधनुष्य धरेवर अवतरलेले! डच लोक स्वच्छतेबद्दल फार प्रसिद्ध आहेत याची प्रचीती अक्षरश: रस्तोरस्ती येते.

एवढ्या लांबच्या प्रवासानंतर इथे आम्हाला तीनचार दिवसांचा मुक्काम मिळाला. त्यातून ड्यूटीफ्री शॉपचं मोठं आकर्षण होतं. दुकानदारांनी खलाशी

लोकांची बाहेर जाण्याची उत्सुकता ओळखून लक्झरी बसची फुकट सोय केली होती. मग काय, टोळधाड पडावी तशी खरेदीची झुंबड उडाली. तुम्ही मेंढरांच्या कळपाची गोष्ट ऐकली असेल. त्यातला एक म्होरक्या जसा जिथे जाईल त्याच्या मागोमाग सबंध कळपच्या कळप जात रहातो बोटीवरची खरेदीही अशीच असते. एखाद्यानी एखादे नवीन मॉडेल आणले आणि ते इतर ठिकाणापेक्षा कसे स्वस्त पडले याचे वर्णन केले की प्रत्येकाच्या केबिनमधं थोड्या फार फरकानी त्यातल्या वस्तू येणारच. आम्हीही त्याच कळपातले. तेव्हा थोडी फार खरेदी करून रॉटरडॅम बघायला जवळच्याच रेल्वेस्टेशनवर गेलो.

परदेशात हिंडताना तिथल्या लोकांमधे सामाजिक जबाबदारीची (ज्याला पब्लीक सेन्स म्हणतात) जाणीव त्यांच्या रक्तातच किती भिनलेली आहे याचे वेळोवेळी प्रत्यंतर येते. तिथली स्वच्छ रेल्वेस्टेशन्स, रस्ते, संपूर्ण काचेच्या आगगाड्या कुठेही बघा. आम्ही गाडीत बसल्यावर वर्षालीनी नेहमीच्या सवयीनी मला प्रश्न केला 'आई ! इथे लंगडा कसा येत नाही ग? आपल्याकडे अशिक्षित लोकांची संख्या जास्त आहे हे गृहीत धरलं तरी मूठभर सुशिक्षित लोकांमध्ये तरी पब्लिक सेन्स दिसतो का? आपल्या घरापुढचा केर उचलून पलीकडच्या दारात नेऊन टाकणे ही आमच्या उच्चभ्रू समाजाची स्वच्छतेची कल्पना! आपल्याकडे सुस्थितीतल्या आगगाड्या, बसेस, थिएटर्स यांच्या मधल्या गाद्यांची झालेली नासधूस–सर्वत्र दिसणाऱ्या पानाच्या पिचकाऱ्या आणि त्यांना आलेलं कचरापेटीचं स्वरूप खरोखरच चीड आणतं. जसं जसं पश्चिमेकडून पूर्वेकडे यावं तसतशी अशा तऱ्हेची दृश्यं ठळकपणे नजरेत भरतात. मग मात्र वाटायला लागतं आता आपली मातृभूमी काही इथून फार दूर नाही. याला मोठ्ठा अपवाद जपानचा आहे हे मात्र विसरता येणार नाही.

रॉटरडॅमहून आम्ही जेन्ट (बेल्जियम) ला गेलो. पूर्वीही ब्रसेलस वगैरे ठिकाणी खूप हिंडलो होतो. बेल्जियममधे बारा–तेराव्या शतकापासूनच्या जुन्या वास्तू, चर्चेस अजूनही अतिशय सुस्थितीत ठेवलेली आहेत. तिथल्या दोन दिवसांच्या मुक्कामात जी जी ठिकाणं बघणं शक्य होतं तिथं तिथं आम्ही जाऊन आलो.

बेल्जियम ते पोर्टो-ला-क्रूझ (व्हेनिझुएला, दक्षिण अमेरिका) असा पुन्हा सतरा दिवसांचा अटलांटिक मधला प्रवास करूनही आम्हाला एकंदर महिना व्हेनिझुएला अँकरेज वर काढावा लागला. बाहेर जाण्यासाठी एजंटनी लाँचची व्यवस्था केली होती. पण समुद्र जेव्हा शांत असेल तेव्हाच मला गँगवे वरून उतरणे शक्य होते. कारण बोट संपूर्ण रिकामी असल्याने पाण्याच्या वर तीन चतुर्थांश होती. त्यातून खलाशी वगैरेंबरोबर जायचं म्हणजे कदाचित त्यांचा तमाशा बघायचं नशिबी यायचं ही धास्ती होती. व्हेनिझुएला हा देश तसा प्रगत नाही. मध्यपूर्वेकडील देश जसे अचानक पेट्रोलच्या जागतिक मागणीमुळे अफाट श्रीमंत झाले आहेत तीच अवस्था याही देशाची आहे. त्यामुळे तेथील लोकांच्या सांस्कृतिक

दर्जात काही फारसा फरक पडलेला नाही. आम्ही तिथे होतो तेव्हा तिथला पेट्रोलचा दर लिटरला पंचवीस पैसे (आपल्याकडील) होता तर टोमॅटो पंधरा रु. किलो होते.

पहिल्या दिवशी आम्ही बाहेर गेलो. कुणीही माहितीचे नसल्याचे रस्त्यातून दुकानं न्याहाळत हिंडायचं, नंतर एखाद्या हॉटेलमधे बसून काहीतरी खायचं आणि परत जायचं याशिवाय करणार तरी काय ? असेच आम्ही एका दुकानासमोर उभे होतो. इतक्यात समोरच्या चौकातून एक गाडी आमच्या समोरच्या फूटपाथशी थांबली आणि त्यातून बरेचसे भारतीय पण नेपाळी चेहऱ्याचे गृहस्थ उतरले. त्यांनी रस्ता ओलांडला आणि आम्ही ज्या दुकानासमोर उभे होतो तिथे ते आले. 'आय थिंक यू आर इंडियन्स !' त्यांनी माझ्या साडीकडे आणि कुंकवाकडे बघून विचारले. (सुदैवानी मी त्यादिवशी साडी नेसले होते. नाहीतर पुढे जो महिनाभर आम्हाला पाहुणचार मिळाला तो मिळालाच नसता.) 'माय नेम ईज कृष्णा श्रेष्ठ. आय ॲम फ्रॉम खाटमांडू.' त्यांनी आपला परिचय करून दिला. 'आय स्टे हियर इन बॅचलर क्वार्टर्स. बट इफ यू डोन्ट माईण्ड आय विल इन्ट्रोडयूस यू टु सम ऑफ माय इंडियन फ्रेंडझ् हु आर विथ देअर फॅमिलीज'. आम्हाला अर्थातच खूप आनंद झाला. कृष्णा श्रेष्ठ त्यांच्या गाडीतून आम्हाला डॉ. माथूरांकडे घेऊन गेले. तिथे डॉ. महंमद, डॉ. रशीद वगैरे अनेक कुटुंबांशी त्यांनी आमची ओळख करून दिली. तिथल्या युनिव्हर्सिटीत ते सगळे केमिस्ट्री डिपार्टमेंटमधे असल्याने रोजच्या रोज एकेकाच्या घरी त्यांच्या भेटी होत अलका माथूर आणि फौजिया महंमद यांनी आपल्या अगत्यानी आणि आपुलकीनी केव्हाच आम्हाला आपल्यात सामावून घेतले. बोटीवरच्या सगळ्या ऑफिसर्सना त्यानी त्यांच्या घरी अगदी आग्रहानी पार्टीला बोलावलं होतं. जगाच्या पाठीवर इतक्या दूर सर्वसामान्यांनी नावही न ऐकलेल्या त्या लहानशा गावात रसमलाई. कोफ्ताकरी, पुलाव मटण-पॅटीस आणि दहीवडे यासारखे अस्सल भारतीय पदार्थ आम्हाला मिळाल्याने सगळ्यांनाच फार दिवसांनी घरगुती जेवणाचा आनंद मिळाला. आम्हीही त्या सर्वांना बोटीवर बोलावलं होतं. आमचा कुक सगळा मेनू तयार करणार होताच. पण मी कांद्याचे पकोडे आणि शेवयाची खीर स्वीट डिश म्हणून करावी असा सगळ्यांनी आग्रह केला. भज्यांसाठी बोटीवर नेहमी आटा वापरतात. पण माझ्या सांगण्यावरून चीफ स्टुअर्डनी किनाऱ्यावरून हरभऱ्याची डाळ मागवली आणि नीलूनी ग्राईंडरवर त्याचे पीठ तयार करून दिलं. त्यामुळे खऱ्याखुऱ्या श्रमाची भजी सगळ्यांना मिळाली. सुरवातीपासूनच माझ्या तिथे इतक्या ओळखी झाल्या होत्या की तिथला दीड महिनाचा काळ कसा भुर्रकन उडून गेला. त्यामुळे व्हेनिझुएला सोडताना आपण आपल्या माणसांपासून दूर जावं इतकं मला वाईट वाटलं.

व्हेनिझुएलामधे बोट नांगरुन उभी असताना मन अगदी अस्वस्थ करणारा एक प्रसंग आमच्या पलीकडे नांगरुन उभ्या असलेल्या 'थेल्माडिस' या ग्रीक बोटीवर घडला. एका संध्याकाळी दिवेलागणीची वेळ होती. आम्ही बाहेर डेकवर उभे होतो.इतक्यात समोर उभ्या असलेल्या बोटीवरून कुणीतरी लाईटच्या सहाय्यानी किनाऱ्यावर संदेश पाठवण्याचा प्रयत्न करतंय असा आम्हाला संशय आला. थोड्या वेळानी दिवाळीत दारुकाम व्हावे अशा तऱ्हेचे सिग्नलस् ती बोट पाठवू लागली. आम्ही वर जाऊन व्हीएचएफवर ऐकलं. थेल्माडिसचा कॅप्टन असहाय होऊन वैद्यकीय मदतीसाठी प्रयत्न करत होता. बोट समुद्रात नांगरुन उभी असली की फिशिंग हा खलाशांचा एकमेव आवडता उद्योग असतो. त्या बोटीवरचा एक खलाशी मासे पकडत असताना कसा कुणास ठाऊक त्या गळाचा हूक हिसड्यासरशी त्याच्या पोटात घुसला होता आणि वैद्यकीय मदतीशिवाय तो काढणं धोक्याचं होतं. जसजसा वेळ जात होता तसतशी कॅप्टनच्या सुरातली असहायता जाणवत होती. त्या न बघितलेल्या खलाशाची काय अवस्था झाली असेल याची मलाच काळजी लागून राहिली होती बोटीवर सुसज्ज हॉस्पिटल, ऑपरेशनची सोय सगळं असलं तरी क्वॉलिफाईड डॉक्टरच्या अभावी सगळं निरर्थक असतं. अमेरिकेची कोस्टगार्ड सर्व्हिस उत्तर अटलांटिक आणि उत्तर पॅसिफिकमधे कुठल्याही तऱ्हेच्या वैद्यकीय मदतीसाठी सदैव तत्पर असते. वायरलेसवरून रोग्याची माहिती व लक्षणे विचारुन त्यानुसार डॉक्टरी सल्ला देण्यात येतो. तेवढीच गरज असेल तर हेलिकॉप्टरच्या सहाय्यानी रुग्णाला तातडीनी घेऊन जातात. ह्याच बोटीवरचा रेडिओ ऑफिसर समुद्रात असताना असाच हेलिकॉप्टरनी हलवला होता. पण काही काही वेळा काय होतं रोगी भीतीनी भलतीच माहिती देतो.

बाबा ग्रीक बोटीवर असताना बोट सव्हानाहून फिलिपिन्सला जायला निघाली होती. ती जेमतेम दोनशे मैलही गेली नसेल तर एका खलाशाच्या पोटात तीव्र वेदना सुरू झाल्या. रेडिओ मेसेज पाठवल्यानंतर त्याला ताबडतोब हॉस्पिटलमधे हलवण्याचा कोस्टगार्डनी सल्ला दिला. त्याप्रमाणे बोट मागे फिरवून सव्हानाला आली. बंदरात हॉस्पिटलची ॲम्ब्युलन्स, डॉक्टर्स वगैरे सगळी तयारी होती. त्याला लगेच हॉस्पिटलमधे दाखल करण्यात आले आणि बोट तिथून बाहेर पडली. ती पनामा कॅनॉलमधे जाते न जाते तो तिथे हा खलाशी बोटीवर हजर! 'साब ! ये गोरा डॉक्टरको अपना बीमारी नहीं समझता. गोरा लोगोंका बीमारी अलग अपना अलग होता है.' हे त्याचं स्वत:चं त्याला उत्तर होतं. खरं कारण नुसत्या मेसेजवरून डॉक्टरांना जी अपेंडिसायटिसची शंका होती ते निदान चुकीचं ठरलं.

अशा तऱ्हेनी बोट जेव्हा डायव्हर्ट केली जाते तेव्हा पुढच्या बंदरात होणारा खोळंबा, तेलपाणी यासाठी होणारा खर्च, तिथला हॉस्पिटलचा खर्च याबाबत

कसून चौकशी होते. कारण याबद्दल भरावे लागणारे पैसे कुणी द्यायचे हा वादाचा प्रश्न असतो–बोटीच्या ओनरनी ? चार्टरर पार्टीनी का इन्शुअरन्स कंपनीनी ? हा खर्च कित्येक हजारात असतो. म्हणून कुठलाही निर्णय घेताना अशा बाबतीत कॅप्टनला फार सावधगिरी बाळगावी लागते. बोटीवर बायको व मुलं जेव्हा न्यायची असतात तेव्हा कंपनीचा असा नियमच असतो की कुठल्याही परिस्थितीत हा खर्च ज्याचा त्यालाच करावा लागतो. अर्थात बोटीवर काम करणाऱ्यांचा सगळा खर्च इन्शुअरन्स कंपनी करते. काही काही कंपन्यांतून कुटुंबाच्या इन्शुअरन्सची सोय केली आहे. पण मला नेहमी वाटतं, इतकी ही यातायात करण्यापेक्षा प्रत्येक बोटीवर पॅसेंजर बोटीसारखा एखादा क्वॉलिफाईड डॉक्टर नेमला तर त्रास कमी होणार नाही का ? शिवाय त्यामुळे सतत घरापासून दूर रहाणाऱ्या या खलाशांना एक प्रकारची मानसिक सुरक्षितताही लाभेल.

इतक्यात थेल्माडिसच्या दिशेनी एक मोटार लाँच जाताना दिसली आणि मीच एक सुटकेचा निश्वास टाकला. पण पुढे त्या घटनेनंतर अनेक दिवस मी बेचैन होते. हा प्रसंग पुढे मागे आपल्यावरही आला तर पुढच्या आयुष्यभर तो खर्च भरून काढायला कुठेतरी गहाणच रहावे लागेल या आशंकेनी !

व्हेनिझुएलात एकंदर दीड महिना मुक्काम असूनही शेवटच्या क्षणापर्यंत पुढे कुठे जायचं हे निश्चित ठरल नव्हतं. सेलिंगच्या वेळी बहुधा न्यूऑर्लिन्सला जायचं एवढी कुणकुण लागली होती. न्यूऑर्लिन्स हे गल्फ ऑफ मेक्सिकोमध्ये मिसिसिपी नदीच्या मुखावर वसलेलं आहे. ही जगातली सर्वात लांब नदी ! मिसिसिपी MISSISSIPPI असं गमतीशीर तिचं स्पेलिंग वाचलेले असल्याने ही नदी कशी असेल याबद्दल उत्सुकता होती. पण प्रत्यक्षात दारुण निराशा झाली. मानवनिर्मित वैज्ञानिक प्रगतीनी निसर्ग सौंदर्याचा आणि संपत्तीचा केलेला भयंकर संहार या पलीकडे या नदीचं वर्णन करणे कठीण आहे. नदीच्या दोन्ही किनाऱ्यावर कारखान्यांची नुसती दाटी आणि त्यांच्या धुरांड्यातून सतत ओकत असलेला धूर यांच्यामधून दूषित वायू आणि द्रव्यें वाहून नेणारी गटारगंगा एवढंच तिचं स्वरूप माझ्यातरी आठवणीत राहिलं आहे.

आम्ही न्यूऑर्लिन्सला चोवीस डिसेंबरला पोचलो. त्यामुळे तिथला ख्रिसमस सोहळा बघायला मिळाला. एकतीस डिसेंबरच्या रात्री बोटीवर न्यू ईयरची मोठी पार्टी झाली. १९७७ या वर्षाला मोठ्या आनंदाने निरोप देऊन आम्ही झोपलो

एक जानेवारीला सकाळीच बीबीसीवर पहिली बातमी ऐकायला मिळाली. " सम्राट अशोक " मुंबईच्या सांताक्रूझ विमानतळावरून टेकऑफ घेऊन निघालं ते दोन मिनिटांच्या आत 'अरेबियन समुद्रा'त कोसळलं. यातले कुणीही वाचण्याची शक्यता नाही." नव्या वर्षाची सुरवात ही अशी झाल्याने मनात पाल चुकचुकली. दुसऱ्या दिवशी दोन जानेवारीला न्यूऑर्लिन्स्च्या वर्तमानपत्रात 'चंद्रगुप्त जयंति' ही बोट पोर्टलँड (ओरेगॉन स्टेट) हून पर्शियन गल्फकडे परतीच्या प्रवासाला जाताना हवाई बेटांजवळ होनोलुलुच्या आसपास बुडाल्याचे वृत्त वाचले. 'बोटीवर चार बायका आणि तीन मुलेही होती. कोस्टगार्ड बोटीच्या शोधात आहेत. पण तिचा कुठेही पत्ता लागलेला नाही. एक लाईफबोट उतरवलेली व त्यात काही सामान एवढाच मागमूस त्या प्रचंड बोटीनी मागे ठेवला आहे.' ही बातमी वाचली आणि मनात घर करून राहिलेली हुरहुर आणखीच वाढली. कारण न्यू ऑर्लिन्स्नंतर लॉस-एन्जलस आणि तिथून जपान हा आमचा परतीचा प्रवास होता. नंतरही पुढे एक दोन दिवस त्या संबंधीच्या बातम्या येतच होत्या. 'बोटीच्या कार्गोहोल्डमधे गहू वरपर्यंत भरलेला होता. त्या होल्डमधे पाणी शिरले आणि गहू फुगल्याने संपूर्ण होल्ड एक्स्प्लोड झाला. हवा अतिशय खराब असल्याने हे सगळं इतकं ऐनवेळी लक्षात आलं की त्यावर काहीही उपाय करणं अशक्यच झालं. त्यामुळे एका क्षणार्धात बोटीला जलसमाधी मिळाली.' खरच काय हाहाःकार उडाला असेल त्यावेळी ! माझं मन कल्पनाशक्तीनी ती सगळी दृश्यं डोळ्यासमोर उभी करून मला आणखीच अवस्थ करत होतं.

हळूहळू जसजसे दिवस लोटले तसतसा मला त्या घटनांचा पूर्णपणे विसर पडला. आम्ही न्यू ऑर्लिन्सहून लॉस एन्जल्सला जाणार होतो. तेव्हा पुन्हा डिस्नेलँडची स्वप्न मी बघायला लागले. टाम्पाला डिस्नेवर्ल्डची हुकलेली संधी आता यावेळी आपण नक्की पकडू असं वाटलं. लॉसएन्जलसला बोट फक्त तेलपाणी घेण्यासाठी जाणार असल्याने मुक्काम अर्थातच दहा-बारा तासांचाच होता. आमच्या बोटीच्या रोजच्या स्पीडनुसार तिथे बरोबर सकाळी सात साडेसातला पोचणार असा सगळ्यांचा अंदाज होता. आता लॉस एन्जलसला पोचायला केवळ दोन तीन दिवसांचाच अवधि होता. तोच अचानक सोसाट्याचा वारा वाहू लागला. दूरवर कुठतरी वादळ असले की त्याचे असे परिणाम (आफ्टर इफेक्टस) असतात. त्यामुळे सहाजिकच समुद्रात मोठमोठ्या लाटा उठू लागल्या. समोरून येणाऱ्या लाटांमुळे बोटीचा वेग कमी झाला आणि आम्ही सकाळी पोचणार होतो ते दुपारी अडीच तीनला पोचलो. अशा तऱ्हेनी ह्यावेळी माझी संधी एकाच ट्रीपमधे दुसऱ्यांदा हुकली. हा मला मोठा अपशकुन वाटला. दुपारी पोचल्यावर आम्ही बाहेर पडलो पण तिथे हिवाळा असल्याने डिस्नेलँड पाच वाजतातच बंद होते हे

एजंटनी अगोदरच सांगितले होते. रात्री अकरा साडेअकराला बोट जपानला जायला बावीस दिवसांच्या प्रवासाला निघाली.

लॉस एन्जल्स् सतरा फेब्रुवारीला सोडले. पहिले चार-पाच दिवस हवा चांगली होती. आता परतीचा प्रवास होता. तेव्हा घरी जायचं या आनंदात आम्ही होतो. बावीस-तेवीस तारखेपासून मात्र अव्याहत आम्ही चक्रीवादळांच्या (ज्याला हरिकेन म्हणतात.) तडाख्यातच सापडायला लागलो. (समुद्रात नेहमीच अशी वादळं कुठल्याना कुठल्या भागात उठतच असतात. वाऱ्याच्या वेगाच्या कमी अधिक तीव्रतेनुसार स्टॉर्म गेल आणि हरिकेन असे शब्द वापरले जातात. एखाद्या ठिकाणी हवेचा दाब कमी झाला की तिथे लो प्रेशर एरिया तयार होतो. अशावेळी हाय प्रेशरएरियाकडून वारे त्या दिशेकडे वाहू लागतात. वाऱ्याच्या वेगामुळे पाणीही त्या दिशेनी खेचले जाते. ज्यावेळी ताशी पन्नास-साठ मैलानी वारा वहातो तेव्हा समुद्रात प्रचंड लाटा उठतात. या लाटा कमी दाबाच्या पट्ट्याच्या दिशेनी एका केंद्रबिंदूकडे येत असतात. दुर्दैवानी या भोवऱ्यात बोट सापडलीच तर जलसमाधी ही ठरलेलीच असते. अशा तऱ्हेच्या एरिया वेदर रिपोर्टवरून अगोदरच सूचित केल्या जातात. हल्ली मशीनद्वारा हा वेदर रिपोर्ट चार्टसवरच मिळतो. त्यामुळे त्या केंद्रबिंदूपासून आपला मार्ग दूर ठेवण्याची संधि मिळते. तरीही त्याच्या आसपासच्या भागात या वादळाच्या तीव्रतेनुसार तडाखे बसल्याशिवाय रहात नाहीत.) एकीकडे पर्वतप्राय लाटा आणि त्यामुळे दुसरीकडे निर्माण होणारी प्रचंड दरी, समोरुन ताशी पन्नास-साठ मैलानी वहाणारा वारा या सगळ्या माऱ्यामुळे बोट ताशी तेरा चौदा मैलानी (नॉटस्) पुढे जायची ती चार पाच मैलही जेमतेम सरकत नव्हती. त्यामुळे एका ठिकाणच्या वादळी टप्प्यातून बाहेर पडतो न पडतो तो दुसरे वादळ आम्हाला गाठत होतं. सव्वीस फेब्रुवारीला मात्र अगदी पराकाष्ठा झाली. समुद्रात अक्षरश: शंभर ते दीडशे फूट उंच धबधब्यासारखे पाणी उसळत होते. ढगाळ हवा, अखंड कोसळणारा पाऊस यामुळे वातावरण धीरगंभीर वाटत होते. बोटीचा वरचा ब्रीज पन्नास ते साठ फूट उंच असतो. (म्हणजे आपल्या तीन चार मजल्याच्या इमारतीएवढा) त्याच्यावरुन पाणी पलीकडे जात होतं. म्हणजे त्याच्या वेगाची कल्पना करा. तो दिवस बाबाच्या वाढदिवसाचा होता. मी केव्हाच आडवी झाले होते. बाहेर निसर्गाचं प्रचंड तांडव चालू होतं. पण बोटीवर वाढदिवसाची पार्टी जल्लोषात चालू होती. एकटी मी सोडून सगळे जण अगदी मजेत होते.

अशा रुद्रावतारात दोन मार्चचा एकच दिवस असा उजाडला की आम्हा सगळ्यांचच नशीब बळकट म्हणून त्यादिवशी समुद्र काहीसा शांत झाल्याने खलाशी पहिल्यांदा बोटीच्या डेकवर जी काही मोडतोड झाली होती ती बघायला सकाळीच गेले होते. बोटीचे अँकर (नांगर) जिथून खाली पाण्यात सोडले जातात तिथले लॉकर्स पाण्याच्या अखंड माऱ्यानी पार तुटून सगळे पाणी फोरकॅसल

स्टोअरमध्ये (बोटीच्या पुढच्या भागात) घुसले होते. आत साठलेल्या पाण्याच्या जोरामुळे स्टोअरचा आतला लॉकर मोडून पडला होता. आत तेलाची मोठमोठी पिपं जी लोखंडी दोरखंडानी एकमेकांना बांधून ठेवलेली होती ती पार चिपाडासारखी चेमटून गेली होती. मोठमोठ्या नायलॉनचे दोर, ज्यांनी बोट बंदरात बांधून ठेवतात, तुटून त्यांचे अक्षरश: तुकडे तुकडे झाले होते. पाणी स्टोअरच्या दरवाज्यापर्यंत भरलेले होते. त्यामुळे आत असलेल्या लाईफराफ्टचे (संकटकाळी बोटीबाहेर पडल्यावर लाईफ बोटीप्रमाणे वापरतात.) नावनिशाणसुद्धा उरले नव्हते. आत ठेवलेले मोठमोठे लाकडी ओंडके दारावर येऊन धडाधडा आपटत होते. हे प्रथम बोसनच्या (डेकवरच्या खलाशांचा मुख्य) लक्षात आले. मग बोटीवर एकच धावपळ उडाली. कारण पाणी हळूहळू नं. एकच्या कार्गोहोलमधे घुसायला लागलं होतं. हा प्रसंग 'चंद्रगुप्त जयति' बोट ज्या हवाई बेटाजवळ होनोलुलूच्या आसपास बुडाली तिथेच घडला. एखादा दिवस जरी उशीर झाला असता तरी बोटीचा पुढचा भाग संपूर्णपणे पाण्यानी भरायला मुळीच अवधि लागला नसता. सगळ्यांची पुढील दोन दिवस रात्रंदिवस चाललेली अव्याहत धावपळ आणि चिंताग्रस्त चेहरे बघून मी बाबाला सारखी विचारत होते, 'नक्की काय झालय ? सगळ्यांची एवढी धावपळ का चालली आहे ?' तो मला शांतपणे म्हणतो, 'कसली धावपळ ? अग-विशेष काही नाही आणि तुला वाटतंय तितकं घाबरण्यासारखं तर मुळीच काही झालेलं नाही.' या त्याच्या बोलण्यावर माझा मुळीच विश्वास बसला नाही म्हणून मी येणाऱ्या जाणाऱ्याकडे चौकशी करत होते. 'वसु ! तू उगीचच काळजी करतेस. अग ! तशीच वेळ आली तर आपण सगळे बरोबरच खाली जाऊ. माझी काही त्या लाईफ बोटीचा आश्रय घ्यायची मुळीच इच्छा नाही. अग ! ह्या प्रचंड लाटांपुढे एवढी अवाढव्य बोट वाटेल तशी फेकली जाते आहे, तिथे त्या लाईफ बोटी काय टिकाव धरणार ? उगीच समुद्रात पडून माशांनी लचके तोडून तोडून हाल होऊन मरण्यापेक्षा शांतपणे बोटीबरोबर खाली गेलेलं बरं.'

आता ही परिस्थिती काळजी करण्यासारखी का थट्टा करण्यासारखी होती ? अर्थात ह्या जीवघेण्या थट्टेनी माझा पारा चढला आणि काळजीचा घोर शत, पटीनी वाढल। मला डोळ्यापुढे विकास दिसायला लागला. तो घरी राहिला होता आणि लॉस एन्जल्स सोडल्यानंतर एक दोन दिवसांनी त्याला पुण्याला फोन करून आम्ही आता लवकरच घरी येणार आहोत हे सांगितलं होतं. मी मनातल्या मनात परमेश्वराची प्रार्थना करत होते, नानातऱ्हेचे नवस बोलत होते. त्या परमेश्वराची कृपा म्हणूनच त्यानी दोन मार्चचा दिवस मधे आम्हाला दाखवला होता. त्यामुळे पाणी नेमकं कुठून घुसतय त्याचा पत्ता लागला. रात्रदिवस हातपंपानी पाणी उपसण्याचे काम सुरू झाले. वरुन सतत कोसळणारा पाऊस आणि लाटांचा अखंड मारा सुरूच होता. पण ज्या ठिकाणी अँकरचे लॉकर्स तुटले होते तिथे

तात्पुरते वेल्डिंग केल्याशिवाय पाणी आत घुसण्याचे थांबणार नव्हते. कुणीतरी वर्षालीसाठी एक लहान लाईफ जॅकेट आणून दिलं होतं. ती ते सारख घालायचा हट्ट करत होती. 'आई ! बेल वाजली की हे घालायच ना ?' तिचं ते कुतूहल मला अशुभसूचक वाटत होतं. सगळे ज्युनियर ऑफिसर्स मला सारखं म्हणत होते. 'मेमसाब ! अब लाईफ जॅकेट पहेनकेही सो जाना. कभी बुलावा आयेगा तो तैयार रहना !' मला घराची ओढ लागली होती. आता आमची विकासशी भेट होते की नाही एक परमेश्वरच जाणत होता.

तीन मार्चपासून पुन्हा वादळानी बोटीला तडाखे द्यायला सुरवात केलीच होती. आता बोटीचा मार्ग बदलणे याशिवाय पर्यायच उरला नव्हता. त्या अवस्थेत संपूर्ण बोट फिरवून आम्ही मागे परतणार होतो. दक्षिणेकडे चार ते पाच डिग्री खालपर्यंत. तरच लोकांना डेकवर जाऊन काम करणे शक्य होते. बोटीचा सायरन वाजला. बोट संपूर्ण फिरवली जाणार आहे अशी सूचना देण्यात आली. मी वर्षालीला घेऊन बेडच्या कोपऱ्यात घट्ट धरून बसले होते. बोट फिरवत असताना एका बाजूला ती तीस ते पस्तीस अंश कलंडायची आणि थरथरत दोन तीन सेकंद तशाच अवस्थेत रहायची. वाटायचं, आता ह्याच दिशेनी मोठी लाट आली तर ही उपडी होणार. क्षणभर श्वास रोखला जायचा. पुन्हा ती दुसऱ्या बाजूला झुकली की सुटकेचा निश्वास सोडायचा. अशा अवस्थेत काढलेली अवघी दहा पंधरा मिनिटं युगायुगासारखी भासली. शेवटी आम्ही निसर्गावर संपूर्ण जय मिळवला. बोट वळवून आम्ही उलट दिशेनी चार ते पाच डिग्री दक्षिणेकडे जायलो लागते. तिथे वादळाचा जोर अजिबात नव्हता. जसजसे आम्ही खाली जात होतो तसतशी हवा सुधारत गेली. आता आपण आपल्या घरी नक्की पोचणार आहोत अशी सगळ्यांची खात्री झाली. तो आनंद आम्ही त्या रात्रभर साजरा करत होतो. केवळ परमेश्वराच्याच कृपेने आपण सहीसलामत या भीषण संकटातून बाहेर पडलो आहोत या विश्वासाने आणि कृतज्ञतेने सुटकेचा तो आनंद प्रत्येकाच्या चेहऱ्यावर झळाळत होता.

आणि ११ मार्चच्या त्या सुवर्णप्रभाती आम्ही जपानला हाकाटा येथे पोचलो. हाकाटा मधे पाच–सहा दिवस राहून नंतर हिरोशिमाजवळ असलेल्या 'इनोशिमा शिप् बिल्डिंग ॲण्ड रिपेअरिंग' यार्डमध्ये गेलो. इथे आमची बोट रंगवून दुरूस्त करून नंतर कोरियाच्या ताब्यात द्यायची होती. हिरोशिमा म्हटलं की दुसऱ्या महायुद्धात बेचिराग झालेल्या या भूमिची तीव्रतेने आठवण येते. इथे

त्या दिवसाचं स्मारक म्हणून एक म्युझियम आहे जिथे त्यावेळच्या सगळ्या आठवणी जतन करणाऱ्या अनेक गोष्टी ठेवलेल्या आहेत. या उध्वस्त भूमीतून जपानी लोकांनी अवघ्या पंचवीस–तीस वर्षांत एका समृद्ध आणि संपन्न देशाची निर्मीती कशी केली याचं उत्तर प्रत्यक्ष कृतीतूनच आम्हाला मिळालं. आमची दीड-लाख टनी अवाढव्य बोट ड्रायडॉक्स्मधे आल्यापासून ती तीन दिवसांत संपूर्ण बोटीच्या प्लेटस् बदलून, रंगवून आणि नाव बदलून आम्ही नवीन मालकाच्या स्वाधीन केली. सिंदबादनी आपल्या सफरीतून लिलिपुटियनांच्या देशाचा उल्लेख केला आहे. त्याची आठवण मला ह्यावेळी झाली. शेकडो छोटी छोटी माणसं आपल्या कामावर अक्षरशः तुटून पडल्यासारखी अहोरात्र खपत होती. रोज सकाळी नऊ आणि दुपारी साडेबारा वाजता सगळीकडे लाऊडस्पीकरवर एक ठराविक संगीत सुरू झालं की हातातलं काम जागीच ठेवून सगळ्यांचा ' मास ड्रिल ' सुरू व्हायचा. डॉक्स समोर असलेल्या ऑफिसमधल्या मोठ्या बॉसपासून खालच्या प्यूनपर्यंत सगळे या नियमाने काटेकोर पालन करताना दिसायचे. आपल्याकडे असा नियम सरकारी पातळीवरून येण्याची सुतराम शक्यता नाहीच. पण चुकून आलाच तर त्यातल्या पळवाटांचाच लोक अगोदर विचार करून ठेवतील याची मला पूर्ण खात्री आहे. ज्याला शिस्त आणि श्रद्धा (डिव्होशन) म्हणतात याबाबत जपानची सर जगातल्या कुठल्याही देशाला येणार नाही. आपल्याकडे तर हे शब्द केव्हाच शब्दकोषातून नाहीसे झालेले आहेत आपला देश आणि आपली भाषा या बद्दलचा इतका जाज्वल्य अभिमान जपानी लोकांजवळ असल्याने त्यांचा एवढा धसका अमेरिकेसारख्या बलाढ्य राष्ट्राने अजून घेतला आहे की दुसऱ्या महायुद्धानंतर एवढा मोठा काळ लोटला पण अजूनही जपानचे स्वतंत्र सैन्यबल नाही. अमेरिकेला मिलीटरी बेस आहे.

आम्ही अमेरिकेतून तिथे गेलो होतो. अमेरिका म्हणजे सगळंच प्रचंड काम ! माणसं, दुकानं, गाड्या तिथल्या सगळ्याच वस्तु जम्बो साईजमधे दिसतात. अफाट सुबत्ता आणि विज्ञानाच्या अतिरेकामुळे इथल्या माणसातलं माणूसपण संपूर्णपणे हरवलं आहे. यंत्र शक्तीला आपला गुलाम बनविण्याच्या प्रयत्नात इथे मनुष्यच यंत्राचा गुलाम होऊन बसला आहे. अहोरात्र वाजणारे रेडिओ-टीव्हीवर लेट शो, लेट नाईट शो, लेट लेट नाईट शो या चक्रात अडकल्यामुळे कौटुंबिक संबंधच दुरावत चालले आहेत. आता तिथे टी. व्ही. डिनरचा पॅक मिळतो. तेव्हा प्रत्येकानी आपल्या आवडीचा कार्यक्रम बघत त्याची चव घ्यायची. संध्याकाळी कुटुंबातील सगळ्यांनी गप्पागोष्टी करत जेवण्याचा प्रकार इतिहास जमा झाला आहे. (आपल्याकडेही शनिवार रविवार संध्याकाळी सिनेमाच्या अगर नाटकाच्या कार्यक्रमाच्या वेळी दुसऱ्याच्या घरी जाऊन अनुभव घेता येईल.) या पार्श्वभूमीवर जपानमधलं आतिथ्य, अगत्य आणि छोट्या छोट्या सुबक नाजूक गोष्टींतून ठायी

ठायी आढळणारी त्यांची सौंदर्यदृष्टी आपल्यातल्या माणुसपणाला धक्का दिल्याशिवाय रहात नाही. 'अरिगास्तो ! अरिगास्तो !' म्हणत सारखे अदबीने कमरेत झुकणारे आणि गोड बोलणारे दुकानदार, आपल्या गोड चेहऱ्यावर सदैव हास्य टिकवून ठेवणाऱ्या कुठल्याही सार्वजनिक ऑफिसमधे काम करणाऱ्या मुली आणि आपली एखाद्या राजासारखी सरबराई करणारी कुठल्याही साधारण रेस्टॉरंटमधली वेट्रेस पाहिल्यावर कुठलाही परकीय पाहुणा इथे अगदी मनातून सुखावल्याशिवाय रहाणार नाही. हॉटेलमधे साधी चहा कॉफी प्यायला जा. तुमच्या आवडीच्या छोटया छोटया नाजूक साजूक कपातून ती ओतून घुंगूर लावलेल्या चमच्यानी ढवळत ती जपानी सुंदरी हसून तुमच्या हातात देणार ! तुम्हाला सांगितलं तर आश्चर्य वाटेल. इतका प्रगत देश आहे ना ? पण जपानी पत्नी अजूनही आपल्या पतीशी आपल्याकडे गेल्या शतकात जशा स्त्रिया पतीशी आदबीने वागत तशीच वागते. (पुरुषवर्गाला क्षणभर हेवा वाटला ना ?) आता अमेरिकेचा फार मोठा पगडा इथे असल्याने या स्त्रियांनी आपले केस कापले, पोषाख बदलले पण त्यांच्यामधलं स्त्रीत्व अजून गमावलेलं नाही. असं असलं तरी खरं सांगू, या बाहुली सारख्या दिसणाऱ्या बायका त्यांच्या परंपरागत किमोनोत आणि डोक्यावर अंबाडा घालून त्यात तऱ्हेतऱ्हेच्या कंगव्यांनी सुशोभित केलेल्या केशभूषेतच अधिक सुंदर दिसतात.

इनोशिमाला बोट कोरियाच्या ताब्यात दिल्यावर आम्हाला तिथे दोन दिवस हॉटेलमधे ठेवलं. हॉटेल अतिशय छान होतं. पण जेवण म्हटलं की माझी पचाईत ! रेअर-मीडियम आणि वेलडन ह्या मीटच्या तिन्ही अवस्था थोड्याफार फरकानी सारख्याच असतात हे त्या तुकड्यावर सुरी चालवली की समजतं. भात आणि मासे हे जपानी लोकांच मुख्य अन्न आहे हे आपण वाचतोच. इथे हॉटेलच्या बाहेर एका टँकमधे जिवंत मासे सोडलेले असतात. तुम्हाला हवा तो मासा जाळ्यात पकडून ताजा ताजा तयार होऊन तुमच्या टेबलावर येतो. शिवाय दुकाना दुकानातून टांगलेले ऑक्टोपस ही इथली डेलिकसी ! ह्या सगळ्या दृश्यांनी हॉटेलमधे काय मिळणार असली क्षूद्र चिंता मला त्रस्त करत होती.

इनोशियाच्या मुक्कामानंतर तिसऱ्या दिवशी सकाळी आम्ही लक्झरी बसने ओसाकाला जायला निघालो. इनोशिमा जपानच्या दक्षिणेला क्यूसू बेटावर आहे. तिथून ओसाकाला जायचं तर शिकोकू बेटातून होन्शू बेटापर्यंत जायला आम्हाला बारा तास लागले. आमच्या बरोबर केवळ एकच ड्रायव्हर होता. पण त्याच्या चेहऱ्यावरचं हास्य आणि उत्साह अगदी शेवटर्यंत टिकून होता याचच मला आश्चर्य वाटत होतं. वाटेत जपानी शेतकरी, त्यांच्या त्या गवताच्या गोलगोल टोप्या, हिरवीगार शेतं, छोटी बांबूची घरं आणि डोंगर उतारावर फळांनी लगडलेल्या

संग्र्यांच्या बागा बघून अक्षरशः डोळ्याचं पारणं फिटलं. ओसाकामधे 'ओसाका रॉयल' चा पंचतारांकित हॉटेलमधे आमचा मुक्काम होता. हे अलिशान हॉटेल तेहतीस मजली उंच असून यात इटालियन फ्रेंच, जपानी, चायनीज आणि कॉन्टिने-न्टल अशा पद्धतीची हॉटेल्स् होती. ज्यांना तऱ्हेतऱ्हेच्या पद्धतींची लज्जत चाखण्याची गोडी आहे, अशांना ती साक्षात् मेजवानीच होती. तिथले दोन्ही दिवस आम्ही खूप भटकण्यात घालवले.

तिसऱ्या दिवशी दहा–साडेदहाला आम्ही एअरपोर्टवर जायला निघालो. आमच्या प्रत्येकाच्या फ्लाईटस् वेगवेगळ्या होत्या. विमानानी प्रवास करायचा असेल आणि जाहिरातीत दाखविल्यासारख्या तत्पर आणि अगत्यशील विमानसेवेचा अनुभव घ्यायचा असेल तर एकदा 'कॅथी पॅसिफिकने' जाऊन बघा. 'एअर इंडिया' ही आपली म्हणून तिच्या मोहात मुळीच पडू नका. कारण इथे तुमच्या रंगाप्रमाणे त्या त्या दर्जाची सेवा तुमच्या पदरात पडेल हे अनुभवानी शिकायला मिळतं. तुमच्या शेजारी जर गोरा असेल तर तुम्हाला निश्चित दुय्यम दर्जाची वागणूक मिळेल. गाऱ्या कातडीची हांजा हांजी आपण अजूनही किती करतो याची प्रचीती इथे हमखास येईल.

ओकासा ते मुंबई यात ओसाका चे मनिला 'कॅथी पॅसिफिक' आणि मनिला ते मुंबई 'एअरफ्रान्स' असा दहा ते साडेदहा तासांचा आमचा प्रवास झाल्यानंतर साधारण रात्री अकराचे सुमाराला मुंबईचे दिवे दूरवर दिसू लागले आणि पुन्हा आपल्या देशात सुखरूप येऊन पोचल्याचा आनंद झाला. म्हणतातच ना, आपली आई ही कशीही असली तरी ज्याची त्याला ती प्रियच असते. विमानतळावर पाऊल ठेवल्यावर पहिलं दृश्य दिसलं ते सगळीकडे कचरा पडलेला आणि रात्रीच्या त्यावेळी पाचसहा बायका तो झाडत होत्या. आपापलं सामान उचलायला मागच्या वेळी ज्या मोडक्या ढकलगाड्या होत्या त्यात मात्र सुधारणा झाली होती. (मी पाचसहा वर्षापूर्वीच्या विमानतळाबद्दल बोलते आहे.) ज्या देशातून मनुष्य-बळाचा अभाव आहे तिथे ही सोय तर्कदृष्टया ठीक आहे पण जिथे अफाट लोक-संख्या आणि बेकारी आहे तिथे ही सोय म्हणजे शेकडो कामगारांच्या पोटावर पायच ! ओसाकाच्या विमानतळाहून आम्ही निघाल्याने हे भारतीय दृश्य प्रथम-दर्शनी आम्हालाही चांगलेच खटकले. मग परदेशी पाहुण्यांच्या मनात प्रथमदर्शनी भारताबद्दल कोणती प्रतिमा निर्माण होत असेल बरं ? पण यांची रंगीत तालीम मनिला विमानतळावर मिळाली होतीच म्हणा !



ग्रंथसंग्रहालय ठाणे
६८३
२५५८२
चौलदे
संग्रह शाखा (स्थळ प्रत)
ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ..........
संग्रह शाखा (स्थळ प्रत)

REFBK-0025102

REFBK-0025102